**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५१५/०२**

**श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण,**
**३९/२१३, नवजीवन हौसिंग सोसायटी,**
**इंदिरा नगर पोलीस चौकीसमोर,**
**सर्विस रोड, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, प्रशासन कक्ष,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, प्रशासन कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२०.२.२००८ रोजी अर्ज करुन, दि.१ जानेवारी,१९९५ रोजी झोपडीत वास्तव्य करणा-या झोपडी मालकाने आपली राहती मूळ झोपडी १ जानेवारी,१९९५ नंतर अन्य दुस-या व्यक्तीस खरेदी खत करुन विकली असलयास झोपडी विकत घेणारा नवीन व्यक्ती झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत मोफत सदनिका घेण्यास कोणत्या आधारावर वा निकषावर परिशिष्ट-२ मध्ये पात्र ठरतो व ही पात्रता सिध्द करण्यासाठी नवीन घर मालकास कोणकोणते पुरावे/ कागदपत्र प्राधिकरणास सादर करावे लागतात याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती ही अभिप्राय स्वरुपाची आहे. अपिलकाराने मागणी केलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम २(च) मध्ये समाविष्ट नाही असे कळवून माहिती नाकारली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित

केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन  अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.  सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता अपिलकार हजर तसेच जन माहिती अधिकारी  हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, प्रशासन कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),  मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.१ जानेवारी,१९९५ रोजी झोपडीत वास्तव्य करणा-या झोपडी मालकाने आपली राहती मूळ झोपडी १ जानेवारी,१९९५ नंतर अन्य दुस-या व्यक्तीस खरेदी खत करुन विकली असलयास झोपडी विकत घेणारा नवीन व्यक्ती झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत मोफत सदनिका घेण्यास कोणत्या आधारावर वा निकषावर परिशिष्ट-२ मध्ये पात्र ठरतो व ही पात्रता सिध्द करण्यासाठी नवीन घर मालकास कोणकोणते पुरावे/ कागदपत्र प्राधिकरणास सादर करावे लागतात याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नाही तर अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अधिनियमातील तरतुदीनुसार एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. परंतु आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही.  राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत  मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १४/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५२१/०२**

**श्री. नूर मोहम्मद एस.सिद्दीकी,**
**द्वारा-रॉयल कम्युनिकेशन सेंटर हिल नं.२,**
**गैबनशाह दरगाह रोड, नारायण नगर,**
**घाटकोपर (प.), मुंबई- ४०० ०८६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. नूर मोहम्मद एस.सिद्दीकी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.८.८.२००७ रोजी अर्ज करुन, कुर्ला कामगार सेवा सहकारी गृहनिर्माण संस्था लि.घाटकोपर (प.) मुंबई यांच्या अध्यक्ष/ सचिव यांना संस्थेचे दफ्तर तपासणी अधिकारी यांना सादर करण्याबाबत उपनिबंधक, म्हाडा यांनी दि.५.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले होते. यासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.५.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१४.१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, कुर्ला कामगार सेवा सहकारी गृहनिर्माण संस्था लि.घाटकोपर (प.) मुंबई यांच्या अध्यक्ष/ सचिव यांना संस्थेचे दफ्तर तपासणी अधिकारी यांना सादर करण्याबाबत उपनिबंधक, म्हाडा यांनी दि.५.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले होते. यासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१४.१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. अपिलकारास सुनावणीचे पत्र उशिराने मिळाल्यामुळे सुनावणीकरिता हजर राहू शकले नाहीत. सुनावणीसाठी दुसरी तारीख देण्याबाबत अपिलकाराने दि.१७.१.२००८ च्या पत्राने विनंती केली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी सुनावणी घेतली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान न झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १४/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५२२/०२**

**श्री. महेंद्र करसनदास मेहता,**
**२१-अे, जंजिरा हाऊस, राजावाडी नं.१**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग,**
**पहिला मजला, जवाहर रोड,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक अभियंता (इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग,**
**पहिला मजला, जवाहर रोड,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. महेंद्र करसनदास मेहता, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप सहायक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१४.१२.२००७ रोजी अर्ज करुन, मनपा एन विभागातील बेकायदेशीर बांधकामामध्ये तोडफोड करणे, मनपा व अपिलकाराच्या परवानगिशिवाय बेकायदेशीर बांधकामे चालू असताना दिलेल्या तक्रारीवरुन बेकायदेशीर बांधकामे थांबविण्यासाठी तातडीने कारवाई करण्याबाबत एकूण चार तक्रारी दाखल केल्या होत्या. सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराच्या अर्जावर योग्य ती कार्यवाही केली जाईल. मागितलेली माहिती सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतर अपिलकारास पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.११.१.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.६.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप सहायक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मनपा एन विभागातील बेकायदेशीर बांधकामामध्ये तोडफोड करणे, मनपा व अपिलकाराच्या परवानगिशिवाय बेकायदेशीर बांधकामे चालू असताना दिलेल्या तक्रारीवरुन बेकायदेशीर बांधकामे थांबविण्यासाठी तातडीने कारवाई करण्याबाबत एकूण चार तक्रारी दाखल केल्या होत्या. सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नाही तर अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अधिनियमातील तरतुदीनुसार एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५२३/०२**

**श्री. अब्दुल गफूर हुणशाळ,,**
**हॉटेल प्रेसिडेन्ट, महाराष्ट्र नगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**पाचवा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**पाचवा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. अब्दुल गफूर हुणशाळ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.८.२.२००८ रोजी अर्ज करुन, (१) महाराष्ट्र नगर विकास एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, (२) आंबेडकर उत्कर्ष एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, (३) महाराष्ट्र नगर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थांच्या व्यवस्थापक समिती संबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती ही प्रश्नोत्तरे / अभिप्राय स्वरुपाची आहे. प्रश्नोत्तरे/ अभिप्राय स्वरुपाची माहिती केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम-२ (च) मधील माहिती या संज्ञेत बसत नसल्यामुळे ती अपिलकारास पुरविणे अशक्य आहे. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने संस्थेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तशा सूचना संस्थेस देण्यात येत आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२०.६.२००८ च्या पत्राने अपिलकारास कळविले. दरम्यान अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२८.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सदर

सुनावणीस अनुसरुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी कार्यालयातील जा.क्र.मुंबई/सनि/झोपुप्र/शाम/अ/१३७/ सन २००८, दि.२६.५.२००८ च्या आदेशास अनुसरुन कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलकार यांना आवश्यक शुल्क आकारुन देणेबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश देण्यात आले. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. उत्तरवादीच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी हजर होते.

सुनावणीच्या वेळी उत्तरवादीनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, (१) महाराष्ट्र नगर विकास एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, (२) आंबेडकर उत्कर्ष एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, (३) महाराष्ट्र नगर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थांच्या व्यवस्थापक समिती संबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. संस्थेच्या नोंदणीसंबंधी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलकारास पुरविली असल्याचा जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. तिन्ही संस्थांवर कलम-७८ नुसार कार्यवाही करुन संस्थेचे रजिस्ट्रेशन रद्द करतो असे आश्वासन प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम सुनावणीचेवेळी दिले असल्याचा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तिन्ही संस्थांचे रजिस्ट्रेशन रद्द करण्याबाबत दिलेल्या आश्वासनानुसार केलेल्या कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती पुरविण्यात यावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५२४/०२**

**श्री. अब्दुल गफूर हुणशाळ,,**
**हॉटेल प्रेसिडेन्ट, महाराष्ट्र नगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**पाचवा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**पाचवा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. अब्दुल गफूर हुणशाळ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१४.१.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/ आंबेडकर नगर, वांद्रे (पूर्व) येथील सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याने केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/ आंबेडकर नगर, वांद्रे (पूर्व) येथील सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १४/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/११७५/०२**

**श्री. राजेंद्र श्रीराम विरकर,**
**डी-५७, धर्मनगर सोसायटी,**
**शिवसृष्टी कॉलनी, कुर्ला (पूर्व), मुंबई- ४०० ०२४.** ------**अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई विभाग,मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**पूर्व उपनगरे (२), मुंबई, कक्ष क्र.२०१, २ राजला,**
**कोकण भवन, नवी मुंबई- ४०० ६१४.** ------- **उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. राजेंद्र श्रीराम वीरकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पूर्व उपनगरे, कोकण भवन, नवी मुंबई, यांच्याकडे दि.१६.११.२००७ रोजी अर्ज करुन, माहितीचा अधिकार कायद्यान्वये जावक क्र.मुंबई/ जिउनि-२/बी-५/गृह/१०३२/सन २००६, दि.२१.४.२००६, जिउनि-२ या निर्णयाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.१२.२००७ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.१५.२.२००८ रोजी आदेश पारित केले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती १५ दिवसांच्या आत अपिलकारास उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पूर्व उपनगरे, कोकण भवन, नवी मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, माहितीचा अधिकार कायद्यान्वये जावक क्र.मुंबई/जिउनि-२/बी-५/गृह/१०३२/सन २००६, दि.२१.४.२००६, जिउनि-२ या निर्णयाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास माहिती देण्याबाबत आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १४/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३५७/०२**

**डॉ. एस.एस.प्रभू,**
**बी-२३, उद्यान प्रभा,**
**तेजपाल स्कीम रोड नं.२,**
**विलेपार्ले, (पूर्व), मुंबई- ४०० ०५७.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,**
**रुम नं.३६९, २ रा मजला, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**रुम नं.३६९, २ रा मजला, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार डॉ.एस.एस.प्रभू, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२३.२.२००८ रोजी अर्ज करुन, दि.६.८.२००७, १३.८.२००७, १२.११.२००७, १४.११.२००७, २०.११.२००७ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३१.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०३.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. .सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.६.८.२००७, १३.८.२००७, १२.११.२००७, १४.११.२००७, २०.११.२००७ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करण्याची अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. अन्यथा प्रथम अपिलीय अधिका-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे कळविण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १५/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४४१/०२**

**श्री. निखिल जयंतीलाल गांधी,**
**१८५-अे, श्री शिवम को.ऑप.हौ.सो.लि.**
**फ्लॅट नं.अे-७, ३ रा मजला, एस.व्ही.रोड,**
**विलेपार्ले, (प.), मुंबई- ४०० ०५६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था (३), मुंबई,**
**म्हाडा बिल्डिंग, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**के/ पश्चिम विभाग, म्हाडा बिल्डिंग,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. निखिल जयंतीलाल गांधी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२४.३.२००८ रोजी अर्ज करुन, श्री शिवम को.ऑप.हौ.सो.लि.च्या निवडणुकीत अधिकृत ठरविलेल्या सभासदांच्या देखभाल पोटीच्या देयकांची माहिती, संस्थेचे बँकेचे लेखा विवरणपत्र इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

श्री शिवम को.ऑप.हौ.सो.लि. या संस्थेवर प्रशासक कार्यरत असल्याने व सदरचे दफ्तर संस्थेत असल्याने आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रशासकाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.३.२००८च्या पत्राने कळविले. जनमाहिती अधिका-याने समाधानकारक माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.२८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल

केले. सदर अपिलावर दि.१५.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे (पूर्व),मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री शिवम को.ऑप.हौ.सो.लि.च्या निवडणुकीत अधिकृत ठरविलेल्या सभासदांच्या देखभाल पोटीच्या देयकांची माहिती, संस्थेचे बँकेचे लेखा विवरणपत्र इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली होती. अपिलकारास गृहनिर्माण संस्थेच्या तक्रारीच्या सर्व धारिका निरीक्षणासाठी अपिलकारास उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार अपिलकारास धारिकाच्या निरीक्षणाकरिता दि.२९.११.२००८ रोजी कार्यालयात बोलाविले होते. सदर दिवशी अपिलकार कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. यामुळे अपिलकाराचे द्वितीय अपील फेटाळण्यात यावे असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपिलकारास माहिती देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली आहे. अपिलकारास माहिती देणे सोईचे व्हावे यादृष्टीने संस्थेच्या तक्रारीच्या सर्व धारिका अपिलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित धारिकांचे निरीक्षण करावे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संस्थेच्या तक्रारीसंबंधीच्या धारिका निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्याव्यात. त्यानंतर आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १५/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/११२२/०२**

**श्री. चंद्रकांत अमृतलाल मर्चंट,**
**जे.एम.राणे बिल्डिंग व खंबाटा पठाण चाळ,**
**१५३ ई, मोझेन रोड, वरळी, मुंबई- ४०० ०१८.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अभियंता, उत्तर, मुंबई-१४,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**मुंबई, परेल.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**फ. ग. दक्षिण विभाग,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**परेल, मुंबई-१२.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. चंद्रकांत अमृतलाल मर्चंट, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, फ.ग.दक्षिण विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, परेल, मुंबई, यांच्याकडे दि.२६.१०.२००७ रोजी अर्ज करुन, लोखंडवाला कटारिया कन्स्ट्रक्शन कं.लि. वरळी येथील वास्तूचे निरीक्षण केले असल्याने त्यासंबंधीचा अहवाल मिळणेबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२३.११.२००७ च्या पत्राने असे कळविले की, विकासकाने इमारतीच्या पूर्ण भोगवटा प्रमाणपत्रासाठी ना हरकत प्रमाणपत्राचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यासाठी साईटची पाहणी व प्रस्तावाची छाननी चालू आहे. छाननी अद्याप पूर्ण झाली नसल्याने अहवाल तयार झाला नाही. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.४.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१४.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी दि.३०.१२.२००७ पर्यंत अहवाल तयार करुन त्याची एक प्रत अपिलकारास देण्याबाबत सूचना देण्यात आल्या. जन माहिती अधिका-यांनी अहवालाची प्रत दिली नसल्याने व्यथित होऊन

अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, फ.ग.दक्षिण विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, परेल, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, लोखंडवाला कटारिया कन्स्ट्रक्शन कं.लि. वरळी येथील वास्तूचे निरीक्षण केले असल्याने त्यासंबंधीचा अहवाल मिळणेबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. संबंधित इमारतीची पाहणी व सविस्तर अहवालासाठी लागणा-या कागदपत्राची पडताळणी कार्यालयात सुरु असून, सदर पडताळणीकरिता पाच-सहा दिवसांचा अवधी लागेल व तदनंतरच अंतिम अहवाल तयार होऊ शकेल. अहवाल तयार होताच अहवालाची प्रत अपिलकारास देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२८.१२.२००७ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकारास कळविले असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. परंतु जन माहिती अधिका-यांनी अद्याप अपिलकारास अहवालाची प्रत दिली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १५/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५३१/०२**

**श्री. बचुभाई नर्मदाशंकर देसाई,**
**४ अे/१०७, ओमकार इमारत,**
**धनजीवाडी, राणी सती मार्ग,**
**मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०९७.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**नगर रचनाकार वर्ग-१,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (१),**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. बचुभाई नर्मदाशंकर देसाई, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (१), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.९.१२.२००७ रोजी अर्ज करुन, १५३३ टेनामेंट भूखंड क्र. ४८२ ते ४८५, ४८६ ते ५०९ व ५१४ मौ. मालाड (पूर्व) धनजीवाडी, मुंबई यासंबंधी एकूण १२ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

संबंधित उपलब्ध दस्तऐवज, अभिलेख व सामुग्रीचे निरीक्षण करावे. त्यानंतर सूचित केलेली उक्त अधिनियमानुसार देय असलेली माहिती विहित शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२.१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. तसेच अर्जातील मुद्दा क्र.९ व १० अनुसार संस्थेच्या जमा खर्चाबाबतची माहिती मागितली आहे. सदरची माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून प्राप्त करावी. तशा सूचना संस्थेस देण्यात येत आहेत. उर्वरित मुद्दयाबाबत मूळ अर्जाची छायाप्रत अभियांत्रिकी विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे पाठविली आहे. आवश्यक माहिती त्यांच्याशी संपर्क

साधून प्राप्त करुन घ्यावी, असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.७.१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१८.२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (१), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, १५३३ टेनामेंट भूखंड क्र. ४८२ ते ४८५, ४८६ ते ५०९ व ५१४ मौ. मालाड (पूर्व) धनजीवाडी, मुंबई यासंबंधी एकूण १२ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलकारास देण्याच्या दृष्टीने सोईचे व्हावे म्हणून जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्तीचे निरीक्षण करण्याबाबत कळविले आहे. यावरुन अपिलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित धारिका निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित धारिकाचे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध करुन द्याव्यात.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १५/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५३२/०२**

**श्री. नरेश घनःश्याम गायकवाड,**
**म्हाडा कॉम्प्लेक्स, साकेत ०३/४१,**
**फिल्मसिटी रोड, दिंडोशी,**
**मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०९७.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. नरेश घनःश्याम गायकवाड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि. २९.११.२००७ रोजी अर्ज करुन, दिंडोशी स्नेहसागर सहकारी गृहनिर्माण संस्था, मालाड या संस्थेने अपिलकारास रु.१०००/-इतके शुल्क सन १९९५ ते १९९७ या कालावधीत आकारले याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.८.११.२००७ च्या पत्राने संस्थेकडे पत्रव्यवहार करुन बिन भोगवटा शुल्क १० टक्केप्रमाणे आकारण्यास पत्रव्यवहार करावा. संस्थेला तशा सूचना दिल्या आहेत. सोबत बिन भोगवटा शुल्काचे आदेश जोडले आहेत. तरी संस्थेशी संपर्क साधवा तसेच अपिलकारास संस्थेने सहकार्य न केल्यास कार्यालयाकडे पत्रव्यवहार करावा असे कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२०.२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दिंडोशी स्नेहसागर सहकारी गृहनिर्माण संस्था, मालाड या संस्थेने अपिलकारास रु.१०००/- इतके शुल्क सन १९९५ ते १९९७ या कालावधीत आकारले याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमानुसार अपिलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १५/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५०३/०२**

**श्री. मच्छिंद्र एन. कारळकर,**
**हजाराबाई हाऊस, रुम नं.५**
**इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (पश्चिम), मुंबई- ४०० ०५६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**२ रा मजला, पालिराम पथ, बेस्ट बस डेपोसमोर,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**२ रा मजला, पालिराम पथ, बेस्ट बस डेपोसमोर,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मच्छिंद्र एन.कारळकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, पालिराम पथ, अंधेरी (प.), मुंबई, यांच्याकडे दि.१८.३.२००७ रोजी अर्ज करुन, वाढीव अनधिकृत बांधकाम, अनधिकृत शोरुम, गॅरेज, सक्तीच्या आरक्षित जागेत बांधल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.९.४.२००८ व १७.५.२००८ च्या पत्राने माहिती दिली. दरम्यान अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. दर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, पालिराम पर्थ, अंधेरी (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वाढीव अनधिकृत बांधकाम, अनधिकृत शोरुम, गॅरेज, सक्तीच्या आरक्षित जागेत बांधल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अपिलकारास अधिनियमातील तरतुदीनुसार एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १६/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५०४/०२**

**श्री. मच्छिंद्र एन. कारळकर,**
**हजाराबाई हाऊस, रुम नं.५**
**इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (पश्चिम), मुंबई- ४०० ०५६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**२ रा मजला, पालिराम पथ, बेस्ट बस डेपोसमोर,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (लायसन्स)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**२ रा मजला, पालिराम पथ, बेस्ट बस डेपोसमोर,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. मच्छिंद्र एन.कारळकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (लायसन्स), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, पालिराम पर्थ, अंधेरी (प.), मुंबई, यांच्याकडे दि. १८.३.२००७रोजी अर्ज करुन, दुकान मालकाने अनधिकृतपणे माल विक्रीचे काऊंटर सक्तीच्या मोकळया जागेत बांधल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, पालिराम पर्थ, अंधेरी (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दुकान मालकाने अनधिकृतपणे माल विक्रीचे काऊंटर सक्तीच्या मोकळया जागेत बांधल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अपिलकारास अधिनियमातील तरतुदीनुसार एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १६/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५०५/०२**

**श्री. मच्छिंद्र एन. कारळकर,**
**हजाराबाई हाऊस, रुम नं.५**
**इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (पश्चिम), मुंबई- ४०० ०५६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. नरेश घन:श्याम गायकवाड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि. १०.३.२००८ रोजी अर्ज करुन, सिटी सर्व्हे क्र.१९५ अंधेरी गाव, जुहू गांव येथील लोकनायक नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, नवीन डी.एन.नगर, नवीन कापसवाडी गृहनिमर्माण संस्था, जुहू वर्सोवा लिंक रोड, अंधेरी (प.) मुंबई या एस.आर.ए. योजने अंतर्गतच्या गृहनिर्माण संस्थांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती अभिप्राय स्वरुपाची आहे. ही माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये समाविष्ट नाही. असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.३.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सिटी सर्व्हे क्र.१९५ अंधेरी गाव, जुहू गांव येथील लोकनायक नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, नवीन डी.एन.नगर, नवीन कापसवाडी गृहनिमर्माण संस्था, जुहू वर्सोवा लिंक रोड, अंधेरी (प.) मुंबई या एस.आर.ए. योजने अंतर्गतच्या गृहनिर्माण संस्थांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अपिलकारास अधिनियमातील तरतुदीनुसार एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १६/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५०६/०२**

**श्री. मच्छिंद्र एन. कारळकर,**
**हजाराबाई हाऊस, रुम नं.५**
**इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (पश्चिम), मुंबई- ४०० ०५६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. .** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. नरेश घनःश्याम गायकवाड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१९.३.२००८ रोजी अर्ज करुन, शिवाजीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती, अंधेरी न्यू कपासवाडी, जुहू एकता गृहनिर्माण संस्था, सिटी सर्वे क्र.१९५, न्यू वर्सोवा लिंक रोड, अंधेरी (प.) मुंबई या एसआरए मधील गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक समिती बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

शिवाजीनगर सहकारी गृहनिर्माण संस्था कार्यालयात नोंदणीकृत नसल्याचे कार्यालयीन उपलब्ध दफ्तरावरुन दिसून येते. त्यामुळे सदरची माहिती पुरविणे अशक्य आहे. अंधेरी न्यू कपासवाडी, जुहू एकता सहकारी गृहनिर्माण संस्थाबाबत मागणी केलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने संस्थेकडून प्राप्त करावी. तशा सूचना संस्थेला देण्यात येत आहेत. अर्जातील मुद्दा क्र.२, ३ व ४ उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याशी संबंधित असल्याने मूळ अर्ज त्यांच्याकडे वर्ग करण्यांत येत आहे. तरी संबंधित विभागाशी संपर्क साधून माहिती प्राप्त करु शकतात असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३.५.२००८ च्या पत्राने कळविले. दरम्यानच्या कालावधीत अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.

२३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. .

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, शिवाजीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती, अंधेरी न्यू कपासवाडी, जुहू एकता गृहनिर्माण संस्था, सिटी सर्वे क्र.१९५, न्यू वर्सोवा लिंक रोड, अंधेरी (प.) मुंबई या एसआरए मधील गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक समितीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अपिलकारास अधिनियमातील तरतुदीनुसार एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १६/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५२५/०२**

**श्री. चतुर ताहीलराम कृपलानी,**
**अे-५०१, आरोही को.ऑप.हौ.सो.लि.**
**मरोल- मरोशी रोड, भवानी नगर जवळ,**
**अंधेरी (पश्चिम), मुंबई- ४०० ०५९.** ------**अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) मुंबई,**
**पश्चिम उपनगरे, गृहनिर्माण भवन,**
**तळमजला, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा के/पूर्व विभाग,**
**सहकारी गृहनिर्माण संस्था, मल्होत्रा हाऊस,**
**६ वा मजला, जीपीओ समोर, मुंबई- ४०० ००१. .** ------- **उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. चतुर ताहीलराम कृपलानी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा के/पूर्व विभाग, सहकारी गृहनिर्माण संस्था, मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर, मुंबई, यांच्याकडे दि.०१.२.२००८ रोजी अर्ज करुन, मरोळ अंधेरी येथील आरोही सहकारी गृहनिर्माण संस्थेने नोंदणीसाठी सादर केलेल्या अर्जाची प्रत, संस्थेचे प्रवर्तक व सदस्यांची यादी, संस्थेच्या मुख्य प्रवर्तकाचे नांव व पत्ता, संस्थेच्या ए आणि बी विंगमधील एकूण फ्लॅटची संख्या इ.अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.७.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा के/पूर्व विभाग, सहकारी गृहनिर्माण संस्था, मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मरोळ अंधेरी येथील आरोही सहकारी गृहनिर्माण संस्थेने नोंदणीसाठी सादर केलेल्या अर्जाची प्रत, संस्थेचे प्रवर्तक व सदस्यांची यादी, संस्थेच्या मुख्य प्रवर्तकाचे नांव व पत्ता, संस्थेच्या ए आणि बी विंगमधील एकूण फ्लॅटची संख्या इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १६/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५२८/०२**

**श्री. महावीर प्रसाद सैनी,**
**द्वारा-हॉटेल प्रेसिडेन्ट, महाराष्ट्र नगर,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. महावीर प्रसाद सैनी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, मुंबई, यांच्याकडे दि.८.२.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र नगर, आंबेडकर नगर, सिटीएस ६२९ अंतर्गत चालू असलेल्या योजनेबाबत ५ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने अपिलकाराने संय्थेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तशा सूचना संस्थेस देण्यात येत आहेत. असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२५.२.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.६.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र नगर, आंबेडकर नगर, सिटीएस ६२९ अंतर्गत चालू असलेल्या योजनेबाबत ५ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अधिनियमातील तरतुदीनुसार एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १६/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५२९/०२**

**श्रीमती साईप्रिया नामदेव मळीक,**
**११/५५३, सरदार नगर, नंबर-१,**
**सरदार नगर प्रांजल को.ऑप.हौ.सो.लि.**
**सायन, कोळीवाडा, मुंबई- ४०० ०२२.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मिळकत व्यवस्थापक-२,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी (मुंबई मंडळ),**
**मिळकत व्यवस्थापक-२, व मिळकत व्यवस्थापक-५,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्रीमती साईप्रिया नामदेव मळीक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी (मुंबई मंडळ), मिळकत व्यवस्थापक-२ व मिळकत व्यवस्थापक-५, म्हाडा, गृहनिर्माण भवन, मुंबई, यांच्याकडे दि.२१.१.२००८ रोजी अर्ज करुन, म्हाडाने प्रांजल सहकारी गृहनिर्माण संस्था, लि.सायन कोळीवाडा, मुंबई या संस्थेस म्हाडाने संस्थेच्या इमारतीच्या दोन्ही बाजूला मोकळया असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम करुन ती जागा भाडे तत्वावर देण्याची परवानगी दिली आहे का, याबाबत एकूण ६ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२२.२.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. सदर माहतीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२८.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी (मुंबई मंडळ), मिळकत व्यवस्थापक-२ व मिळकत व्यवस्थापक-५, म्हाडा, गृहनिर्माण भवन, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, म्हाडाने प्रांजल सहकारी गृहनिर्माण संस्था, लि.सायन कोळीवाडा, मुंबई या संस्थेस म्हाडाने संस्थेच्या इमारतीच्या दोन्ही बाजूला मोकळया असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम करुन ती जागा भाडे तत्वावर देण्याची परवानगी दिली आहे का, याबाबत एकूण ६ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. प्रांजल सहकारी गृहनिर्माण संस्थेने दि.२७.१.२००८ रोजी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करुन इमारतीच्या दोन्ही बाजूला पडीक असलेली मोकळी जागा बांधकाम करुन भाडे तत्वावर देण्याबाबत ठराव सर्वसाधारण सभेत पारित करण्यांत आला. म्हाडा सोसायटीला अशा प्रकारे अनधिकृत बांधकामाची परवानगी देते का, इ.बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. सोसायटीस मोकळया जागेवर अनधिकृत बांधकामास परवानगी दिलेली नाही. इमारतीचे अभिहस्तांतरण झाल्यानंतर नियमानुसार उपलब्ध होणा-या चटईक्षेत्राप्रमाणे विकास करता येईल. मोकळया जागेबाबत तांत्रिक विभागाकडून अभिप्राय घेऊन त्याचे वाटप प्रचलित म्हाडाच्या दराप्रमाणे करण्यांत येते, अशी जन माहिती अधिका-यांनी दि.२२.२.२००८ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे अपिलकाराचे समाधान झाले नाही तर प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. परंतु आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची . सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४६३/०२**

**श्री. आनंद सोपान पारगांवकर,**
**रुम नं.११४५, फुले नगर,**
**आय.आय.टी.मार्केट,**
**पवई, मुंबई- ४०० ०७६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग,**
**मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग,**
**मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. आनंद सोपान पारगांवकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता), बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग, भांडूप, मुंबई, यांच्याकडे दि. २४.३.२००८ रोजी अर्ज करुन, आय.आय.टी.मार्केटशेजारी महात्मा फुले नगरची जागा केंद्र शासनाची /महानगरपालिकेची आहे का, असल्यास केंद्राची किती व महानगरपालिकेची किती जागा आहे याबाबत सविस्तर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३०.४.२००८ च्या पत्राने उत्तर दिले आहे. त्यानुसार अपिलकाराने मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रमुख अभियंता, झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण, म्हाडा यांचेशी संपर्क साधावा. असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.५.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि.१८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता), बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग, भांडूप, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, आय.आय.टी.मार्केटशेजारी महात्मा फुले नगरची जागा केंद्र शासनाची /महानगरपालिकेची आहे का, असल्यास केंद्राची किती व महानगरपालिकेची किती जागा आहे याबाबत सविस्तर अनुषंगिक माहिती मागितली होती. महात्मा फुले नगरात एसआरए स्कीमनुसार बांधली जाणारी इमारत व दिली गेलेल्या मनपा परवानगीबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली असल्याचे दिसून येते. अपिलकाराने मागणी केलेली माहिती झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाशी संबंधित असल्याने आवश्यक माहितीकरिता त्या कार्यालयाकडे संपर्क साधण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.५.२००८ च्या पत्राने कळविले आहे. आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलकारास झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाकडे संपर्क साधणे आवश्यक आहे. यावरुन अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १६/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४६५/०२**

**श्री. आनंद सोपान पारगांवकर,**
**रुम नं.११४५, फुले नगर,**
**आय.आय.टी.मार्केट,**
**पवई, मुंबई- ४०० ०७६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सचिव,**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. आनंद सोपान पारगांवकर , यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.१६.४.२००८ रोजी अर्ज करुन, ज्ञानराज विद्या प्रसारक मंडळ, कासारवाडी पुणे येथे उप शिक्षक म्हणून श्री. नाना देवचंद बोदडे हे कार्यरत असून, त्यांची नियुक्ती किती तारखेस झाली, त्यांच्याविषयी काही लेखी तक्रारी आल्या आहेत काय, असल्यास त्याची छायाप्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती शिक्षण अधिकारी, माध्यमिक जिल्हा परिषद, पुणे यांच्या अखत्यारितील असून त्याबाबत शिक्षण अधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे हे सक्षम अधिकारी असल्यापने अपिलकाराचा अर्ज त्यांच्याकडे पाठवून अपिलकारास सत्वर माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निदेश देण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२०.६.२००८ च्या पत्राने कळविले. दरम्यानच्या कालावधीत अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलास अनुसरुन माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता शिक्षण अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे संपर्क साधण्याबाबत दि.२३.४.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, ज्ञानराज विद्या प्रसारक मंडळ, कासारवाडी पुणे येथे उप शिक्षक म्हणून श्री. नाना देवचंद बोदडे हे कार्यरत असून, त्यांची नियुक्ती किती तारखेस झाली, त्यांच्याविषयी काही लेखी तक्रारी आल्या आहेत काय, असल्यास त्याची छायाप्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे संपर्क साधणे आवश्यक आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही . सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४९६/०२**

**श्री. डी. एम. वारपेन,**
**५, स्कायलार्क अपार्टमेंट,**
**६ डी. युनियन पार्क रोड,**
**खार (प.) मुंबई- ४०० ०५२.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (देखभाल),**
**एच/ पश्चिम विभाग, सेंट मार्टीन रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (देखभाल),**
**एच/ पश्चिम विभाग, सेंट मार्टीन रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. डी. एम. वारपेन , यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (देखभाल), एच/ पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२५.२.२००८ रोजी अर्ज करुन, डॉ.आंबेडकर रोड, युनियन पार्कपासून सी.डी.मार्ग पर्यंत रुंदीकरणासंबंधी सहाय्यक मनपा आयुक्त यांना लिहिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीसंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (देखभाल), एच/ पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, डॉ.आंबेडकर रोड, युनियन पार्कपासून सी.डी.मार्ग पर्यंत रुंदीकरणासंबंधी सहाय्यक मनपा आयुक्त यांना लिहिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीसंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५४१/०२**

**श्री. मदन मोहन मिश्रा,**
**१९/३, जवाहर नगर,**
**नरहारी सदन, तळमजला,**
**एस. व्ही. रोड, गोरेगांव (प.) मुंबई- ४०० ०६२.** ------**अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, पी विभाग,**
**मल्होत्रा हाऊस समोर, फोर्ट,मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, पी विभाग,**
**मल्होत्रा हाऊस समोर, फोर्ट,मुंबई- ४०० ००१.** ------- **उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मदन मोहन मिश्रा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.२५.३.२००८ रोजी अर्ज करुन, दि.२६.११.२००७ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.५.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.२६.११.२००७ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५४२/०२**

**श्री. अरुण शांताराम नाईक,**
**२/१३, शास्त्रीनगर को.ऑप.हौ.सो.**
**जे.आर.बोरिचा मार्ग, सातरस्ता,**
**मुंबई- ४०० ०११.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी सहाय्यक आयुक्त (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी मंडई, २ रा मजला,**
**फटलण रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी मंडई, २ रा मजला,**
**फटलण रोड, मुंबई- ४०० ००१.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. अरुण शांताराम नाईक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता), बृहन्मुंबई महानगरपालिका, फलटण रोड, मुंबई, यांच्याकडे दि. ०३.०३.२००८ रोजी अर्ज करुन, जे.आर.बोरीचा मार्ग येथील परेल शास्त्री नगर, परेल महाराष्ट्र नगर, परेल साने गुरुजी नगर, परेल भीम नगर या चार संस्थांचे भाडेपट्टी व संबंधित कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या विषयांकित भूभागाचा सर्वेक्षण नकाशा, संबंधित कागदपत्रे सादर केल्यास आवश्यक माहिती देणे सुलभ होईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.३.२००८ च्या पत्राने अपिलकारास कळविले. माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.७.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.९.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती सात दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानंतरही विहित कालावधीत जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने

राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता), बृहन्मुंबई महानगरपालिका, फलटण रोड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, जे.आर.बोरीचा मार्ग येथील परेल शास्त्री नगर, परेल महाराष्ट्र नगर, परेल साने गुरुजी नगर, परेल भीम नगर या चार संस्थांचे भाडेपट्टी व संबंधित कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे सादर केलेल्या अर्जातील भूकर क्र.१ व २ तपासला असता त्यावरील गृहनिर्माण संस्थेची व अपिलकाराने कळविलेली नगरांची नावे जुळत नाहीत. त्यामुळे नेमका खुलासा होत नाही. नगर भूमापन क्रमांकावर असलेल्या सोसायटींची माहिती हवी असल्यास लीज ॲग्रीमेंट अद्याप झालेले नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.४.६.२००८ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित गृहनिर्माण संस्थाबाबतची धारिका निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीनुसार उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्याव्यात. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५४३/०२**

**श्री. शांताराम मल्हारी थोरात,**
**९/११, नायगांव म्युनिसिपल लेबर कॅम्प,**
**मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,**
**नायगांव, दादर, मुंबई- ४०० ०१४.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**म्हाडा, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. शांताराम मल्हारी थोरात, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२८.२.२००८ रोजी अर्ज करुन, भूखंड क्र.५६८, नगर रचना-४, माहीम विभाग, जालनवाडी, भवानीशंकर रोड, मुंबई येथे आशीर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) झोपडपट्टी पुनर्वसन योजना, विकास नियंत्रण नियमावली, १९९१, ३३ (१०) अन्वये इमारती विकासाचे काम चालू आहे. त्याबाबत सदर विकासाची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, भूखंड क्र.५६८, नगर रचना-४, माहीम विभाग, जालनवाडी, भवानीशंकर रोड, मुंबई येथे आशीर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) झोपडपट्टी पुनर्वसन योजना, विकास नियंत्रण नियमावली, १९९१, ३३ (१०) अन्वये इमारती विकासाचे काम चालू आहे. त्याबाबत सदर विकासाची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित धारिका निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्याव्यात. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५४४/०२**

**श्री. वसंत घाग व तु.स.आमरे,**
**टी/४०/२०९, प्रतिक्षानगर संक्रमण शिबीर,**
**सायन (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय), मुंबई,**
**प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन,**
**मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-१,**
**प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन,**
**मुंबई- ४०० ००१.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. वसंत घाग व श्री. तु.स.आमरे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-१, प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन, मुंबई, यांच्याकडे दि.२५.१.२००८ रोजी अर्ज करुन, भगवा महाल सहकारी गृहनिर्माण संस्था, बी.जे.रोड, मुंबई या संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या सदस्यांनी सादर केलेल्या बंधपत्राच्या स्टॅम्प पेपरच्या सत्यतेविषयी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१३.२.२००८ च्या पत्राने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.४.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-१, प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, भगवा महाल सहकारी गृहनिर्माण संस्था, बी.जे.रोड, मुंबई या संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या सदस्यांनी सादर केलेल्या बंधपत्राच्या स्टॅम्प पेपरच्या सत्यतेविषयी अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जात नमूद केलेल्या स्टॅम्प पेपरच्या सत्यतेविषयी अपिलकाराने माहिती मागितली होती. परंतु स्टॅम्प पेपर विक्रीचे रजिस्टर दादर पोलीस स्टेशन येथे जमा असल्याने माहिती देवू शकत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. अपिलकाराने अपेक्षित केलेली माहिती संबंधित शाखेकडे नसल्याने पोलीस स्टेशनकडून रजिस्टर प्राप्त करुन अपिलकारास माहिती देण्याबाबत भांडार शाखेस दि.१०.९.२००८ रोजी आदेशित केले. त्यानुसार संबंधित शाखेने अपिलकारास आवश्यक माहिती दि.२०.९.२००८ च्या पत्राने दिली असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी विहित कालावधीत अपिलकारास आवश्यक ती माहिती दिली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे. संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या सदस्यानी सादर केलेल्या बंधपत्राचे स्टॅम्पपेपर सत्यतेबाबत अपिलकारास काय माहिती दिली याचा जन माहिती अधिका-यांनी खुलासा केल्याचे दिसून येत नाही. तरी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी स्टॅम्प पेपरच्या सत्यतेविषयी अपिलकारास माहिती द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- १७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५४६/०२**

**श्री. चार्लस् गोन्सालव्हीस,**
**१२, चिंचपोकळी रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त/ कार्यालय अधिक्षक,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड,**
**सेंट मार्टीन्स रोड, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड,**
**सेंट मार्टीन्स रोड, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. चार्लस् गोन्सालव्हीस, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड, सेंट मार्टीन्स रोड, वांद्रे, (प.) मुंबई, यांच्याकडे दि.०८.१.२००८रोजी अर्ज करुन वांद्रे (प.), चिंचपोकळी रोड, गोन्सालव्हीस वाडी, मुंबई येथील मंदिराच्या अवैध,अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.०२.२.२००८ च्या पत्राने असे कळविले की, अवैध कामाबाबत कार्यवाही सुरु केली नाही, जागेची पाहणी केली असता सर्व क्षेत्र झोपडपट्टीचे असल्याचे दिसून आले. अपिलकाराने मागितलेल्या माहितीप्रमाणे अनेक प्रकारची अवैध बांधकामे सदर झोपडपट्टी क्षेत्रात असल्याचे निदर्शनास आले. त्याविरुध्द कार्यवाही सुरु केलेली नाही, अर्जातील बी व ई बाबत अनेक तक्रारी कार्यालयात प्राप्त झालेल्या आहेत. त्याबाबत एकत्रित कागदपत्रे उपलब्ध नाहीत. त्यामुळे माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२५.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड, सेंट मार्टीन्स रोड, वांद्रे, (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वांद्रे (प.), चिंचपोकळी रोड, गोन्सालव्हीस वाडी, मुंबई येथील मंदिराच्या अवैध,अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर अपिलकाराने आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२५.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत असे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५४७/०२**

**श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण,**
**३९/२/३, नवजीवन हौसिंग सोसायटी,**
**इंदिरा नगर पोलीस चौकीसमोर, सर्व्हिस रोड,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहमुख्य अधिकारी मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**३ रा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भूव्यवस्थापक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**३ रा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** . **-------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भूव्यवस्थापक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व) मुंबई, यांच्याकडे दि.२०.२.२००८ रोजी अर्ज करुन, मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळाच्या मालकीच्या जागेवर दि.१.१.१९९५ रोजी रहात असलेल्या लोकांची नांवे मतदार यादीत समाविष्ट होती किंवा मंडळाच्या वतीने राहत्या खोलीचे भाडे घेण्याकरिता ओळखपत्र देण्यात आले होते, झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत राबविण्यात येणा-या प्रकल्पात कोणत्या निकषावर परिशिष्ट-२ मध्ये पात्र झोपडपट्टी धारकांचा समावेश करण्यात येतो यासंबंधीची नक्कल व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.४.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भूव्यवस्थापक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळाच्या मालकीच्या जागेवर दि.१.१.१९९५ रोजी रहात असलेल्या लोकांची नांवे मतदार यादीत समाविष्ट होती किंवा मंडळाच्या वतीने राहत्या खोलीचे भाडे घेण्याकरिता ओळखपत्र देण्यात आले होते, झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत राबविण्यात येणा-या प्रकल्पात कोणत्या निकषावर परिशिष्ट-२ मध्ये पात्र झोपडपट्टी धारकांचा समावेश करण्यात येतो यासंबंधीची नक्कल व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५४८/०२**

**डॉ. अजित श्रीधर चराटकर,**
**ई/८, आंबेकर नगर, जी.डी.आंबेकर रोड,**
**परेल, मुंबई- ४०० ०१२.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्य,**
**आयुर्विद्या प्रसारक मंडळ,**
**शीव रेल्वे स्टेशनसमोर,शीव, मुंबई-४०० ०२२.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य,**
**आयुर्वेद महाविद्यालय,**
**शीव, मुंबई-४०० ०१२.** **. -------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार डॉ.अजित श्रीधर चराटकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई, यांच्याकडे दि.७.२.२००८ रोजी अर्ज करुन, गोकुळसिंग पंजाबी चाळ व शेतमळा यांचा सद्य:स्थितीत ताबा संस्थेकडे आहे का, या दोन्ही मालमत्तेबाबत न्यायालयीन खटले चालू आहेत का, असल्यास कोणत्या न्यायालयात, या मालमत्ते संबंधात न्यायालयात निकाल लागला असल्यास न्यायालयाच्या निकालाच्या प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, गोकुळसिंग पंजाबी चाळ व शेतमळा यांचा सद्यःस्थितीत ताबा संस्थेकडे आहे का, या दोन्ही मालमत्तेबाबत न्यायालयीन खटले चालू आहेत का, असल्यास कोणत्या न्यायालयात, या मालमत्ते संबंधात न्यायालयात निकाल लागला असल्यास न्यायालयाच्या निकालाच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५४९/०२**

**डॉ. अजित श्रीधर चराटकर,**
**ई/८, आंबेकर नगर, जी.डी.आंबेकर रोड,**
**परेल, मुंबई- ४०० ०१२.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्य,**
**आयुर्विद्या प्रसारक मंडळ,**
**शीव रेल्वे स्टेशनसमोर,शीव, मुंबई-४०० ०२२.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य,**
**आयुर्वेद महाविद्यालय,**
**शीव, मुंबई-४०० ०१२.** . **-------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार डॉ.अजित श्रीधर चराटकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई, यांच्याकडे दि.११.१.२००८ रोजी अर्ज करुन, आयुर्विमा प्रसारक मंडळ, शीव येथील नवीन बांधकाम (कॉलेज इमारत) यासंबंधीचा सन २००४-२००७ या कालावधीचा तपशील व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, आयुर्विमा प्रसारक मंडळ, शीव येथील नवीन

बांधकाम (कॉलेज इमारत) यासंबंधीचा सन २००४-२००७ या कालावधीचा तपशील व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५०/०२**

**श्री. किशोर शंकरराव पवार,**
**१३९/४६९८, उल्हास को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**नेहरु नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई- ४०० ०२४.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्य,**
**आयुर्विद्या प्रसारक मंडळ,**
**शीव रेल्वे स्टेशनसमोर,शीव, मुंबई-४०० ०२२.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य,**
**आयुर्वेद महाविद्यालय,**
**शीव, मुंबई-४०० ०१२.** . **-------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार किशोर शंकरराव पवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई, यांच्याकडे दि.१३.१०.२००७ रोजी अर्ज करुन, संस्थेचे जानेवारी, १९९८ ते ऑक्टोबर, २००७ पर्यंतचे बँकेचे विवरणपत्र, बँकेच्या पासबुकाची छायाप्रत इ.अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, संस्थेचे जानेवारी, १९९८ ते ऑक्टोबर,

२००७ पर्यंतचे बँकेचे विवरणपत्र, बँकेच्या पासबुकाची छायाप्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५१/०२**

**श्री. किशोर शंकरराव पवार,**
**१३९/४६९८, उल्हास को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**नेहरु नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई- ४०० ०२४.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्य,**
**आयुर्विद्या प्रसारक मंडळ,**
**शीव रेल्वे स्टेशनसमोर,शीव, मुंबई-४०० ०२२.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य,**
**आयुर्वेद महाविद्यालय,**
**शीव, मुंबई-४०० ०१२.** **. -------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. किशोर पवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई, यांच्याकडे दि.९.१०.२००७ रोजी अर्ज करुन, सन १९९६ ते २००७ या कालावधीत केंद्र शासन, आयुक्त सी.सी.आय.एम. वा अन्य कोणत्या संस्थेमार्फत आपल्या संस्थेला किंवा महाविद्यालयाला अनुदान मिळाले आहे का, असल्यास किती व कशासाठी, अनुदानाचा धनादेश कोणत्या बँकेत वठविण्यात आला त्या बँकेच्या पासबुकाची छायाप्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सन १९९६ ते २००७ या कालावधीत केंद्र शासन, आयुक्त सी.सी.आय.एम. वा अन्य कोणत्या संस्थेमार्फत आपल्या संस्थेला किंवा महाविद्यालयाला अनुदान मिळाले आहे का, असल्यास किती व कशासाठी, अनुदानाचा धनादेश कोणत्या बँकेत वठविण्यात आला त्या बँकेच्या पासबुकाची छायाप्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५२/०२**

**श्री. अशोककुमार कलीराम अग्रवाल,**
**१५, अग्रवाल नगर, वाशीनाका,**
**आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई- ४०० ०७४.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. अशोककुमार कलीराम अग्रवाल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे कुर्ला संकुल, मुंबई, यांच्याकडे दि.४.२.२००८ रोजी अर्ज करुन, आनिक- पांजरापोळ लिंक रोड-ईस्टर्न फ्री वे मध्ये बाधित निवासी/ अनिवासी/ अन्य यांच्या संबंधित तक्रार निवारणाबद्दल अनुषंगिक माहिती मागितली होती.

माहितीपोटी रु.५६/- इतकी रक्कम विभागाकडे जमा करुन माहिती घेऊन जावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.६.५.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपिलकाराने मागणी केलेली माहिती दोन दिवसात देण्यात यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना निदेश देवून दि.९.५.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे कुर्ला संकुल, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, आनिक- पांजरापोळ लिंक रोड-ईस्टर्न फ्री वे मध्ये बाधित निवासी/ अनिवासी/ अन्य यांच्या संबंधित तक्रार निवारणाबद्दल अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी दि.१२.५.२००८ च्या पत्राने अपिलकारास उपलब्ध करुन दिली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. जन माहिती अधिका-याने पुरविलेली माहिती अपूर्ण असल्याचा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५३/०२**

**प्रो.पाटणकर निसारअली मुहम्मद,**
**२/२०४, आघाडी नगर,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३.** ------**अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,**
**के.आय.एच.ई.एस. महाराष्ट्र कॉलेज,**
**४१, सी लँड, कफ परेड,**
**कुलाबा, मुंबई-४०० ००५.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**खैरुनल इस्लाम हायर एज्यूकेशन सोसायटी,**
**महाराष्ट्र कॉलेज, भायखळा, मुंबई-४०० ००८.** -------- **उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार प्रो.पाटणकर निसार अली मुहम्मद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, खैरुनल इस्लाम हायर एज्यूकेशन सोसायटी, महाराष्ट्र कॉलेज,भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.१०.१.२००८ रोजी अर्ज करुन, लेखा विवरणपत्र, आय व्यय विवरणपत्र, लेजर बुक, कॅश बुक, क्रेडीट व्हाऊचर, डेबिट व्हाऊचर, बँकेचे पासबुक इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, खैरुनल इस्लाम हायर एज्यूकेशन सोसायटी, महाराष्ट्र कॉलेज,भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, लेखा विवरणपत्र, आय व्यय विवरणपत्र, लेजर बुक, कॅश बुक, क्रेडीट व्हाऊचर, डेबिट व्हाऊचर, बँकेचे पासबुक इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५४/०२**

**प्रो.पाटणकर निसारअली मुहम्मद,**
**२/२०४, आघाडी नगर,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**के.आय.एच.ई.एस. महाराष्ट्र कॉलेज,**
**२ प्रिन्स कोर्ट, भायखळा, मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**महाराष्ट्र कॉलेज, बेलासिस रोड,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.** **-------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार प्रो.पाटणकर निसार अली मुहम्मद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, खैरुनल इस्लाम हायर एज्यूकेशन सोसायटी, महाराष्ट्र कॉलेज,भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.१८.१.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचे नवीन बचत खाते उघडण्याबाबत दि.३०.५.२००७ च्या पत्रान्वये केलेल्या विनंती संबंधी केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.४.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, खैरुनल इस्लाम हायर एज्यूकेशन सोसायटी, महाराष्ट्र कॉलेज,भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचे नवीन बचत खाते उघडण्याबाबत दि.३०.५.२००७ च्या पत्रान्वये केलेल्या विनंती संबंधी केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५५/०२**

**प्रो.पाटणकर निसारअली मुहम्मद,**
**२/२०४, आघाडी नगर,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**के.आय.एच.ई.एस. महाराष्ट्र कॉलेज,**
**२ प्रिन्स कोर्ट, भायखळा, मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**महाराष्ट्र कॉलेज, बेलासिस रोड,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.** **-------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार प्रो.पाटणकर निसार अली मुहम्मद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, खैरुनल इस्लाम हायर एज्यूकेशन सोसायटी, महाराष्ट्र कॉलेज,भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.१८.१.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र महाविद्यालयातील अपिलकाराच्या सेवा नियमित करण्याबाबत मुंबई विद्यापिठाने निर्गमित केलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०४.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, खैरुनल इस्लाम हायर एज्यूकेशन सोसायटी, महाराष्ट्र कॉलेज,भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र महाविद्यालयातील अपिलकाराच्या सेवा नियमित करण्याबाबत मुंबई विद्यापिठाने निर्गमित केलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २२/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५६/०२**

**श्री. निखिल जयंतीलाल गांधी,**
**१८५/अे, श्री शिवम को.ऑप.हौ.सोसायटी लि.**
**फ्लॅट अे-७, ३ रा मजला, एस.व्ही.रोड,**
**विलेपार्ले (प.), मुंबई- ४०० ०५६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३),**
**गृहनिर्माण भवन, तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३),**
**गृहनिर्माण भवन, तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार निखिल जयंतीलाल गांधी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३) यांचे कार्यालय, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२४.३.२००८ रोजी अर्ज करुन, श्री शिवम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विरुध्द श्री.एन.एन.भट्ट, श्रीमती मीनल शहा यांनी केलेल्या तक्रारीसंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.३.२००८ च्या पत्राने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२३.७.२००८ रोजी आदेश पारित करुन अपिलकाराचे अपील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३) यांचे कार्यालय, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री शिवम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विरुध्द श्री.एन.एन.भट्ट, श्रीमती मीनल शहा यांनी केलेल्या तक्रारीसंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. कार्यालयाच्या दफ्तरावर असलेल्या कागदपत्राच्या प्रती देणे, माहितीच्या अधिकारांतर्गत बंधनकारक आहे. सबब, आपला अर्ज कार्यालयाच्या दफ्तरावरुन निकाली काढण्यात येत आहे. वसुलीबाबत विशेष वसूली अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.३.२००८ च्या पत्राने उत्तर दिले. अपिलकाराने श्री.भट्ट व श्रीमती शहा यांनी संस्थेविरुध्द केलेल्या तक्रारीसंबंधी केलेल्या कारवाईची माहिती अपिलकारास पुरविली नसल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. वसुलीबाबत विशेष वसूली अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांली अपिलकारास उत्तर दिले. माहितीच्या अधिकारातील काही भाग सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित नसल्यास अर्जाची प्रत सर्व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाठविण्याबाबत उक्त अधिनियमातील कलम-७ (दोन) अनुसार तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराचा अर्ज विशेष वसूली अधिकारी यांच्याकडे पाठवून विहित कालावधीत अपिलकारास माहिती देण्याबाबत कळविणे आवश्यक होते. याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने संस्थेविरुध्द केलेल्या तक्रारीसंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. वसुलीसंबंधी अपिलकारास माहिती देणेबाबत अर्ज वसुली अधिका-याकडे तात्काळ पाठवून तसे वसुली अधिका-यास तात्काळ कळविण्यांत यावे. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५७/०२**

**श्री. चेतन कोठारी,**
**५२, ओकेनिक अपार्टमेंट,**
**डॉ.राजाबली पटेल लेन समोर,**
**बी. देसाई रोड, मुंबई- ४०० ०२६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आरटीओ,**
**प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई,**
**ओल्ड बॉडी गार्ड लाईन्स, तुळशीवाडी,**
**ताडदेव, मुंबई-४०० ०३४.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी आरटीओ,**
**प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई,**
**ओल्ड बॉडी गार्ड लाईन्स, तुळशीवाडी,**
**ताडदेव, मुंबई-४०० ०३४.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. चेतन कोठारी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी आरटीओ, प्रादेशिक परिवहन कार्यालय, तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई, यांच्याकडे दि.१८.३.२००८ रोजी अर्ज करुन, गेल्या पाच वर्षात किती दुय्यम अनुज्ञाप्ती देण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्याविरुध्द काय कार्यवाही करण्यांत आली, यासंबंधी निर्गमित करण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीस, दुय्यम अनुज्ञाप्ती धारण करणा-यांची नांवे, पत्ते इत्यादी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.४.२००८ च्या पत्रासोबत माहिती उपलब्ध करुन दिली. अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३१.५.२००८ व ११.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. जनमाहिती अधिका-यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी आरटीओ, प्रादेशिक परिवहन कार्यालय, तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, गेल्या पाच वर्षात किती दुय्यम अनुज्ञाप्ती देण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्याविरुध्द काय कार्यवाही करण्यांत आली, यासंबंधी निर्गमित करण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीस, दुय्यम अनुज्ञाप्ती धारण करणा-यांची नांवे, पत्ते इत्यादी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१६.४.२००८ च्या पत्राने पुरविलेली माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी असल्याचा मुद्दा अपिलकाराने द्वितीय अपिलात उपस्थित केला आहे. सदर बाब लक्षात घेऊन मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र/ नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून सर्व संबंधित कागदपत्र/ नस्तीचे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती १५ दिवसांचे आत पुरवाव्यात.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५९/०२**

**श्रीमती आफताब ए.सिद्दीकी,**
**सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३ वा रोड, खार (प.), मुंबई- ४०० ०५२.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टीन्स रोड, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त, (लायसन्स विभाग),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टीन्स रोड, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती आफताब ए. सिद्दीकी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, लायसन्स विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि.११.२.२००८ रोजी अर्ज करुन, पटवर्धन रोड ते जुन्या खार पर्यंत लिंकींग रोडवरील फेरीवाल्यांना किती अनुज्ञाप्ती देण्यात आल्या आहेत याबाबत अनुषंगिक९ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे दरम्यान अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन १५ दिवसांचे आत अपिलकारास माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि. ५.६.२००८ च्या

पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, लायसन्स विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/ पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, पटवर्धन रोड ते जुन्या खार पर्यंत लिंकींग रोडवरील फेरीवाल्यांना किती अनुज्ञाप्ती देण्यात आल्या आहेत याबाबत अनुषंगिक ९ मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केल्यानंतर दि.५.६.२००८ च्या पत्राने अपिलकारास माहिती दिली. माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. या प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत कार्यवाही केली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी भविष्यात माहिती अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे. सदर प्रकरणी अपिलकारास जन माहिती अधिका-यानी माहिती पुरविली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५६०/०२**

**श्री. सुभाष बापू सुर्वे,**
**४६/सी.१०, ओल्ड चिखलवाडी,** **------अपीलकार**
**टी.जे.रोड, मुंबई- ४०० ००७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**इमारत प्रस्ताव (शहर) II,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इमारत प्रस्ताव (शहर) II,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.** **-------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. सुभाष बापू सुर्वे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव, शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांच्याकडे दि.१५.४.२००८ रोजी अर्ज करुन, जुनी चिखलवाडी, टी.जे.रोड, मुंबई येथील सिटी सर्व्हे क्र.३०९ येथील मालमत्ता म्हाडाने अधिगृहित केल्यासंबंधी इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करुन आवश्यक माहितीसाठी शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपिलकारास दि.२१.५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव, शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, जुनी चिखलवाडी, टी.जे.रोड, मुंबई येथील सिटी सर्व्हे क्र.३०९ येथील मालमत्ता म्हाडाने अधिगृहित केल्यासंबंधी इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपिलीय अधिका-याने प्रथम अपील दाखल करण्याची अपिलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५६२/०२**

**श्रीमती तेजश्री एम. खांबकर,**
**एफ-११, गुरुप्रसाद अरुणोदय नगर,**
**वीर सावरकर रोड, मुलूंड (पूर्व), मुंबई- ४०० ०८१. ------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**एन.एम.जोशी मार्ग, एफफिस्टन, मुंबई-४०० ०१३.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**एन.एम.जोशी मार्ग, एफफिस्टन, मुंबई-४०० ०१३. -------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्रीमती तेजश्री एम. खांबकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, एलफिस्टन, मुंबई, यांच्याकडे दि.१२.३.२००८ रोजी अर्ज करुन, शिंदे कंपाऊंड, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल विभाग, मुंबई सिटी सर्वे क्र.१५० व २५४ येथील मालमत्तेचा पुर्नविकास करण्यासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, एलफिस्टन, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, शिंदे कंपाऊंड, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल विभाग, मुंबई सिटी सर्वे क्र.१५० व २५४ येथील मालमत्तेचा पुर्नविकास करण्यासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५६३/०२**

**श्री. शिवकुमार रामचंद्र शर्मा,**
**बिल्डिंग २९/अे-२२, तक्षशिला, २ रा मजला,**
**महाकाली केव्हज रोड,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.** **-------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. शिवकुमार रामचंद्र शर्मा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.२.७.२००८ रोजी अर्ज करुन, डब्लूएलसी कॉलेज मान्यताप्राप्त नसल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती संचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित असल्याने त्यांच्याकडे संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ३.७.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, डब्लूएलसी कॉलेज मान्यताप्राप्त नसल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५६४/०२**

**श्री. विजय श्याम शिंगाडे,**
**५७, शुश्रूषा (३-बी),**
**एम.बी.पी.टी.हॉस्पिटल कंपाऊंड,**
**नाडकर्णी पार्क, वडाळा,(पूर्व), मुंबई- ४०० ०३७.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,**
**अभियंता सेवा आणि प्रकल्प,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारत,**
**३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इमारती प्रस्ताव, शहर-१,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, ३ रा मजला,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.** **-------- उत्तरवादी.**

**उप मुख्य अभियंता, (इमारती व प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, शहर ई विभाग,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विजय श्याम शिंगाडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, शहर-१, बृहन्मुंबई महानगर पालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.१८.२.२००८ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२/३८५, ५/३८५, ५/३८३ आणि ६/३८३, तुळशीवाडी, महालक्ष्मी येथील विलिंग्डन स्पोर्टस् क्लब येथील अतिरक्ति बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती इमारती व कारखाने, डी विभागाशी संबंधित नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२९.२.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती उप मुख्य अभियंता (इमारती प्रस्ताव) शहर, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याशी संबंधित असल्याने अपिलकाराचा अपील अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता त्यांच्याकडे पाठविला असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.४.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, शहर-१, बृहन्मुंबई महानगर पालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२/३८५, ५/३८५, ५/३८३ आणि ६/३८३, तुळशीवाडी, महालक्ष्मी येथील विलिंग्डन स्पोर्टस् क्लब येथील अतिरक्ति बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती उप मुख्य अभियंता (इमारती प्रस्ताव) शहर, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, संबंधित अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५६५/०२**

**श्री. सुधीर नारायण गोखले,**
**२०२, मोहक टॉवर, मराठा कॉलनी,**
**वामनराव सावंत मार्ग, जनसेवा बँकेशेजारी,**
**दहिसर,(पूर्व), मुंबई- ४०० ०६८.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव),**
**४.३ (पी व आर.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, १ ला मजला,**
**डॉ. आंबेडकर मार्केट बिल्डिंग,**
**कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, (इमारत प्रस्ताव),**
**४.३ (पी व आर.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, १ ला मजला,**
**डॉ. आंबेडकर मार्केट बिल्डिंग,**
**कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सुधीर नारायण गोखले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, शहर-१, बृहन्मुंबई महानगर पालिका, कांदिवली (प.), मुंबई, यांच्याकडे दि.११.४.२००८ रोजी अर्ज करुन, २०२, मोहक टॉवर, वामनराव सावंत मार्ग, मराठा कॉलनी, दहिसर, मुंबई येथील निवासी घर क्र.१०१ व १०२, दुकान क्र.३ व ४ आणि घर क्र.३०२ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३१.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दि.०५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, शहर-१, बृहन्मुंबई महानगर पालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, २०२, मोहक टॉवर, वामनराव सावंत मार्ग, मराठा कॉलनी, दहिसर, मुंबई येथील निवासी घर क्र.१०१ व १०२, दुकान क्र.३ व ४ आणि घर क्र.३०२ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५६६/०२**

**श्री. निपुन मठकर,**
**बी-५, जीवदानी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजयनगर,**
**नालासोपारा,(पूर्व), मुंबई- ४०१ २०८.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.**
**प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**व्यवस्थापक (क- अतां आस्था)**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.**
**प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. निपुन मठकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि. प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१३.२.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता भरलेली पदे, अवैध नोकरी भरती, वर्गवारीनुसार अधिकारी/ कर्मचा-यांची संख्या, अधिकारी/ कर्मचा-यांची नांवे इ.अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.५.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि. प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता भरलेली पदे, अवैध नोकरी भरती, वर्गवारीनुसार अधिकारी/ कर्मचा-यांची संख्या, अधिकारी/ कर्मचा-यांची नांवे इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील एकूण एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन वर्गवारीनुसार भरलेल्या पदाबाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५६७/०२**

**श्री. सिरील पीटर डिसोझा,**
**गुडलक चाळ, रुम नं.१८,**
**साईसंकल्प बिल्डिंगजवळ, बीएमसी कॉलनीसमोर,**
**मालवणी ब्लॉक क्र.३,मालाड,(प.), मुंबई-४०० ०९५.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता,**
**इमारत प्रस्ताव, पश्चिम उपनगरे, पी विभाग,**
**डॉ. आंबेडकर मंडई, कांदिवी (प.), मुंबई-४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इमारत प्रस्ताव, पश्चिम उपनगरे, पी विभाग,**
**डॉ. आंबेडकर मंडई, कांदिवी (प.), मुंबई-४०० ०६७.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सिरील पीटर डिसोझा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव, पश्चिम उपनगरे, पी विभाग, कांदिवली, मुंबई, यांच्याकडे दि.०९.७.२००७ रोजी अर्ज करुन, मालाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणा-या मालाड, एस.व्ही. रोड, नटराज मार्केटच्या समोर असलेल्या हेतल आर्च या इमारतीच्या चौथ्या मजल्यावर अरेना कॉम्प्युटर इन्स्टिटयुट यांनी अनधिकृतरित्या पोटमाळयाचे बांधकाम केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१७.१०.२००७ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.६.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव, पश्चिम उपनगरे, पी विभाग, कांदिवली, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मालाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणा-या मालाड, एस.व्ही. रोड, नटराज मार्केटच्या समोर असलेल्या हेतल आर्च या इमारतीच्या चौथ्या मजल्यावर अरेना कॉम्प्युटर इन्स्टिटयुट यांनी अनधिकृतरित्या पोटमाळयाचे बांधकाम केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याची बाब जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत कळवावी.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५६८/०२**

**श्री. सिरील पीटर डिसोझा, समाजसेवक,**
**गुडलक चाळ, रुम नं.१८,**
**साईसंकल्प बिल्डिंगजवळ, बीएमसी कॉलनीसमोर,**
**मालवणी ब्लॉक क्र.३,मालाड,(प.), मुंबई-४०० ०९५.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त,(उद्याने व मनोरंजन)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जिजाबाई भोसले उद्यान- प्राणीसंग्रहालय, डॉ. आंबेडकर मार्ग,**
**भायखळा, (पूर्व), मुंबई-४०० ०२७.**

**जन माहिती अधिकारी तथा वृक्ष अधिकारी, उद्यान अधिक्षक,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जिजाबाई भोसले उद्यान- प्राणीसंग्रहालय, डॉ. आंबेडकर मार्ग,**
**भायखळा, (पूर्व), मुंबई-४०० ०२७.** **-------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. सिरील पीटर डिसोझा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वृक्ष अधिकारी, उद्यान अधिक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, जिजाबाई भोसले उद्यान, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.१७.४.२००७ रोजी अर्ज करुन, डहाणूकरवाडी, कांदिवली (प.) येथील एम.जी.लिंक रोड असलेल्या वोरा क्रिस्टल या इमारतीच्या समोर असलेल्या पत्र्याच्या कुंपणात उच्च विद्युत दाबाच्या वायरचा टॉवर असलेल्या मोकळया भूखंडावर एकूण झाडांची माहिती व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.५.२००७ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०२.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन जागेची पाहणी करुन अपिलकाराने मागणी केलेली माहिती उद्यान अधिक्षक तथा जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसाचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले. अपेक्षित माहिती मिळाली नसल्याने

व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वृक्ष अधिकारी, उद्यान अधिक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, जिजाबाई भोसले उद्यान, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, डहाणूकरवाडी, कांदिवली (प.) येथील एम.जी.लिंक रोड असलेल्या वोरा क्रिस्टल या इमारतीच्या समोर असलेल्या पत्र्याच्या कुंपणात उच्च विद्युत दाबाच्या वायरचा टॉवर असलेल्या मोकळया भूखंडावर एकूण झाडांची माहिती व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जातील प्रश्न क्र.१, २, ३ ४ संदर्भात जन माहिती अधिका-यांनी असे कळविले आहे की, बृहन्मुंबई क्षेत्रातील मालमत्तेच्या विविध विकास कामाचे आराखडे इमारत प्रस्ताव विभागाने मंजूर केल्यानंतर सदर नियोजित विकास कामात अडथळा करणारी झाडे कापण्यास/ पुनर्रोपित करण्यास व वृक्ष प्राधिकरणाची परवानगी मिळण्यासाठी संबंधित विकासक / पक्षकाराकडून वृक्ष छाडणीचा प्रस्ताव विभागास प्राप्त होतात. त्यानंतरच जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन जागेवर अस्तित्वात असलेल्या झाडांची नोंदणी करण्यांत येते. उक्त विषयांतर्गत भूभागासंबंधाने कोणत्याही विकासक /पक्षकाराकडून या विभागास प्रस्ताव अद्यापपर्यंत प्राप्त झाला नसल्याने अपिलकाराने मागणी केलेली माहिती देणे शक्य नाही. तसेच, उक्त भागावरील वृक्षांची छाटणी करण्यास विभागामार्फत परवानगी देण्यात आलेली नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.५.२००७ च्या पत्राने कळविले आहे. अर्जावर जन माहिती अधिका-यानी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. खाजगी मालमत्तेवर जावून झाडाची मोजणी करणे संयुक्तिक नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २७/०१/२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५६९/०२**

**श्री. प्रकाश वसंत कोटी,**
**१७४१, ओत्तरगल्ली,**
**पो.चिकोडी, जि.बेळगांव (कर्नाटक) ५९११२०१.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अतिरिक्त संचालक, उद्योग,**
**उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप संचालक, उद्योग,**
**उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.** **-------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. प्रकाश वसंत कोटी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, उद्योग, उद्योग संचालनालय, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.१५.४.२००८ रोजी अर्ज करुन, उद्योग संचालनालयात दि.१.४.२००८ पर्यंत प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, उद्योग, उद्योग संचालनालय, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, उद्योग संचालनालयात दि.१.४.२००८ पर्यंत प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने उद्योग संचालनालयातील दि.१.४.२००८ रोजी एक वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या, नऊ महिन्यापेक्षा जास्त परंतु एक वर्षापेक्षा कमी प्रलंबित प्रकरणांची संख्या, सहा महिन्यापेक्षा जास्त परंतु नऊ महिन्यापेक्षा कमी प्रलंबित प्रकरणांची संख्या, तीन महिन्यापेक्षा जास्त परंतु सहा महिन्यापेक्षा प्रलंबित असलेली प्रकरणे तसेच दि.२९.३.२००७ रोजी दिलेल्या ज्ञापनातील नस्तीमधील टिप्पणीच्या प्रती, श्री.माळवदे यांचे शिल्लक रजा रोखीकरणाबाबतची माहिती इ.माहिती मागितली होती. प्रलंबित प्रकरणाचा विहित कालावधीतील तपशील संचालनालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नसल्याने प्रलंबित प्रकरणांची माहिती देणे शक्य नसल्याचे तसेच याव्यतिरिक्त मागितलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रती दि.२७.८.२००८ रोजी अपिलकारास पुरविण्यात आल्याचे आयोगास सांगितले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, खुद्द उद्योग संचालनालयात दि.१.४.२००८ पर्यंत प्रलंबित असलेल्या प्रकरणांची अनुषंगिक माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तरी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २८/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५७०/०२**

**श्री. मिलिंद शरद मुळे,**
**२८४/१२, बांदेकर सदन, एन.सी.केळकर रोड,**
**दादर, मुंबई-४०० ०२८.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचे प्रशासकीय अधिकारी,**
**ई विभाग, शेख हफिझुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचे प्रशासकीय अधिकारी,**
**ई विभाग, शेख हफिझुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मिलिंद शरद मुळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, उपआयुक्त परिमंडळ-१, यांचे प्रशासकीय अधिकारी, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.०७.३.२००८ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, ए, बी, सी, डी विभागातील नियतवयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या रजा रोखीकरणाची एकत्रित अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती पुरविणारे ए, बी, सी, डी विभागनिहाय स्वतंत्र जन माहिती अधिकारी असल्याने सर्व संबंधितांचे कार्यालयाचे पत्ते अपिलकारास कळवून अपिलकाराचा अर्ज आवश्यक कार्यवाहीकरिता संबंधित जन माहिती अधिका-याकडे पाठविण्यात आला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.१४.३.२००८ च्या पत्राने अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी ए.बी.सी.डी. विभागाकरिता चार स्वतंत्र प्रथम अपिलीय अधिकारी असल्याने अपिलकाराचा दि.१०.४.२००८ चा अपील अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता ए, बी, सी, डी विभागातील प्रथम अपिलीय

अधिका-यांकडे पाठविल्याचे दि.२८.४.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, उपआयुक्त परिमंडळ-१, यांचे प्रशासकीय अधिकारी, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, ए, बी, सी, डी विभागातील नियतवयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या रजा रोखीकरणाची एकत्रित अनुषंगिक माहिती मागितली होती. सर्व संबंधित जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सर्व संबंधित ए, बी, सी, डी विभागातील जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल. सदर आदेश जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, उपआयुक्त परिमंडळ-१, यांचे प्रशासकीय अधिकारी, ई विभाग, भायखळा, मुंबई-०८ यांनी सर्व संबंधित ए, बी, सी, डी विभागातील जन माहिती अधिका-यांना पाठवून सदर प्रकरणी अपिलकारास विहित कालावधीत माहिती पुरविण्याबाबत तात्काळ कळविण्याची कार्यवाही करावी.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २८/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१०४४/०२**

**श्रीमती ग्रेस एन.राव,**
**१ ला मजला, २, कुलाबा चेंबर्स,**
**मुंबई-४०० ०२८.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप परिरक्षक (निर्वासितांची मालमत्ता),**
**महसूल आणि वन विभाग,**
**रुम नं.७, मॅगझीन फ्लोअर,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप परिरक्षक (निर्वासितांची मालमत्ता),**
**युनायटेड इंडिया बिल्डिंग, ४ था मजला,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय अधिकारी,**
**मुंबई शहर (पुनर्वसन शाखा),युनायटेड इंडिया इमारत,**
**४ था मजला, सर पी.एम. मार्ग,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती ग्रेस एन. राव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप परिरक्षक (निर्वासितांची मालमत्ता), युनायटेड इंडिया बिल्डिंग, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि. २७.४.२००७ रोजी अर्ज करुन, इब्राहीम ट्रस्ट, कुलाबा चेंबर्स, फ्लॅट नं.२, दुसरा मजला, मुंबई येथील फ्लॅटचे भाडेवाढ केल्यासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२५.५.२००७ च्या पत्रान्वये असे कळविले की, माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जमाबंदी आयुक्त, संचित मालमत्ता नुकसान भरपाई तथा निर्वासित मालमत्तेचे परिरक्षक, मुंबई किंवा प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतु अपिलकाराने उप परिरक्षक यांच्याकडे दि.१६.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर आवश्यक कार्यवाही झाली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप परिरक्षक (निर्वासितांची मालमत्ता), युनायटेड इंडिया बिल्डिंग, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, इब्राहीम ट्रस्ट, कुलाबा चेंबर्स, फ्लॅट नं.२, दुसरा मजला, मुंबई येथील फ्लॅटचे भाडेवाढ केल्यासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने कोणतीही कागदपत्रे मागितली नसल्याने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत विशिष्ट कागदपत्राची मागणी केल्यास ते पुरविण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले होते. सदर उत्तराने अपिलकाराचे समाधान झाले नसल्याने त्यांनी वरिष्ठ अपिलीय अधिकारी, जमाबंदी आयुक्त, संचित मालमत्ता, नुकसान भरपाई तथा निर्वासित मालमत्तेचे परिरक्षक, मुंबई तथा सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम २ (च) (झ) व (त्र) च्या कक्षेत येत नाही. तथापि अपिलकाराने कोणतेही दस्तऐवज, कागदपत्रे अगर सीडी इ.प्रति पुरविणे किंवा अवलोकन करण्याची मागणी केल्यास ती त्यांना पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय अधिकारी, मुंबई शहर यांनी सुनावणीच्या वेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपिलकारास माहिती पुरविण्याची जन माहिती अधिका-यांची तयारी दर्शविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करावे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास सर्व संबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावेत. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २८/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१२६६/०२**

**श्री. विवेक गजानन कुळकर्णी,**
**२४६/ १९, मंगेश सदन,**
**लेडी जमशेटजी मार्ग,**
**शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक जनरल मॅनेजर (ऑडीट),**
**दि बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय ॲन्ड ट्रान्सपोर्ट,**
**बेस्ट भवन, पो.बॉक्स नं.१९२,**
**मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप मुख्य इंटर्नल ऑडिटर,**
**दि बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय ॲन्ड ट्रान्सपोर्ट,**
**बेस्ट भवन, पो.बॉक्स नं.१९२,**
**मुंबई- ४०० ००१.** **-------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. विवेक गजानन कुळकर्णी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य इंटर्नल औडिटर, दि बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय ॲन्ड ट्रान्सपोर्ट, बेस्ट भवन, मुंबई, यांच्याकडे दि.२३.४.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.व्ही.जे.परेरा यांच्या रजेच्या अर्जाची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२९.४.२००८ च्या पत्राने मागितलेली माहिती कोणत्या कारणासाठी मागितली आहे, अपिलकाराने मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची आहे, अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधी कोणतेही लोकहित साध्य होणार नाही असे कळवून माहिती नाकारण्यात आली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन तसे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.२६.५.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय

अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य इंटर्नल औडिटर, दि बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय ॲन्ड ट्रान्सपोर्ट, बेस्ट भवन, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.व्ही.जे.परेरा यांच्या रजेच्या अर्जाची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. श्री.व्ही.जे.परेरा यांच्या रजेच्या अर्जाच्या प्रती कोणत्या कारणासाठी हव्या आहेत याबाबत अपिलकाराने माहितीच्या अधिकारातील अर्जात कारण नमूद केलेले नाही. अपिलकाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली आहे. अपिलकाराने मागितलेल्या माहितीने काही जनहित साध्य होणार नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२९.४.२००८ च्या पत्राने उत्तर दिले आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २८/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/११४१/०२**

**श्री. प्रमोद लक्ष्मण कदम,**
**१६/ डी-३, श्री साई को.ऑप.हौ.सो.**
**एस.व्ही.पी.नगर, अंधेरी (प.) मुंबई-४०० ०५३.** **------अपीलकार**

विरुध्द

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक,**
**मुंबई गृहनिर्माण भवन व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक/प्रशासक,**
**मुंबई गृहनिर्माण भवन व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** -------- **उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. प्रमोद लक्ष्मण कदम, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक/ प्रशासक, मुंबई गृहनिर्माण भवन व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.११.११.२००७ रोजी अर्ज करुन, वर्सोवा अंधेरी येथील श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.प्लॉट नं.१६, एस.व्ही.पी.नगर, अंधेरी (प.), मुंबईबाबत एकूण २१ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.४.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक/ प्रशासक, मुंबई गृहनिर्माण भवन व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वर्सोवा अंधेरी येथील श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.प्लॉट नं.१६, एस.व्ही.पी.नगर, अंधेरी (प.), मुंबईबाबत एकूण २१ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. अंधेरी वर्सोवा श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्थेने अपिलकारास दि.१५.२.२००८ च्या पत्राने मुद्देनिहाय माहिती दिली. सदर माहिती चुकीची असल्याचे अपिलकाराचे म्हणणे आहे. परंतु, जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर

कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २८/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४१५/०२**

**श्री. विशाल रामदास भोगे,**
**रुम नं.३०६, बि.नं. १०१,**
**न्यू म्हाडा कॉलनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,**
**मानखुर्द, मुंबई-४०० ०४३.** **-------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक-२, १ ला मजला,**
**मुंबई गृहनिर्माण भवन व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक-३, १ ला मजला,**
**मुंबई गृहनिर्माण भवन व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**घाटकोपर डिव्हीजन.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विशाल रामदास भोगे,, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-३, मुंबई गृहनिर्माण भवन व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२५.२.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी देवजी सॅबेस्टीन व त्यांची पत्नी श्रीमती हेलन ॲन्थोनी सॅबेस्टीन यांनी म्हाडा सिटी सर्व्हे क्र.१४२४, ऑफीस इमारत क्र.५ च्या मागे २५०० चौ.फूटाचे अनधिकृतपणे बांधकाम केले असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-३, मुंबई गृहनिर्माण भवन व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी देवजी सॅबेस्टीन व त्यांची पत्नी श्रीमती हेलन ॲन्थोनी सॅबेस्टीन यांनी म्हाडा सिटी सर्व्हे क्र.१४२४,

ऑफीस इमारत क्र.५ च्या मागे २५०० चौ.फूटाचे अनधिकृतपणे बांधकाम केले असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. श्री. ॲन्थोनी सॅबेस्टीन व त्यांच्या पत्नीला प्रत्येकी ४५० चौ.फूटाचे दोन वाणिज्य वापर दाखविणारे फोटो पास दिले होते. सदर जागेवरील अनधिकृत बांधकाम दि.११.११.२००५ रोजी तोडण्यात आले. त्यानंतर तक्रार केलेल्या गाळेधारकांना सदर जागेचे फोटोपास वितरित करण्यात आले. त्याबाबतची शहानिशा करण्याबाबत दि.१०.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी अपिलकाराने वारंवार विनंती करुनही आवश्यक कार्यवाही केली नसल्याचा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी..

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २८/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५७८/०२**

**श्री. चेतन कोठारी,**
**५२, ओकेनिक अपार्टमेंट,**
**डॉ.राजाबली पटेल लेन,**
**बी. देसाई रोड, मुंबई-४०० ०२६.** **-------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**

**प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**आरटीओ, मुंबई सेंट्रल, ओल्ड बॉडीगार्ड लाईन्स,**
**तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई- ४०० ०३४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**आरटीओ, मुंबई सेंट्रल, ओल्ड बॉडीगार्ड लाईन्स,**
**तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई- ४०० ०३४** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. चेतन कोठारी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, आरटीओ, मुंबई सेंट्रल, तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई, यांच्याकडे दि. रोजी अर्ज करुन,२४.३.२००८ रोजी अर्ज करुन, बेकायदा अतिरिक्त दुय्यम अनुज्ञाप्ती प्राप्त केलेल्या अनुज्ञाप्ती धारकाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.४.२००८ च्या पत्राने माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३१.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.१८.६.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, आरटीओ, मुंबई सेंट्रल, तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बेकायदा अतिरिक्त दुय्यम अनुज्ञाप्ती प्राप्त केलेल्या अनुज्ञाप्ती धारकाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने चुकीची, अपूर्ण माहिती दिली असल्याचा मुद्दा अपिलकाराने द्वितीय अपिलात उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्ती

निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीनुसार उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती १५ दिवसांचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २८/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५७९/०२**

**श्री. चेतन कोठारी,**
**५२, ओकेनिक अपार्टमेंट,**
**डॉ.राजाबली पटेल लेन,**
**बी. देसाई रोड, मुंबई-४०० ०२६.** **-------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता, कस्टमर केअर, साऊथ,**
**२ रा मजला, इलेक्ट्रीक हाऊस,**

**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**३ रा मजला, विद्युत भवन, पाटाहवाडी,**
**जी.टी.हॉस्पिटलसमोर, लोकमान्य टिळक रोड,**
**मुंबई- ४०० ००२.** **-------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. चेतन कोठारी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, ३ रा मजला, विद्युत भवन, जी.टी.हॉस्पिटलसमोर, मुंबई, यांच्याकडे दि.३.६.२००८ रोजी अर्ज करुन, दि.४.३.२००८ ते दि.३.४.२००८ या कालावधीतील वीज बिलाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३.७.२००८ च्या पत्राने माहिती दिली. दरम्यान अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, ३ रा मजला, विद्युत५ भवन, जी.टी.हॉस्पिटलसमोर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.४.३.२००८ ते दि.३.४.२००८ या कालावधीतील वीज बिलाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृय्टीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपिलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने दाखल केलेल्या अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे

आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २८/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५८०/०२**

**श्री. चेतन कोठारी,**
**५२, ओकेनिक अपार्टमेंट,**
**डॉ.राजाबली पटेल लेन,**
**बी. देसाई रोड, मुंबई-४०० ०२६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता, कस्टमर केअर, साऊथ,**
**बेस्ट इलेक्ट्रीक हाऊस, २ रा मजला,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता,**
**बेस्ट इलेक्ट्रीक हाऊस, २ रा मजला,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई- ४०० ००१.** **-------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. चेतन कोठारी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता, बेस्ट इलेक्ट्रीक हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई, यांच्याकडे दि.०५.४.२००८ रोजी अर्ज करुन, विद्युत देयकाची वैयक्तिक आणि सार्वजनिक संस्थाकडे किती थकबाकी आहे, संबंधितांची नांवे, रक्कम, लेखा क्रमांक याबाबत गेल्या तीन वर्षातील वर्षनिहाय विवरण व अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.०२.५.२००८ च्या पत्राने माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता, बेस्ट इलेक्ट्रीक हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, विद्युत देयकाची वैयक्तिक आणि सार्वजनिक संस्थाकडे किती थकबाकी आहे, संबंधितांची नांवे, रक्कम, लेखा क्रमांक याबाबत गेल्या तीन वर्षातील वर्षनिहाय विवरण व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल करुन आवश्यक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने उक्त अधिनियमात अपिलकारास एक संधी आहे. या प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.११.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच

योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २९/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५८१/०२**

**श्री. विशाल रामदास भोगे,**
**रुम नं.३०६, बि.नं.१०१, न्यू म्हाडा कॉलनी,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर,**
**मानखुर्द, मुंबई-४०० ०४३.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता, (स्थापत्य),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (घाटकोपर विभाग),**

**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

## - <u>विवेचन</u> -

अपिलकार श्री. विशाल रामदास भोगे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (घाटकोपर विभाग), मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.३१.३.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी देवशी सॅबेस्टीन व श्रीमती हेलन सॅबेस्टीन यांना देण्यात आलेल्या फोटोपास व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२४.४.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. चुकीची, दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१६.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.२१.७.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

.सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (घाटकोपर विभाग), मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी देवशी सॅबेस्टीन व श्रीमती हेलन सॅबेस्टीन यांना देण्यात आलेल्या फोटोपास व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२४.४.२००८ च्या पत्रान्वये दिलेली माहिती चुकीची असल्याचा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्ती/ कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करावे. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## <u>आदेश</u>

सबब, अपील अंशत: मान्य करण्यांत येत आहे.

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- २९/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१५८२/०२

श्री. आनंद सोपान पारगांवकर
रुम नं.११४५, महात्मा ज्योतीराव फुले नगर,
आय.आय.टी.मार्केट, पवई, मुंबई-४०० ०७६. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,
भांडूप, मुंबई- ४०० ०७८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,
भांडूप, मुंबई- ४०० ०७८. -------उत्तरवादी.

## - विवेचन -

अपिलकार श्री. आनंद सोपान पारगांवकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग, मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, भांडूप, मुंबई, यांच्याकडे दि.०२.५.२००८ रोजी अर्ज करुन, एस वॉर्ड अंतर्गत येणारे वौर्ड क्र.१०४ ते ११६ पर्यंत असलेल्या सर्व नगरसेवक/ नगरसेविका यांनी निवडणुकीत उभे राहतेवेळी स्वतः विषयी जी माहि दिली होती त्या माहिती अर्जाच्या सर्व नक्कल प्रतींची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.०५.७.२००८ च्या पत्रान्वये असे कळविले की, कार्यालयात माहितीपोटी शुल्क भरुन हव्या असणा-या माहितीची खात्री करुन कागदपत्राच्या छायांकित प्रती घेऊन जाव्यात. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग, मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, भांडूप, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, एस वॉर्ड अंतर्गत येणारे वौर्ड क्र.१०४ ते ११६ पर्यंत असलेल्या सर्व नगरसेवक/ नगरसेविका यांनी निवडणुकीत उभे राहतेवेळी स्वतः विषयी जी माहि दिली होती त्या माहिती अर्जाच्या सर्व नक्कल प्रतींची मागणी केली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे वारंवार माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज सादर करुन माहिती मिळाल्यानंतर ती पुरेशी नसल्याचे कारण दाखवून अपिलकार अपील सादर करतात. कार्यालयातर्फे देण्यात आलेली माहिती पुरेशी व समाधानकारण् असून, त्यामध्ये कोणताही दिरंगाई झाल्याचे आढळत नाही असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. माहिती कोणतीच पाठविली नाही, माहितीच्या शुल्काविषयी कोणतीच माहिती दिलेली नाही असा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. कार्यालयात उपस्थित राहून हव्या असलेल्या माहितीची खात्री करुन प्रती घेऊन जाण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.०५.७.२००८ च्या पत्राने कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो

की, अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करावे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २९/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५८३/०२**

**श्री. योगेश हरिश्चंद्र केणी,**
**१२३, केणी हाऊस, भंडारवाडा,**
**पन्नालाल घोष मार्ग,**
**मालाड (प.), मुंबई-४०० ०६४.** ------अपीलकार

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारती प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** -------उत्तरवादी.

**- विवेचन -**

अपिलकार श्री. योगेश हरिश्चंद्र केणी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (इमारती प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन, मालाड, मुंबई, यांच्याकडे दि.१२.२.२००८ रोजी अर्ज करुन, स्वागत पार्क येथील अनधिकृत भिंत निष्कासित करण्याबाबत अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे दाखल केलेल्या एकूण पाच तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

माहितीपोटी एकूण रु.४/- एवढे शुल्क कार्यालयात भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी दि.२.४.२००८ च्या पत्राने अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.०२.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अनधिकृतरित्या बांधण्यात आलेल्या भिंतीसंबंधी सबंधितांस पत्र पाठवून पत्राची प्रत इमारत प्रस्ताव विभागाकडे पाठवावी असे नमूद करुन दि.०७.४.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (इमारती प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन, मालाड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, स्वागत पार्क येथील अनधिकृत भिंत निष्कासित करण्याबाबत अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे दाखल केलेल्या एकूण पाच तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. अनधिकृतरित्या बांधण्यात आलेली भिंत पाडण्याबाबत अपिलकाराची तक्रार आहे. यासंबंधी जागेची पाहणी करुन बांधण्यात आलेली भिंत अनधिकृत असल्यास ती पाडण्याबाबत कारवाई करणे आवश्यक आहे. नसल्यास मनपाने सदर बांधकामाकरिता परवानगी दिली आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करुन सदर प्रकरणी अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. .

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- २९/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१५८४/०२

श्री. मिलिंद शरद मुळे,
२८४/१२, बांदेकर सदर,
एन.सी.केळकर रोड, दादर,मुंबई-४०० ०२८. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त,झोन-४
बृहन्मुंबई महानगरपालिका, पालिराम रोड,
एस.व्ही.रोड, अंधेरी स्टेशन समोर, मुंबई-४०० ०५८.

जन माहिती अधिकारी तथा
एसपीआयओ, झोन-४,
बृहन्मुंबई महानगरपालिका, पालिराम रोड,
एस.व्ही.रोड, अंधेरी स्टेशन समोर, मुंबई-४०० ०५८. -------उत्तरवादी.

- **विवेचन** -

अपिलकार श्री. मिलिंद शरद मुळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा एसपीआयओ, झोन-४, बृहन्मुंबई महानगरपालिका, पालिराम रोड, अंधेरी स्टेशन समोर, मुंबई, यांच्याकडे दि.०७.३.२००८ रोजी अर्ज करुन, के/डब्लू, पी/एस, आणि पी/ एन विभागातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या रजा रोखीकरणाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

के/डब्लू, पी/एस, आणि पी/ एन विभागात स्वतंत्र जन माहिती अधिकारी पदनिर्देशित केले असल्याने अपिलकाराचा अर्ज संबंधित जन माहिती अधिका-यांकडे आवश्यक कार्यवाहीकरिता पाठविला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१३.३.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराचा अपील अर्ज सर्व संबंधित अपिलीय अधिका-याकडे पाठविला असल्याचे अपिलकारास दि.२१.४.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा एसपीआयओ, झोन-४, बृहन्मुंबई महानगरपालिका, पालिराम रोड, अंधेरी स्टेशन समोर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, के/डब्लू, पी/एस, आणि पी/ एन विभागातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या रजा रोखीकरणाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. सर्व संबंधित जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, के/डब्लू, पी/एस, आणि पी/एन विभागातील जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा त्यांचेविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल. जन माहिती अधिकारी, उप आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, झोन-४, पालिराम रोड, अंधेरी, मुंबई यांनी हे आदेश

के/डब्लू, पी/एस, आणि पी/एन विभागातील जन माहिती अधिका-यांच्या निदर्शनास आणून अपिलकारास विहित कालावधीत माहिती देण्याबाबत सूचना द्याव्यात. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २९/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/११९९/०२**

**श्रीमती यास्मिन ए. इरानी,**
**द्वारा-बादशहा कोल्ड्रींक्स हाऊस,**
**११५, एल.टी. मार्ग, क्रॉफर्ड मार्केट समोर,**
**मुंबई-४०० ००३.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२.** **-------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती यास्मीन इरानी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, चंदनवाडी, मुंबई, यांच्याकडे दि.२७.११.२००६ रोजी अर्ज करुन, ४१७/४१९, शेख मेनन, मुंबई येथील दोन्ही इमारतीच्या रिकाम्या जागेत अवैधरित्या बांधकाम केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने तक्रार केलेल्या बांधकामाविषयीचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून, तसेच प्रकरण तपासाधीन असून, यासंबंधीचा सविस्तर अहवाल यथावकाश पाठविण्यांत येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. दरम्यान अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अनधिकृत बांधकामाविरुध्द सद्य:स्थितीत प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याची बाब जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्या प्रथम अपिलीय अधिका-यांच्या निदर्शनास आणली. दोन्ही इमारतीच्या रिकाम्या जागेत अनधिकृत बांधकाम केले असून, त्या ठिकाणी मोठया प्रमाणात मालाचा साठा केल्याची बाब मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणावी असे जन माहिती अधिका-यांना आदेश देवून दि.१९.४.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, चंदनवाडी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, ४१७/४१९, शेख मेनन, मुंबई येथील दोन्ही इमारतीच्या रिकाम्या जागेत अवैधरित्या बांधकाम केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधीचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर आवश्यक ती माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- २९/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१२१२/०२

श्री. शेख फतेह मोहम्मद,
द्वारा-बादशहा कोल्ड्रींक्स हाऊस,
११५, एल.टी. मार्ग, क्रॉफर्ड मार्केट समोर,
मुंबई-४०० ००३. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग,
एस.व्ही.पी.स्वीमिंग पुलाजवळ,
कांदिवली (प.) मुंबई-४०० ०६७.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(जल कामे)
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग,
एस.व्ही.पी.स्वीमिंग पुलाजवळ,
कांदिवली (प.) मुंबई-४०० ०६७. -------उत्तरवादी.

- **वि वे च न** -

अपिलकार श्री. शेख फतेह मोहम्मद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (जल कामे) बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/ दक्षिण विभाग, एस.व्ही.पी. स्वीमिंग पुलाजवळ, कांदिवली, मुंबई, यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी अर्ज करुन, वॉर्ड नं.२८, इराणी वाडी, कांदिवली, नगरसेविका डॉ.(श्रीमती सीता यादव) यांनी किती कारखाने, हॉटेल, व्यापारी गाळे, गोडाऊन, निवसी सदनिका धारकांना पाणी जोडणी मंजूर केली, याबबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१६.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने विशिष्ट प्रकारच्या मागणीची मागणी करावी. त्यांनतर जन माहिती अधिका-यांनी उपयुक्त माहिती पुरवावी असे दि.१७.४.२००८ रोजी आदेश पारित केल . यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (जल कामे) बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/ दक्षिण विभाग, एस.व्ही.पी. स्वीमिंग पुलाजवळ, कांदिवली, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, कांदिवली, मुंबई, यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी अर्ज करुन, वॉर्ड नं.२८, इराणी वाडी, कांदिवली, नगरसेविका डॉ.(श्रीमती सीता यादव) यांनी किती कारखाने, हॉटेल, व्यापारी गाळे, गोडाऊन, निवसी सदनिका धारकांना पाणी जोडणी मंजूर केली, याबबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्यै कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही, अपिलकाराने नळ जोडणी संबंधी विशिय्ट माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन देण्याची कार्धवाही करावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- २९/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१२१३/०२

श्री. शेख फतेह मोहम्मद,
द्वारा-बादशहा कोल्ड्रींक्स हाऊस,
११५, एल.टी. मार्ग, क्रॉफर्ड मार्केट समोर,
मुंबई-४०० ००३. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग,
एस.व्ही.पी.स्वीमिंग पुलाजवळ,
कांदिवली (प.) मुंबई-४०० ०६७.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(जल कामे)
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग,
एस.व्ही.पी.स्वीमिंग पुलाजवळ,
कांदिवली (प.) मुंबई-४०० ०६७. -------उत्तरवादी.

- **वि वे च न** -

अपिलकार श्री. शेख फतेह मोहम्मद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (जल कामे) बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/ दक्षिण विभाग, एस.व्ही.पी. स्वीमिंग पुलाजवळ, कांदिवली, मुंबई, यांच्याकडे दि.२२.२.२००८ रोजी अर्ज करुन, वॉर्ड क्र.१९, कांदिवली औद्योगिक वसाहतीतील नळ जोडणीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१६.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने विशिष्ट प्रकारच्या माहितीची मागणी करावी. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत उपलब्ध माहिती पुरवावी असे नमूद करुन दि.१७.४.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (जल कामे) बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/ दक्षिण विभाग, एस.व्ही.पी. स्वीमिंग पुलाजवळ, कांदिवली, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वॉर्ड क्र.१९, कांदिवली औद्योगिक वसाहतीतील नळ जोडणीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही, अपिलकाराने नळ जोडणी संबंधी विशिष्ट माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २९/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/११९६/०२**

**श्रीमती शृंखला गजानन सुर्वे,**
**कपिल वास्तु, तरुण विकास मंडळ,**
**लिबटी गार्डन, (झोपडपट्टी),**
**मालाड (प.), मुंबई-४०० ०६४.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**पी/ नॉर्थ विभाग, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प.), मुंबई-४०० ०६४.** **-------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्रीमती शृंखला गजानन सुर्वे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक तथा सहाय्यक आयुक्त, पी/नॉर्थ विभाग, लिबर्टी गार्डन, मालाड, मुंबई, यांच्याकडे दि. २०.११.२००७ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.४८७, ७५४, ४८६, ७६३ लिबर्टी गार्डन, कपिल वास्तू, तरुण विकास मंडळ येथील गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१३.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. दि.३१.१.२००८ च्या पत्राने अपिलकारास अर्जात नमूद केलेल्या मिळकतीवर कार्यालयाने परिशिष्ट-२ निर्गमित केलेले नाही, टेबल सर्वे प्लॅन, एलओआय, परिशिष्ट-३ याबाबतची माहिती झोपडपट्टी प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घ्यावी, परिशिष्ट-२ संबंधित जागेवर निर्गमित केले गेले नसल्यास माहिती देता येणार नाही, आवश्यक ती माहिती संबंधित खात्या कडून घेणे अपेक्षित आहे असे नमूद करुन दि.१३.३.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक तथा सहाय्यक आयुक्त, पी/नॉर्थ विभाग, लिबर्टी गार्डन, मालाड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.४८७, ७५४, ४८६, ७६३ लिबर्टी गार्डन, कपिल वास्तू, तरुण विकास मंडळ येथील गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने माहितीच्या अधिकारात मागणी केलेल्या अर्जातील काही माहिती इतर अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असल्यास उक्त अधिनियमातील कलम ६ (दोन) अनुसार अपिलकाराचा अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे पाठवून अपिलकारास आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविण्याबाबत संबंधितांना कळविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकाराचा अर्ज संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे विहित कालावधीत पाठविलेला नाही. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराच्या अर्जातील इतर प्राधिकरणाशी संबंधित असलेल्या मुद्दयाबाबत माहिती पुरविण्याकरिता अपिलकाराचा अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे आदेश प्राप्त झाल्यापासून ०५ दिवसांचे आत

पाठवावा. तसे अपिलकारास अवगत करावे. जन माहिती अधिका-याशी संबंधित असलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-या विरुध्द अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २९/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५७१/०२**

**श्री. राकेश हरेश्वर देसाई,**
**देसाई हाऊस, मोरेश्वर पाटील मार्ग,**
**दहिसर (प.), मुंबई-४०० ०६८.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**धर्मादाय आयुक्त न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, ३ रा मजला,**
**डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**धर्मादाय आयुक्त न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, ३ रा मजला,**
**डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८.** **-------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. राकेश हरेश्वर देसाई, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा धर्मादाय आयुक्त, न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, वरळी, मुंबई, यांच्याकडे दि.१३.९.२००७ रोजी अर्ज करुन, माहिती अधिकारी न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग यांनी कळविल्याप्रमाणे निरीक्षक-७ यांनी १९९८ साली प्रकरण निकालात काढले. जाबजबाब रिपोर्ट व निकालाची सत्यप्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२५.१०.२००७ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास असे कळविले की, अपीलकाराचा अपील अर्ज सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग या कार्यालयाशी संबंधित असल्याने अपील अर्ज त्या कार्यालयाकडे पाठवून तसे अपिलकारास कळविण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याचें म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा धर्मादाय आयुक्त, न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, वरळी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, माहिती अधिकारी न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग यांनी कळविल्याप्रमाणे निरीक्षक-७ यांनी १९९८ साली प्रकरण निकालात काढले. जाबजबाब रिपोर्ट व निकालाची सत्यप्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने, तत्कालिन कार्यालयीन निरीक्षक यांनी चौकशी क्र.२१/९८ या चौकशी प्रकरणात सादर केलेल्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली. तत्कालिन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले होते की, सदरच्या अहवालाचा शोध घेता नस्ती जुनी असल्याने तिचा शोध चालू आहे. नस्ती उपलब्ध झाल्यावर अपिलकारास कळविण्यांत येईल. सततचा पाठपुरावा करुन निरीक्षकाने सादर केलेल्या नस्तीचा शोध घेतला असता सदरची नस्ती उपलब्ध होत नाही. त्यामुळे अपिलकारास मागणी केलेली माहिती पुरविणे अशक्य होत आहे असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची नस्ती शोध घेऊनही सापडत नसल्याबाबत धर्मादाय आयुक्त, न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग यांनी जाणिवपूर्वक निर्णय घेऊन हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास कळवावे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २९/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१२७०/०२**

**श्री. सुधीर आर. घेडिया,**
**१५९, माहीम तुरा मार्ग,**
**एस.व्ही.पी.रोड, मुंबई-४०० ००४. ------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अधिकारी (डब्लू),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक (डब्लू),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.. -------उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. सुधीर आर. घेडिया, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.६..२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (डब्लू), मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१७.१.२००८ रोजी अर्ज करुन, वर्सोवा येथील आरडीपी-२ लगत असलेला

भूखंड क्र.१३ बाबत म्हाडा आणि वर्सोवा, संदिप सरोवर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. यांच्यामध्ये झालेला भाडेपट्टा करारनामा व भूखंड वितरणाच्या अटी व शर्तीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दिनांक १८.२.२००८ च्या पत्राने अपिलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (डब्लू) यांनी अपिलकारास १० दिवसाचे आत मागितलेली माहिती पुरवावी असे नमूद करुन दि.९.४.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-याचें म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (डब्लू), मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वर्सोवा येथील आरडीपी-२ लगत असलेला भूखंड क्र.१३ बाबत म्हाडा आणि वर्सोवा, संदिप सरोवर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. यांच्यामध्ये झालेला भाडेपट्टा करारनामा व भूखंड वितरणाच्या अटी व शर्तीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. संस्थेस वितरण केलेल्या भूखंडावर बांधावयाच्या इमारतीच्या नकाशास मुंबई महापालिकेची मंजुरी घेणे ही जबाबदारी सहकारी गृहनिर्माण संस्थेची आहे. त्यासाठी संस्थेने वास्तु शास्त्रज्ञाची नेमणुक व पत्रव्यवहार गृहनिर्माण संस्थेमार्फत करण्यात येतो. या व्यवहारात म्हाडामार्फत हस्तक्षेप केला जात नाही. त्यामुळे अपिलकाराने मागणी केलेल्या इमारतीच्या नकाशास मुंबई महानगरपालिकेची मंजुरी, वास्तु शास्त्रज्ञाची नेमणूक व पत्रव्यवहार ही संस्थेची अंतर्गत माहिती कार्यालयास देणे शक्य झाले नाही असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१२४०-अ/०२**

**श्री. संपत राव,**
**४०२, देवकृपा,**
**२८ रायचूर स्ट्रीट, मुंबई-४०० ००९. ------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था (३),**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, पी विभाग,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. -------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. संपत राव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.४..२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, पी विभाग, पश्चिम उप नगरे, गृहनिर्माण भवन, तळमजला, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१९.९.२००७ रोजी अर्ज करुन, वीणानगर को.ऑप.सहकारी गृहनिर्माण संस्था, मालाड (प.), मुंबई-६४ या संस्थेसंदर्भात अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन उपनिबंधक सहकारी संस्था, पी-विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अनुसार संस्थेवर कार्यवाही करुन तसा अहवाल अपिलकारास देण्याबाबत नमूद करुन दि.१३.१२.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याचें म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, पी विभाग, पश्चिम उप नगरे, गृहनिर्माण भवन, तळमजला, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वीणानगर को.ऑप.सहकारी गृहनिर्माण संस्था, मालाड (प.), मुंबई-६४ या संस्थेसंदर्भात क्र.१ ते ८ मुद्दयाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. संस्थेची दफ्तर तपासणी घेण्यात येत असून तपासणीअंती आढळून आलेल्या मुद्दयांनुसार सस्थेवर कार्यवाही करण्यात येईल. उपनिबंधक सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० नुसार संस्थेवर कार्यवाही करुन तसा अहवाल अपिलकारास पाठविण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले आहेत. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी कार्यवाही करुन अपिलकारास अहवाल सादर केला असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास तपासणी अहवालानुसार आढळून आलेल्या मुद्दयावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास पुरविण्यात यावा. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**

**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१२१५/०२**

**श्री. महाबीर उर्स,**
**५०२, सरीता स्वप्ननगरी,**
**मुलूंड (प.) मुंबई-४०० ०८०.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एल.बी.एस.मार्ग, पहिला मजला,**
**पेपर मिल कंपाऊंड, विक्रोळी (प.), मुंबई-४०० ०७९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एल.बी.एस.मार्ग, पहिला मजला,**
**पेपर मिल कंपाऊंड, विक्रोळी (प.), मुंबई-४०० ०७९.** **-------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. महावीर उर्स, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.४..२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, एल.बी.एस.मार्ग, पेपर मिल कंपाऊंड, विक्रोळी, मुंबई, यांच्याकडे दि. २६.१२.२००६ रोजी अर्ज करुन, अतिथी/अरिस्टो विकासका

संबंधीची आयओडी/सीसी आणि इतर सर्व संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करण्याबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

नकाशा आणि इतर कागदपत्राच्या छायाप्रतीकरिता कार्यालयात एकूण रु.१५०/- शुल्क भरल्या नंतर छायाप्रती उपलब्ध करुन देण्यात येतील. माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता कार्यालयीन वेळेत जन माहिती अधिका-यांना भेटून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे दि.२४.१.२००७ च्या पत्राने अपिलकारास कळविले. यामुळे सामाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०२.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, एल.बी.एस.मार्ग, पेपर मिल कंपाऊंड, विक्रोळी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अतिथी/अरिस्टो विकासका संबंधीची आयओडी/सीसी आणि इतर सर्व संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करण्याबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची उक्त अधिनियमात अपिलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे या परिस्थितीत मी असे आदेश देतो की. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते अउदेया पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५७३/०२**

**श्री. रविंद्र बळीराम गावडे, सचिव,**
**माहीम आकाशगंगा को.ऑप.हौ.सो.लि.**
**सी-२११, आकाशगंगा, रहेजा हॉस्पिटल रोड,**
**माहिम, मुंबई-४०० ०८०.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अधिकारी (मि.व्य.क्र.२)**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक क्र.५,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** . **-------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. रविंद्र बळीराम गावडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक क्र.५, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. २८.४.२००८ रोजी अर्ज करुन, सोसायटीच्या इमारतीतील कोड (०८४ एच आय जी ४०+१० गाळे) अनिवासी पाच गाळयापोटी बृहन्मुंबई महानगरपालिका मालकत्ता कर, देखभाल कर व

इतर कर थकबाकी येणे, सोसायटीस देणेबाबत अदयाप आदेश न देण्याची कारणमिमसा व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.९.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली.. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक क्र.५, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सोसायटीच्या इमारतीतील कोड (०८४ एच आय जी ४०+१० गाळे) अनिवासी पाच गाळयापोटी बृहन्मुंबई महानगरपालिका मालकत्ता कर, देखभाल कर व इतर कर थकबाकी येणे, सोसायटीस देणेबाबत अदयाप आदेश न देण्याची कारणमिमसा व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५७५/०२**

**श्री. नूर मोहम्मद शफी उल्लाह सिद्दीकी,**
**द्वारा- रॉयल कम्युनिकेशन सेंटर,**
**हिल नं.२, गैबनशाह दरगाह रोड,**
**नारायणनगर, घाटकोपर (प.) मुंबई-४०० ०८६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी, श्रेणी-१,**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **-------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. नूर मोहम्मद शफीउल्लाह सिद्दीकी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी, श्रेणी-१, उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.८.४.२००८ रोजी अर्ज करुन, कार्यालयात दि.५.१२.२००७ रोजी अर्ज करुन मागितलेली माहिती दिली नसल्याने अर्जावर संबंधित अधिका-याने कोणता

शेरा मारलेला आहे, त्यासंबंधी कोणती दैनंदिन कार्यवाही करण्यात आली आहे, मागितलेली माहिती का देण्यात आलेली नाही याबाबतच्या तपशीलासह अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१०.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई याद्वारे कुर्ला कामगार सेवा सहकारी गृहनिर्माण संस्था लि. हिल नं.२, शहिद अब्दुल हमीद नगर, एन.एस.एस.रोड, घाटकोपर- पश्चिम मुंबई या संस्थेतील अपिलकर्ता यांना जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसाचे आत माहिती दयावी असे नमूद करुन दि.२३.७.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी, श्रेणी-१, उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मागितलेली माहिती दिली नसल्याने अर्जावर संबंधित अधिका-याने कोणता शेरा मारलेला आहे, त्यासंबंधी कोणती दैनंदिन कार्यवाही करण्यात आली आहे, मागितलेली माहिती का देण्यात आलेली नाही याबाबतच्या तपशीलासह अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५७४/०२**

**श्री. संजय महादेव सोनावणे,**
**राजे संभाजी नगर (प.),**
**तुळजापूर-४१३ ६०१, जि.धाराशिव. ------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग (का-११),**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग (का-११),**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. . -------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. संजय महादेव सोनावणे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.१५.१.२००८ रोजी अर्ज करुन, मा. मुख्य सचिवांनी अर्जावर संबंधित अधिका-यांना दिलेले आदेश/ सूचना याबाबतची छायाप्रत मागितली होती.

कार्यालयात पत्राच्या नोंदी पडताळून पहाता अपिलकाराचा दि.१८.७.२००७ रोजी दिलेला अर्ज कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. माहितीच्या अधिकारातील अर्जासोबत दि.१८.७.२००७ च्या

पत्राची प्रत अपिलकाराने जोडली नसल्याने सदरहू संदर्भ नेमका कोणत्या विभागाशी संबंधित आहे याबाबत बोध होत नाही. त्यामुळे माहितीच्या अधिकारातील अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आला असल्याचे दि.२९.१.२००८ च्या पत्राने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.६.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकारास सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५.७.१९८६ व दि.२४.११.१९८८ च्या शासन निर्णयाच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या. जन माहिती अधिका-यांनी केलेली कृती सद्हेतूने केली आहे असे नमूद करुन दि.१६.७.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती व प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मा. मुख्य सचिवांनी अर्जावर संबंधित अधिका-यांना दिलेले आदेश/ सूचना याबाबतची छायाप्रत मागितली होती. अपिलकाराने दि.१८.७.२००८ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना पाठविलेल्या पत्राची प्रत, कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे त्या पत्रावर काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती अपिलकारास देता आली नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५.७.१९८६ व दि.२४.११.१९८८ च्या शासन निर्णयाच्या प्रती अपिलकारास उपलब्ध करुन दिल्या आहेत. सदर परिस्थिती लक्षात घेता अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५७६/०२**

**श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण,**
**राजे संभाजी नगर (प.),**
**तुळजापूर-४१३ ६०१, जि.धाराशिव. ------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानरगपालिका, एच/पूर्व विभाग,**
**१३७, टीपीएस-५, दुसरा रोड,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानरगपालिका, एच/पूर्व विभाग,**
**१३७, टीपीएस-५, दुसरा रोड,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५. -------उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग, १३७, टीपीएस-५, दुसरा रोड, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२४.३.२००८ रोजी अर्ज करुन, मनपा अधिनियम ३५१ अन्वये जी नोटीस बजावण्यात आली त्या नोटीसी संदर्भात संबंधित हॉटेल मालक

व ताबेदार श्री.दिनेश गुप्ता यांनी उत्तरादाखल सादर केलेल्या सर्व कागदपत्राच्या साक्षांकित छायाप्रती व त्यावर केलेल्या कार्यवाहीबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२०.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती १० दिवसांच्या आत देण्यात यावी असे जन माहिती अधिका-यांना आदेश देवून प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३१.५.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग, १३७, टीपीएस-५, दुसरा रोड, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मनपा अधिनियम ३५१ अन्वये जी नोटीस बजावण्यात आली त्या नोटीसी संदर्भात संबंधित हॉटेल मालक व ताबेदार श्री.दिनेश गुप्ता यांनी उत्तरादाखल सादर केलेल्या सर्व कागदपत्राच्या साक्षांकित छायाप्रती व त्यावर केलेल्या कार्यवाहीबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी मनपा अधिनियम ३५१ अंतर्गत हॉटेल मालकास दिलेल्या नोटीसीसंबंघी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**

राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- ३०/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१५७७/०२

श्री. चेतन कोठारी,
५२, ओकेनिक अपार्टमेंट,
डॉ.राजाबली पटेल लेन,
बी. देसाई रोड, मुंबई-४०० ०२६. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा आर.टी.ओ.मुंबई,
आर.टी.ओ. मुंबई सेंट्रल, ओल्ड बॉडीगार्ड लाईन्स,
तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई- ४०० ०३४.

जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिहवन अधिकारी,
उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई सेंट्रल, ओल्ड बॉडीगार्ड लाईन्स,
तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई- ४०० ०३४. ------ उत्तरवादी.

## - विवेचन -

अपिलकार श्री. चेतन कोठारी, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई सेंट्रल, तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई, यांच्याकडे दि.१२.३.२००८ रोजी अर्ज करुन, मागील पाच वर्षात किती बनावट अनुज्ञाप्ती रद्द करण्यांत आल्या याबाबत वर्षनिहाय इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.४.२००८ च्या पत्राने माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३१.५.२००८, २८.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार हजर राहिले नाहीत. यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील निकाली काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई सेंट्रल, तुळशीवाडी, ताडदेव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मागील पाच वर्षात किती बनावट अनुज्ञाप्ती रद्द करण्यांत आल्या याबाबत वर्षनिहाय इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याचा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने संबंधित कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करावे. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत पुरविण्यात यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६०४/०२**

**श्री. रमेश शिवराम व्हटकर,**
**जय भारती सोसायटी,**
**विकास मंडळ, गोळीबार मैदान,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **-------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रमेश शिवराम व्हटकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२४.३.२००८ रोजी अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे एस.आर.ए.योजने अंतर्गत पात्रते करिता संबंधित भाडेकरुनी सादर केलेले कागदपत्र व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती अभिप्राय स्वरुपाची आहे. ही माहिती माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम-२ (च) मध्ये समाविष्ट नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.४.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.९.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झ ोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे एस.आर.ए.योजने अंतर्गत पात्रते करिता संबंधित भाडेकरुनी सादर केलेले कागदपत्र व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याच्यादृष्टीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल करण्याची अधिनियमात अपिलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे या परिस्थितीत मी असे आदेश देतो की. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६०७/०२**

**श्री. शेख मोहम्मद खालिद,**
**१४-१६-१८ इस्लामिया मंझिल,**
**२ रा मजला, रुम नं.२१९,**
**बदलो रंगारी स्ट्रीट,**
**भायखळा (प.), मुंबई- ४०० ००८.** ------अपीलकार

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**१०, शेख हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा (प.), मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**१०, शेख हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा (प.), मुंबई-४०० ००८.** -------उत्तरवादी.

## - वि वे च न -

अपिलकार श्री. शेख मोहम्मद खालिद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.२.५.२००७ रोजी अर्ज करुन, जुनी मस्जिद कंपाऊंड, सांकली स्ट्रीट, मदनपुरा, मुंबई येथील वॉर्ड क्र.ई-३९८६/५९-ई येथील मालमत्तेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२८.४.२००८ व १२.६.२००८ च्या पत्राने संयुक्तपणे जागेची पहाणी करण्याबाबत कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.०१.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन, दि.०२.८.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झ ोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, जुनी मस्जिद कंपाऊंड, सांकली स्ट्रीट, मदनपुरा, मुंबई येथील वॉर्ड क्र.ई-३९८६/५९-ई येथील मालमत्तेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधी जन माहिती अधिका-यांसमवेत संयुक्तपणे जागेचे निरीक्षण करण्याबाबत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले होते. याप्रमाणे संयुक्तपणे जागेचे निरीक्षण झाल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन दिली नाही. अनधिकृत बांधकामाबाबत जन माहिती अधिका-यांनी चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी अशा प्रथम अपिलीय अधिका-यांनी सूचना दिल्या आहेत. अपिलकाराने तक्रार केलेल्या बांधकामाच्या आराखडयास मनपाने मंजुरी दिली किंवा कसे याबाबत कार्यकारी अभियंता (इमारती प्रस्ताव) यांचेशी संपर्क साधून आवश्यक ती माहिती जन माहिती अधिका-यानी अपिलकारास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६०६/०२**

**श्री. कुनवर सिंग बेदी,**
**४१-अे, मेहरिना,**
**नेपियन सी रोड,**
**मुंबई- ४०० ००६.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, अे विभाग,**
**१३४-ई, एस.बी.सिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, अे विभाग,**
**१३४-ई, एस.बी.सिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.** **-------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. कुनवर सिंग बेदी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, अे विभाग, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.२१.९.२००७ रोजी अर्ज करुन, १९-अे, कफपरेड, मुंबई येथील अतुर टॅरेसमधील फ्लॅट क्र.२०२ व २०३ मध्ये अवैधरित्या अंतर्गत फेरफार केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची आहे. त्रयस्थ पक्षाने अपिलकारास माहिती देण्याबाबत नकार दिला आहे. यामुळे अपिलकारास मागणी केलेली माहिती देता येत नाही असे दि.९.१०.२००७ च्या पत्राने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२१.६.२००८ रोजी आदेश पारित करुप अवील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, अे विभाग, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, १९-अे, कफपरेड, मुंबई येथील अतुर टॅरेसमधील फ्लॅट क्र.२०२ व २०३ मध्ये अवैधरित्या अंतर्गत फेरफार केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने अतुर टॅरेसमधील फ्लॅट क्र.२०२ व २०३ मधील काही बांधकाम पाडून अंतर्गत बांधकामामध्ये अवैधरित्या फेरफार केल्याबाबत अपिलकाराची तक्रार आहे. या प्रकरणी सदनिका धारकाविरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलकारास पुरविणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- ३१/०१/२००९.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६०८/०२**

**श्री. खान इसरार अहमद**
**९५/९७०, रफीनगर, शिवाजीनगर,**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०४३.** ------**अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम पूर्व विभाग,**
**चेंबूर, मुंबई-४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ वसाहत अधिकारी,(झो.सु.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम पूर्व विभाग,**
**चेंबूर, मुंबई-४०० ०७१.** -------**उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. खान इसरार अहमद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ वसाहत अधिकारी (झो.सु.) बृहन्मुंबई महानगरपालिका, एम पूर्व विभाग,

चेंबूर, मुंबई, यांच्याकडे दि.२०.५.२००८ रोजी अर्ज करुन, अनधिकृत झोपडी तथा झोपडीदादांच्या विरुध्द शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत दि.७.४.२००८ रोजी अपिलकाराने तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.०६.६.२००८ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२२.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.०६.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकार सुनावणीस हजर नव्हते. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली असल्याचे समर्थन करुन अपील निकाली काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ वसाहत अधिकारी (झो.सु.) बृहन्मुंबई महानगरपालिका, एम पूर्व विभाग, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अनधिकृत झोपडी तथा झोपडीदादांच्या विरुध्द शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत दि.७.४.२००८ रोजी अपिलकाराने तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती. सक्षम अधिका-यांच्या अंतिम आदेशानुसार दि.१६.५.२००८ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात झोपडपटदीदादांच्या विरुध्द एमआरटीटी कायद्यानुसार कार्यवाहीसाठी सादर केलेल्या अतिक्रमणाबाबत एमआयआर नोंद झाली आहे किंवा कसे, पोलीस ठाण्यात सादर केलेल्या कागदपत्रांची प्रत अपिलकाराने मागितली होती. सदर माहिती उपलब्ध नसल्याने संबंधित पोलीस खात्याकडून माहिती घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. अनधिकृतरित्या बांधलेल्या झोपडयाचे निष्कासनाबाबत केलेल्या कारवाईची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, अधिनियमातील कलम-२० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील अंशत: मान्य करण्यांत येत आहे.**

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- ३१/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१६०८/०२

श्रीमती तनुजा जयराम शेट्टी आणि
श्रीमती ममता जयराम शेट्टी,
२०४ स्प्रिंगलिफ को.ऑप.हौ.सो.लि.
सात बंगला, अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०६१. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सह निबंधक सहकारी संस्था
मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा
उप निबंधक सहकारी संस्था,
मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर,
फोर्ट, मुंबई-४०० ००१. -------उत्तरवादी.

- **विवेचन** -

अपिलकार श्रीमती तनुजा जयराम शेट्टी,आणि ममता जयराम शेट्टी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.२१.६.२००८ रोजी अर्ज करुन, बेनझीर टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रवर्तकांनी सादर केलेल्या फॉर्म ए बाबतच्या सहपत्राच्या छायाप्रती व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकारांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बेनझीर टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रवर्तकांनी सादर केलेल्या फॉर्म ए बाबतच्या सहपत्राच्या छायाप्रती व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- ३१/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१६११/०२

श्री. चंद्रभान महादेव यादव,
फ्लॅट नं.४, जय भवानी को.ऑप.हौ.सो.लि.
प्लॉट नं.११३/४, बी.ए.आर.सी.फ्लाय ओव्हर जवळ,
मानखुर्द (पूर्व), मुंबई- ४०० ०८८. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,
जय भवानी को.ऑप. हौ.सो.लि.
प्लॉट नं.११३/४, बी.ए.आर.सी.फ्लाय ओव्हर जवळ,
मानखुर्द (पूर्व), मुंबई- ४०० ०८८.

जन माहिती अधिकारी तथा सचिव,
जय भवानी को.ऑप. हौ.सो.लि.
प्लॉट नं.११३/४, बी.ए.आर.सी.फ्लाय ओव्हर जवळ,
मानखुर्द (पूर्व), मुंबई- ४०० ०८८. -------उत्तरवादी.

- **वि वे च न** -

अपिलकार श्री. चंद्रभान महादेव यादव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, जय भवानी को.ऑप.हौ.सो.लि. प्लॉट नं.११३/४, बी.ए.आर.सी. फ्लाय ओव्हर जवळ, मानखुर्द, मुंबई, यांच्याकडे दि.१५.२.२००८ रोजी अर्ज करुन, सदनिका भाडयाने देण्यापूर्वी जिल्हाधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१२.३.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिशाभूल करणारी अपूर्ण व खोटी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन अपील निकाली काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, जय भवानी को.ऑप.हौ.सो.लि. प्लॉट नं.११३/४, बी.ए.आर.सी. फ्लाय ओव्हर जवळ, मानखुर्द, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सदनिका भाडयाने देण्यापूर्वी जिल्हाधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेली माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी असल्याचा मुद्दा अपिलकाराने द्वितीय अपिलात उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- ३१/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१६१२/०२

श्री. शेखर शिवानंद बेंदूर,
फ्लॅट नं.५०२, पाचवा मजला,
दादरकर टॉवर, फिल्म सेंटर समोर,
ताडदेव रोड, मुंबई- ४०० ०३४. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,
इमारती प्रस्ताव (शहर), बृहन्मुंबई महानगरपालिका,
सांकली स्ट्रीट, भायखळा, मुंबई- ४०० ००८.

जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,
इमारती प्रस्ताव (शहर), बृहन्मुंबई महानगरपालिका,
सांकली स्ट्रीट, भायखळा, मुंबई- ४०० ००८. -------उत्तरवादी.

- **<u>वि वे च न</u>** -

अपिलकार श्री. शेखर शिवानंद बेंदूर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, इमारती प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.३१.५.२००८ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.१/४०४, दादरकर कंपाऊंड, ताडदेव, मुंबई येथील मालमत्तेचा पुनर्विकास करण्यासंबंधीच्या कागदपत्राचे निरीक्षण करण्याबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, इमारती प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सटी सर्वे क्र.१/४०४, दादरकर कंपाऊंड, ताडदेव, मुंबई येथील मालमत्तेचा पुनर्विकास करण्यासंबंधीच्या कागदपत्राचे निरीक्षण करण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत निरीक्षणाकरिता कागदपत्र उपलब्ध करुन दिली नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत आवश्यक कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- ३१/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१६१३/०२

श्री. पाटणकर निसारअली मुहम्मद,
२/२०४, आघाडीनगर, पंप हाऊस,
अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी,
मॅनेजमेंट बुराणी कॉलेज, नेसबीट रोड,
माझगांव, मुंबई- ४०० ०१०.

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
बुराणी कॉलेज, आर्टस् आणि कॉमर्स,
नेसबीट रोड, माझगांव, मुंबई- ४०० ०१०. -------उत्तरवादी.

- **वि वे च न** -

अपिलकार श्री. पाटणकर निसारअली मुहम्मद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बुराणी कॉलेज,आर्टस् आणि कॉमर्स, नेसबीट रोड, माझगांव, मुंबई, यांच्याकडे दि.१८.५.२००८ रोजी अर्ज करुन, श्रीमती वहिदा शकील हुरझुक, प्राध्यापक, बुराणी कनिष्ठ महाविद्यालय, यांचेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बुराणी कॉलेज,आर्टस् आणि कॉमर्स, नेसबीट रोड, माझगांव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्रीमती वहिदा शकील हुरझुक, प्राध्यापक, बुराणी कनिष्ठ महाविद्यालय, यांचेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अपिलकारास उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. भविष्यकाळात प्रथम अपिलीय अधिकारी काळजी घेतील अशी अपेक्षा आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

मुंबई,
दिनांक :- ३१/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१६४०/०२

श्री. युसूफ एस. खान,
हाजराबाई हाऊस, २ रा मजला,
ब्लॉक नं.७, इर्ला सोसायटी रोड,
विलेपार्ले (प.), मुंबई- ४०० ०५६. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
इमारती प्रस्ताव (शहर), पश्चिम उपनगरे,
वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,
इमारती प्रस्ताव (शहर), पश्चिम उपनगरे,
वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०. -------उत्तरवादी.

- वि वे च न -

अपिलकार श्री. युसूफ एस.खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, इमारती प्रस्ताव, पश्चिम उपनगरे, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२०.६.२००८ रोजी अर्ज करुन, रुबी हाऊस, ईर्ला सोसायटी रोड, सिटी सर्वे नं.३५२, (१-२३) विलेपार्ले, मुंबई येथील गच्चीवर नवीन भ्रमण दूरध्वनीचा ॲन्टीना बॉक्स बसविल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.७.२००८ च्या पत्रान्वये असे कळविले की, अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची कागदपत्रे जुनी असल्याने जाणिवपूर्वक शोध घेऊनही संबंधित नस्ती सापडली नसल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, इमारती प्रस्ताव, पश्चिम उपनगरे, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, रुबी हाऊस, ईर्ला सोसायटी रोड, सिटी सर्वे नं.३५२, (१-२३) विलेपार्ले, मुंबई येथील गच्चीवर नवीन भ्रमण दूरध्वनीचा ॲन्टीना बॉक्स बसविल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अपिलकारास उक्त अधिनियमात एक संधी आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा त्याचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांक :- ३१/०१/२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/१६४६/०२

श्रीमती (डॉ.) अरुणा बोरा,
जी-२, शिवम, आर. नारकर मार्ग,
पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७५. ------अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,
इमारती प्रस्ताव (शहर), पूर्व उपनगरे,
राज लेगसी कंपाऊंड, एल.बी.एस.रोड,
विक्रोळी (प.) मुंबई- ४०० ०७९.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
इमारती प्रस्ताव (शहर), पूर्व उपनगरे,
राज लेगसी कंपाऊंड, एल.बी.एस.रोड,
विक्रोळी (प.) मुंबई- ४०० ०७९. -------उत्तरवादी.

- वि वे च न -

अपिलकार श्रीमती अरुणा बोरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, पूर्व उपनगरे, विक्रोळी, (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२५.५.२००७ रोजी अर्ज करुन, म्हाडाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये पूरक वापरासाठी एका चिकित्सालया साठी विकास नियंत्रण नियमावली कलम-५१ अन्वये परवानगी आहे किंवा नाही याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती विकास नियंत्रण नियमावली १९९१ अनुसार असल्याने अपिलकाराने नियमावलीची प्रत शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई येथून प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२६.७.२००८ च्या पत्राने कळविले. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२७.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१०.९.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीच्यावेळी चर्चा केल्यानुसार जन माहिती अधिका-याने अपिलकारास माहिती द्यावी. असे नमूद करुन दि.१७.९.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-याने विशिष्ट अशी पुरेशी माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, पूर्व उपनगरे, विक्रोळी, (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, म्हाडाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये पूरक वापरासाठी एका चिकित्सालया साठी विकास नियंत्रण नियमावली कलम-५१ अन्वये परवानगी आहे किंवा नाही याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. विकास नियंत्रण नियमावली नुसार एक चिकित्सालयाच्या वापरासाठी तरतूद असेल तर वापर बदलासाठीच्या परवानगीची गरज आहे का, जर एखादा कुटुंबिय डॉक्टर पुनर्विकासा अगोदर म्हाडाच्या गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीमधील सदनिकेमध्ये १० वर्षापासून दवाखाना चालवित असेल जर सदर इमारतीच्या पुनर्विकासानंतर दवाखान्यासाठीच्या वापर बदलासाठी परवानगी घेणे गरजेचे आह का, असे किती दवाखाने म्हाडाच्या गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीमध्ये सुरु आहेत, वापरी बदलासाठी नोटीस देण्यात आली आहे का, इ.माहिती मागितली होती. अपिलकाराने विचारलेले प्रश्न हे विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीला अनुसरुन असल्याने जन माहिती अधिका-यांनी त्यांच्या

दि.२७.७.२००७ च्या पत्राने अपिलकारास विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदी संदर्भित करण्या विषयी कळविले आहे. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी संमर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशान्श्रवय कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**आदेश निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६४८/०२**

**श्री. योगेश हरिश्चंद्र केणी,**
**१२३, केणी हाऊस, भंडारवाडा,**
**पन्नालाल घोष मार्ग, मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४. ------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का.),**
**पश्चिम उपनगरे, प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप जिल्हाधिकारी (अति/निष्का.)**
**गोरेगांव (पश्चिम), मुंबई. -------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. योगेश हरिश्चंद्र केणी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अति/निष्का), गोरेगांव (प.), मुंबई, यांच्याकडे दि.०६.२.२००८ रोजी अर्ज करुन, चिंचवली बंद रोड, सर्वे क्र,४६४, सिटीएस क्र.२४३, मालाड (प.) मुंबई- ६४ या पत्त्यावरील श्री.धर्मराज कन्हैयालाल तिवारी यांच्या नावे असलेले झोपडी क्र.PXC ४-१/१A दि.२४.१२.१९७९ या सेंन्सर्स सर्टिफिकेटची सत्यता पडताळण्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेला मूळ अभिलेख कार्यालयात आढळून येत नाही. त्यामुळे मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.७.६.२००७ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २८.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. गणना पत्रकाची प्रत हवी असल्यास शुल्क भरुन प्रत घेऊन जावी. अर्जातील मुद्दा क्र.१,२, ३ बाबत माहिती कार्यालयाशी निगडित नसल्यामुळे उपजिल्हाधिकारी, मालाड यांच्या कार्यालयातून घेण्याबाबत अपिलकारास कळविण्यांत आले. असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.९.५.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अति/निष्का), गोरेगांव (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, चिंचवली बंद रोड, सर्वे क्र,४६४, सिटीएस क्र.२४३, मालाड (प.) मुंबई- ६४ या पत्त्यावरील श्री.धर्मराज कन्हैयालाल तिवारी यांच्या नावे असलेले झोपडी क्र.PXC ४-१/१A दि.२४.१२.१९७९ या सेंन्सर्स सर्टिफिकेटची सत्यता पडताळण्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. कार्यालयामार्फत दिलेले सेन्सर्स सर्टिफिकेट खरे आहे की खोटे, सेन्सर्स सर्टिफिकेट कोणत्या कागदपत्राच्या आधारे दिले आहे याबाबत अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने अपिलकाराचे समाधान झाले नाही. माहितीच्या अर्जातील मुद्दा क्र.१, २ व ३ कार्यालयाशी संबंधित नव्हते. तेव्हा उक्त अधिनियमातील कलम ६ (२) अनुसार अपिलकाराचा अर्ज संबंधित सार्वजनिक प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, मालाड यांचेकडे पाच दिवसाचे आत हस्तांतरित करुन विहित कालावधीत माहिती देण्याबाबत त्यांना कळविणे आवश्यक होते. सदर प्रकरणी तशी कार्यवाही विहित कालावधीत केलेली नाही. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांची सदर कृती निश्चितच

योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराचा अर्ज संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे हे आदेश प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाचे आत हस्तांतरित करावा व तसे अपिलकारास अवगत करावे.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६३९/०२**

**श्री. युसूफ एस. खान,**
**हजराबाई हाऊस, २ रा मजला,**
**ब्लॉक नं.७, इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**इमारती प्रस्ताव, पश्चिम उपनगरे,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इमारती प्रस्ताव, पश्चिम उपनगरे,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **-------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. युसूफ एस.खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता इमारती प्रस्ताव, पश्मिच उपनगरे, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि.१९.६.२००८ रोजी अर्ज करुन, सर्वश्री जमालुद्दीन शेख, खाजमुद्दीन शेख, सिराजउद्दीन शेख आणि ख्वाजा शेख यांना दि.९.८.२००७ रोजी पाठविण्यात आलेल्या नोटीसीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

कागदपत्राचे निरीक्षण करण्याकरिता अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२१.७.२००८ च्या पत्राने कळविले. कागदपत्राचे निरीक्षण करुन विहित शुल्क भरल्यानंतर आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती देण्याचे कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता इमारती प्रस्ताव, पश्मिच उपनगरे, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सर्वश्री जमालुद्दीन शेख, खाजमुद्दीन शेख, सिराजउद्दीन शेख आणि ख्वाजा शेख यांना दि.९.८.२००७ रोजी पाठविण्यात आलेल्या नोटीसीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६३८/०२**

**श्री. युसूफ एस. खान,**
**हजराबाई हाऊस, २ रा मजला,**
**ब्लॉक नं.७, इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**इमारती प्रस्ताव, पश्चिम उपनगरे, भाभा हॉस्पिटल,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इमारती प्रस्ताव, पश्चिम उपनगरे,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **-------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. युसूफ एस.खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता इमारती प्रस्ताव, पश्मिच उपनगरे, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि. १९.६.२००८ रोजी अर्ज करुन, सर्वश्री महेश खिमजी शहा, हितेन शहा, सिराजुद्दीन शेख, रुबी हाऊस, गॅरेज

नं.१ ते४, इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (प.), मुंबई यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती.

कागदपत्राचे निरीक्षण करण्याकरिता अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२१.७.२००८ च्या पत्राने कळविले. कागदपत्राचे निरीक्षण करुन विहित शुल्क भरल्यानंतर आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती देण्याचे कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता इमारती प्रस्ताव, पश्मिच उपनगरे, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सर्वश्री महेश खिमजी शहा, हितेन शहा, सिराजुद्दीन शेख, रुबी हाऊस, गॅरेज नं.१ ते४, इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (प.), मुंबई यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६३५/०२**

**डॉ. राजीव केशव जोशी,**
**वैद्यकीय अधिकारी,**
**रा.का.वि.यो. रुग्णालय,**
**वाशी, नवी मुंबई- ४०० ७०३.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **-------उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार डॉ. राजीव केशव जोशी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.१३.४.२००८ रोजी अर्ज करुन, कर्मचारी/अधिका-यांची वर्गवारी रद्द करुन गटवारी करणारा शा.नि.क्र.एसआरव्ही-१००८/प्र.क्र. १३/ ८८/

१२, दि.२९.७.१९९३ अंमलात आल्यानंतर वैद्यकीय अधिका-यांना गट अ ऐवजी वर्ग-२ असे संबोधले गेले. याबाबत अनुषंगिक  माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.६.६.२००८ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.३०.८.२००८ आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, कर्मचारी/अधिका-यांची वर्गवारी रद्द करुन गटवारी करणारा शा.नि.क्र.एसआरव्ही-१००८/प्र.क्र.१३/ ८८/ १२, दि.२९.७.१९९३ अंमलात आल्यानंतर वैद्यकीय अधिका-यांना गट अ ऐवजी वर्ग-२ असे संबोधले गेले. याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. पदनामावर पदाची वर्गवारी करणारी नियमावली एकेकाळी अंमलात होती का, याबाबत जन माहिती अधिका-यांनी, पदनामावर पदाची वर्गवारी ठरविण्याची बाब आता नवीन गटवारी प्रचलित झाल्यानंतर गैरलागू झाली आहे असे उत्तर दिले.  या उत्तरावरुन सिध्द होते की, पदनामावर पदाची वर्गवारी करणारी नियमावली एकेकाळी अस्तित्वात होती असे अपिलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. याबाबत माहिती पुरविण्याचा मुद्दा अपिलकाराने द्वितीय अपिलात उपस्थित केला आहे. याबाबत जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने अपिलकाराचे समाधान झाले नाही. या परिस्थितीत  मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास आवश्यक कागदपत्राचे निरीक्षण करण्याकरिता उपलब्ध करुन दयावेत. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्राचे निरिक्षण करावेत. त्यानंतर मागणीप्रमाणे संबंधित कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास उपलब्ध करुन द्याव्यात. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६३४/०२**

**श्री. ॲरोन टी.नादार,**
**११/१०३, शार्दुल को.ऑप.हौ.सो.लि.**
**छत्रपती शिवाजी राजे कॉम्प्लेक्स, म्हाडा,**
**चारकोप, कांदिवली (प.),मुंबई- ४०० ०६७.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप नियंत्रक**
**शिधावाटप यांचे कार्यालय,**
**ग परिमंडळ, कांदिवली हितवर्धक मंडळ,**
**एस.व्ही.मार्ग, कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,**
**शिधावाटप यांचे कार्यालय,**
**ग परिमंडळ, कांदिवली हितवर्धक मंडळ,**
**एस.व्ही.मार्ग, कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.** **-------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. ॲरोन टी.नादार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शिधा वाटप अधिकारी, ग परिमंडळ, कांदिवली हितवर्धक मंडळ, कांदिवली (प.), मुंबई, यांच्याकडे दि.१०.७.२००८ रोजी अर्ज करुन, शिधा पत्रिकेमध्ये नावाचा समावेश करण्याकरिता सादर केलेल्या अर्जावरील केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.७.२००८ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ०७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणी करिता अपिलकार हजर राहिले नाहीत. माहितीच्या अर्जातील विचारलेली माहिती पूर्णपणे व मुद्देसूद अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांस दि.१८.८.२००८ च्या पत्राने आदेश दिले. अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, ग परिमंडळ, कांदिवली (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, शिधा पत्रिकेमध्ये नावाचा समावेश करण्याकरिता सादर केलेल्या अर्जावरील केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. शिधावाटप निरीक्षक श्री.पाटील यांनी दि.२२.७.२००७ रोजी चौकशी पूर्ण करुन अपिलकाराची पत्नी आणि तीन मुलांची नांवे शिधा पत्रिकेत समाविष्ट करण्याची शिफारस केली होती. ही शिफारस त्याच दिवशी म्हणजे दि.२२.७.२००७ रोजी मान्य झाली होती. अपिलकाराने कार्यालयाशी संपर्क साधून पत्नी आणि तीन मुलांची नावे शिधा पत्रिकेत समाविष्ट करुन घ्यावीत असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.७.२००८ च्या पत्राने कळविले होते असे सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६३७/०२**

**श्री. भूषण भगवानदास पटेल- धोडी,**
**भगवानदास हाऊस, सी/१६,**
**चिंचोली बंद रोड,**
**मालाड (प.),मुंबई- ४०० ०६४.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप नियंत्रक**
**शिधावाटप यांचे कार्यालय,**
**ग परिमंडळ, कांदिवली हितवर्धक मंडळ,**
**एस.व्ही.मार्ग, कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,**
**शिधावाटप यांचे कार्यालय,**
**ग परिमंडळ, कांदिवली हितवर्धक मंडळ,**
**एस.व्ही.मार्ग, कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.** **-------उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री.भूषण भगवानदास पटेल-धोडी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शिधा वाटप अधिकारी, ग परिमंडळ, कांदिवली हितवर्धक मंडळ, कांदिवली (प.), मुंबई, यांच्याकडे दि.१७.३.२००७ रोजी अर्ज करुन, मौ.मालाड, दक्षिण जिल्हा बोरीवली सर्वे क्र.४४८, हिस्सा नं.१ व २ आणि ४४८, हिस्सा १ ते १३, या जागेत अपिलकाराची संमत्ती न घेता त्यांचे काका

श्री.चिमण माकणजी धोडी यांनी श्री स्वामी समर्थ गृहनिर्माण संस्था, इंद्रप्रस्थ यांना विकली असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन, अपिलकारास भूखंडाची नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश पारित केले. भूखंडाची नस्ती निरीक्षणा करिता उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शिधा वाटप अधिकारी, ग परिमंडळ, कांदिवली हितवर्धक मंडळ, कांदिवली (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मौ.मालाड, दक्षिण जिल्हा बोरीवली सर्वे क्र.४४८, हिस्सा नं.१ व २ आणि ४४८, हिस्सा १ ते १३, या जागेत अपिलकाराची संमत्ती न घेता त्यांचे काका श्री.चिमण माकणजी धोडी यांनी श्री स्वामी समर्थ गृहनिर्माण संस्था, इंद्रप्रस्थ यांना विकली असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराच्या भूखंडासंबंधीची नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. सदर आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे संबंधित नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती दयाव्यात. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/८१२/०२**

**श्री. आर. आर. त्रिपाठी,**
**१०१, एफ विंग, शांतीनगर कॉम्प्लेक्स,**
**नारपोली व्हिलेज, अंजूरफाटा,**
**भिवंडी, जिल्हा ठाणे. ------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी,**
**जुना एस.टी. स्टँड काम अली,**
**भिवंडी- ३०३, जिल्हा ठाणे.**

**जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी,**
**जुना एस.टी. स्टँड काम अली,**
**भिवंडी- ३०३, जिल्हा ठाणे. -------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आर.आर.त्रिपाठी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी, जि.ठाणे, यांच्याकडे दि.१२.१२.२००६ रोजी अर्ज करुन, भिवंडी येथील सर्व प्रभागात किती खाजगी कॉम्प्लेक्स/ घरे दुरुस्ती अथवा अन्य सेवाकरिता नगरपालिका/ महानगरपालिकेने किती पैसे खर्च केले इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकाराच्या वतीने वकील हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी, जि.ठाणे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, भिवंडी येथील सर्व प्रभागात किती खाजगी कॉम्प्लेक्स/ घरे दुरुस्ती अथवा अन्य सेवाकरिता नगरपालिका/ महानगरपालिकेने किती पैसे खर्च केले इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५८५/०२**

**श्री. आनंद सोपान पारगांवकर,**
**रुम नं.११४५, फुले नगर,**
**आय.आय.टी.मार्केट,**
**पवई, मुंबई- ४०० ०७६.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त,**
**बृहन्मंबई महानगरपालिका, परिमंडळ-६,**
**घाटकोपर, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मंबई महानगरपालिका, एस विभाग,**
**मंगतराम पेट्रोलपंपाजवळ, एल.बी.एस.मार्ग,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.** **------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. आनंद सोपान पारगांवकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग, भांडूप (प.), मुंबई, यांच्याकडे दि. १७.३.२००८ रोजी अर्ज करुन, एस वॉर्ड कार्यालयात वर्तमानपत्राचे वाटप न करण्याबाबत मनपातर्फे काही प्रस्ताव किंवा लेखी सूचना पारित करण्यात आल्या आहेत का, असल्यास त्याची कारणे, सविस्तर माहिती, प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.०५.४.२००८ च्या पत्राने माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०२.५.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश

पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग, भांडूप (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, एस वॉर्ड कार्यालयात वर्तमानपत्राचे वाटप न करण्याबाबत मनपातर्फे काही प्रस्ताव किंवा लेखी सूचना पारित करण्यात आल्या आहेत का, असल्यास त्याची कारणे, सविस्तर माहिती, प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-या कडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात एक संधी आहे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकाराचा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५८६/०२**

**श्री. आनंद सोपान पारगांवकर,**
**रुम नं.११४५, फुले नगर,**
**आय.आय.टी.मार्केट,**
**पवई, मुंबई- ४०० ०७६.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मंबई महानगरपालिका, एस विभाग,**
**मंगतराम पेट्रोलपंपाजवळ, एल.बी.एस.मार्ग,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.)**
**बृहन्मंबई महानगरपालिका, एस विभाग,**
**मंगतराम पेट्रोलपंपाजवळ, एल.बी.एस.मार्ग,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.** **------उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. आनंद सोपान पारगांवकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग, भांडूप (प.), मुंबई, यांच्याकडे दि.३१.३.२००८ रोजी अर्ज करुन, आय.आय.टी.मार्केट पवई, मुंबई येथील पद्मावती रोड येथे प्रियादर्शनी इमारतीच्या बाजूला पद्मावती को.ऑप.हौ.सो.समोर ज्या सात मजल्याच्या बिल्डिंगचे बांधकाम चालू आहे त्या बिल्डिंगला कोणते नाव दिले आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती

दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग, भांडूप (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, आय.आय.टी.मार्केट पवई, मुंबई येथील पद्मावती रोड येथे प्रियादर्शनी इमारतीच्या बाजूला पद्मावती को.ऑप.हौ.सो.समोर ज्या सात मजल्याच्या बिल्डिंगचे बांधकाम चालू आहे त्या बिल्डिंगला कोणते नाव दिले आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास आवश्यक ती माहिती द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५८७/०२**

**श्री. गजानन विठ्ठल मालप,**
**अ/४०३, न्यू समाधान दत्तगुरु को.ऑ.हौ.सो.लि.(झो.पु.प्रा.)**
**फा. प्लॉट १०, सेनापती बापट मार्ग,**
**दादर, मुंबई- ४०० ०२८.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा अभियांत्रिकी कक्ष,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. गजानन विठ्ठल मालप,, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि. १७.३.२००८ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२१६, सेनापती बापट मार्ग, नवीन समाधान दत्तगुरु सहकारी गृहनिर्माण संस्था, दादर या संस्थेबाबतची कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्याबाबत, त्यानंतर मागणीनुसार आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. त्यानंतर अपिलकाराने दोन दिवसात म्हणजे दि. १९.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०६ मे,२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. दोन महिन्यात अपिलकाराने मागणी केलेली माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिका-यांना तोंडी आदेश दिले. लेखी आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी

सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२१६, सेनापती बापट मार्ग, नवीन समाधान दत्तगुरु सहकारी गृहनिर्माण संस्था, दादर या संस्थेबाबतची कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्याबाबत, त्यानंतर मागणीनुसार आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.६.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. सदर सुनावणीमध्ये त्यांना हवी असलेली न्यू समाधान दत्तगुरु या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या धारिकेची माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश दिले होते. धारिकेची एकूण किती पाने व त्याचे शुल्क यासंदर्भात कळविण्याबाबत अपिलकाराने प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी विनंती केली होती. संबंधित धारिकेची २९६० पाने व १०५ नकाशे असून, त्याकरिता एकूण रु.११,१७०/- एवढे शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.११.७.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. त्यानंतर अपिलकाराने शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली नाही. असे प्रथम अपिलिय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपिलकाराने कार्यालयाकडे संपर्क साधल्यास अपिलकारास हवी असलेली माहिती देण्याचीही तयारी दर्शविली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयाशी संपर्क साधवा. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५८८/०२**

**श्री. मनोहर जी. समतानी,**
**बी/१६, शांती सागर को.ऑ.हौ.सो.लि.**
**२ रा मजला, प्लॉट नं.७७७, एस.व्ही.रोड,**
**खार (प.), मुंबई- ४०० ०५२.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**लघुवाद न्यायालय, पिकेट रोड,**
**काळबादेवी, मुंबई- ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा निबंधक,**
**लघुवाद न्यायालय, पिकेट रोड,**
**काळबादेवी, मुंबई- ४०० ००२.** **------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. मनोहर जी. समतानी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा निबंधक, लघुवाद न्यायालय, पिकेट रोड, काळबादेवी, मुंबई, यांच्याकडे दि.१८.२.२००८ रोजी अर्ज करुन, वांद्रे येथील लघुवाद न्यायालयात (पूर्वीच्या न्यायालय क्र.३३ व आताचे न्यायालय क्र.३६ ) जानेवारी, २००५ पासून आतापर्यंत किती प्रकरणात कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती कलम ८ व ९ अनुसार देता येत नाही, अपिलकाराचा अर्ज विहित नमुन्यात नाही, अपिलकाराने माहितीपोटी रु.१२/-इतके शुल्क विहित कालावधीत भरलेले नाही. कलम २४ (४) अनुसार माहिती पुरविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. आलिकाराने मागणी केलेली माहिती न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२७.२.२००८ च्या पत्राने अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१३.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही.

यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा निबंधक, लघुवाद न्यायालय, पिकेट रोड, काळबादेवी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वांद्रे येथील लघुवाद न्यायालयात (पूर्वीच्या न्यायालय क्र.३३ व आताचे न्यायालय क्र.३६ ) जानेवारी, २००५ पासून आतापर्यंत किती प्रकरणात कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५८९/०२**

**श्री. सेबस्टीन वर्गीस,**
**रुम नं.३, लॉरेन्स मेंडोसा हाऊस,**
**भंडारवाडा, मरोळ,अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०५९.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र,१६७,**
**मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र,१६७,**
**मुंबई- ४०० ००१.** **------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सेबस्टीन वर्गीस, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मुंबई, यांच्याकडे दि. २५.२.२००८ रोजी अर्ज करुन, शिवाजीराव जोंधळे, अभियंता महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व) यांनी सन २००४-०५ ते २००७-०८ या कालावधीत आकारण्यात आलेल्या फी बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, शिवाजीराव जोंधळे, अभियंता महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व) यांनी सन २००४-०५ ते २००७-०८ या कालावधीत आकारण्यात आलेल्या फी बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जातील काही माहिती जोंधळे अभियंता कॉलेज, डोंबिवली यांचेशी संबंधित होती. ती त्यांना देण्याविषयी तंत्र शिक्षण संचालनालयाने कळविले होते. माहितीचा अधिकार संस्थेस लागू नसल्याचे महाविद्यालयाने विभागास कळविले होते. म्हणून अपिलकाराने दाखल केलेल्या प्रथम अपिलावर दि.०७.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीकरिता जोंधळे महाविद्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर संस्थेला माहितीचा अधिकार लागू असल्याने माहितीच्या अधिकारात अर्ज करणा-या अर्जदारांना आवश्यक ती माहिती द्यावी. महाविद्यालयात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी नेमण्यात यावेत असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी महाविद्यालयास कळविले असल्याचे सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती महाविद्यालयाने अद्याप दिलेली नाही. या परिस्थितीत  मी असे आदेश देतो की, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी अपिलकारास मागणी प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जोधळे अभियंता महाविद्यालयाच्या प्राचार्यांना हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना द्याव्यात.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५९०/०२**

**श्री. प्रमोद लक्ष्मण कदम,**
**१६/डी-३, श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**एस.व्ही.पी.नगर, म्हाडा,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५३.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सो.प्रशासक,**
**वर्सोवा अंधेरी, श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**एस.व्ही.पी.नगर, म्हाडा,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५३.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रमोद लक्ष्मण कदम, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सो. प्रशासक, वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.म्हाडा, अंधेरी (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२६.४.२००८ रोजी अर्ज करुन, वर्सोवा अंधेरी येथील श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था,प्लॉट क्र.१६, एसव्हीपी नगर, म्हाडा अंधेरी, मुंबई या संस्थेशी निगडीत प्रश्नाविषयी एकूण २३ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.०३.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती १० दिवसाच्या आत अपिलकारास उपलब्ध करुन देण्याबाबत प्रभम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना दि.२३..७.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी चुकीची माहिती दिली असल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सो. प्रशासक, वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.म्हाडा, अंधेरी (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वर्सोवा अंधेरी येथील श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था,प्लॉट क्र.१६, एसव्हीपी नगर, म्हाडा अंधेरी, मुंबई या संस्थेशी निगडीत प्रश्नाविषयी एकूण २३ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विलंबाने दि.१०.७.२००८ च्या पत्राने माहिती दिली. सदर माहिती चुकीची, असमाधानकारक असल्याबाबत अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित धारिका निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित धारिकेचे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५९१/०२**

**श्री. रविंद्र च. चिपळूणकर,**
**शिव शक्ती चाळ, भांबेरकर नगर,**
**चारकोप, कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०९५.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ उत्तर विभाग,**
**मामलेतदार वाडी, लिबर्टी गार्डन**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ उत्तर विभाग,**
**मामलेतदार वाडी, लिबर्टी गार्डन**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रविंद्र च.चिपळूणकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग, मालाड (प.), मुंबई, यांच्याकडे दि.१८.२.२००८ रोजी अर्ज करुन, हॉटेल दम लगाके बी.बी.सी. रेस्टॉरंट, चिंचोली बंदर, लिंक रोड, टॉयटा शोरुम जवळ, मालाड यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-याने अपिलकारास सात दिवसात सुधारित उत्तर दयावे तसेच कागदपत्राच्या छायाप्रती देण्यात याव्यात असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१.७.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याच्या कारणामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग, मालाड (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, हॉटेल दम लगाके बी.बी.सी. रेस्टॉरंट, चिंचोली बंदर, लिंक रोड, टॉयटा शोरुम जवळ, मालाड यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मनपा अधिनियम कलम ३५१ अन्वये केलेल्या कारवाईची अद्ययावत माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५९२/०२**

**श्री. अशोककुमार मारुती शिंदे,**
**अवंती अंबर अपार्टमेंट, अंबर तळमजला,**
**ना.दा.रोड, मलबार हिल, मुंबई- ४०० ००६.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इलाखा शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,**
**विकास विभाग इमारत, ३ रा मजला,**
**जुने जकात घर आवार, मुंबई- ४०० ०२३.** **------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. अशोककुमार मारुती शिंदे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाखा शहर, जुने जकात घर आवार, मुंबई, यांच्याकडे नोव्हेंबर, २००६ मध्ये अर्ज करुन, श्री.अशोक कुमार मारुती शिंदे, चेंबूर, मुंबई यांनी श्री.जी.ए. सावंत, उपविभागीय अधिकारी, यांना दि.२५.९.२००६ रोंजी लिहिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती , पत्राची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाखा शहर, जुने जकात घर आवार, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.अशोक कुमार मारुती शिंदे, चेंबूर, मुंबई यांनी श्री.जी.ए. सावंत, उपविभागीय अधिकारी, यांना दि.२५.९.२००६ रोंजी लिहिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती , पत्राची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५९६/०२**

**श्री. अमजद आर. रेडकर,**
**तिरंगा को.ऑ.हौ.सो. फ्लॅट क्र,१४०, रुम नं.सी-१०,**
**समता कॉम्प्लेक्स, म्हाडा नं.८,**
**मालवणी, मालाड (प.) मुंबई- ४०० ०९५.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** **------उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. अमजद आर. रेडकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग, मामलेतदार वाडी, मालाड (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२७.२.२००८ रोजी अर्ज करुन, अंकल्स किचनच्या हॉटेलच्या मालकाने बांधकामाबाबत मागितलेली परवानगीची प्रत तसेच खात्यामार्फत बांधकाम उभारण्याकरिता देण्यात आलेल्या परवानगीची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन अपिलकारास सात दिवसाच्या आत माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना दि.८.७.२००८ रोजी आदेश पारित केले. अपिलकारास माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिका-याने माहिती देण्यास टाळाटाळ केली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग, मामलेतदार वाडी, मालाड (प.)मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अंकल्स किचनच्या हॉटेलच्या मालकाने जन माहिती अधिका-याच्या खात्यामार्फत मागितलेली तसेच खात्यामार्फत बांधकाम उभारण्याकरिता देण्यात आलेल्या परवानगीची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५९७/०२**

**श्री. अमजद आर. रेडकर,**
**तिरंगा को.ऑ.हौ.सो. फ्लॅट क्र,१४०, रुम नं.सी-१०,**
**समता कॉम्प्लेक्स, म्हाडा नं.८,**
**मालवणी, मालाड (प.) मुंबई- ४०० ०९५.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** **------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. अमजद आर. रेडकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग, मामलेतदार वाडी, मालाड (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२८.४.२००८ रोजी अर्ज करुन, अनधिकृत बांधकामाबाबत दि.२३.४.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास सात दिवसाच्या आत माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.७.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिर्क्ाेे, पी/उत्तर विभाग, मामलेतदार वाडी, मालाड (प.)मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अनधिकृत बांधकामाबाबत दि.२३.४.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित करुनही जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५९८/०२**

**श्री. अमजद आर. रेडकर,**
**तिरंगा को.ऑ.हौ.सो. फ्लॅट क्र,१४०, रुम नं.सी-१०,**
**समता कॉम्प्लेक्स, म्हाडा नं.८,**
**मालवणी, मालाड (प.) मुंबई- ४०० ०९५.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. अमजद आर रेडकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग, मामलेतदार वाडी, मालाड (प.), मुंबई, यांच्याकडे दि.११.२.२००८ रोजी अर्ज करुन, इमारत खात्यातील अधिकारी तसेच इमारत खात्यामार्फत झालेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन अपिलकारास हव्या असलेल्या माहितीच्या छायाप्रती ताबडतोब द्याव्यात असे जन माहिती अधिका-यांना आदेश देवून दि.८.७.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग, मामलेतदार वाडी, मालाड (प.)मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, इमारत खात्यातील अधिकारी तसेच इमारत खात्यामार्फत झालेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित करुनही जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६०१/०२**

**डॉ. मंगेश रंगनाथराव थेटे,**
**१३, शीतल आदर्श हौसिंग सोसायटी,**
**नवीन सिडको कार्यालयामागे,**
**नवीन सिडको, नाशिक- ४२२ ००९.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मंगेश रंगनाथराव थेटे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.१७.६.२००८ रोजी अर्ज करुन, डॉ.मंगेश थेटे यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०२.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, डॉ.मंगेश थेटे यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. डॉ.मंगेश थेटे, रा.नाशिक यांची सन २००२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत क्ष किरण तज्ञ या पदासाठी निवड झाली आहे. डॉ.थेटे यांचा नाशिक शहरातच नियुक्ती मिळण्याचा आग्रह आहे. तथापि, रिक्त पदाअभावी किंवा अन्य प्रशासकीय कारणामुळे डॉ.थेटे यांना नाशिक येथे नियुक्ती देणे शक्य झाले नाही. परंतु सध्या नाशिक येथे सुपर स्पेशालिटी रुग्णालय क्ष किरण तज्ञाचे एक पद रिक्त झाले असून सदर पदावर डॉ.थेटे यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपिलकाराने मागणी केलेली बाब सेवाविषयक असल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून नेमणूक करण्याकरिता अपिलकाराने सक्षम प्राधिका-याकडे संपर्क साधणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रतिपादन केल्यानुसार अपिलकारास नेमणूक देण्याची बाब विचाराधीन असल्याचे दिसून येते. सदर बाब राज्य माहिती आयोगाच्या कार्यकक्षत येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६००/०२**

**श्री. उमाशंकर मातादीन कश्यप,**
**राज्य कामगार विमा योजना,**
**रुग्णालय वसाहत, रुम नं.४/१०,**
**सातपूर, नाशिक- ०७.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय,**
**महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, ३ रा मजला,**
**परेल, मुंबई- ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (प्रशासन),**
**राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय,**
**महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, ३ रा मजला,**
**परेल, मुंबई- ४०० ०१२.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. उमाशंकर मातादीन कश्यप, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (प्रशासन), राज्य कामगार विमा योजना,परेल, मुंबई, यांच्याकडे दि. १४.२.२००८ रोजी अर्ज करुन, रुग्णवाहिका सेवा पुरविण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१८.३.२००८ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२३.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करण्यांत आले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (प्रशासन), राज्य कामगार विमा योजना,परेल, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, रुग्णवाहिका सेवा पुरविण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. याबाबत जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत समाधानकारक माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत सविस्तर माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६४१/०२**

**श्री. विद्यांचल धनिराम सिंग,**
**डीआर-४/७०३, एमएमआरडीए बिल्डिंग,**
**शिवाजी नगर, राम मंदिर रोड,**
**ओशिवरा, गोरंगाव (प.),मुंबई-४०० १०४.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह प्रकल्प संचालक,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन विभाग,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विद्यांचल डी.सिंग, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२६.१२.२००७ रोजी अर्ज करुन, स्वतंत्र चाळ, रुम नं.पीएक्स-६६- १७- १३२- इटभट्टी, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील श्रीमती आशा सिंग यांना पर्यायी निवासस्थान देण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. श्रीमती आशा सिंग यांना पर्यायी निवासस्थान देण्याची मागणी मान्य करता येत नसल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३०.५.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, स्वतंत्र चाळ, रुम नं.पीएक्स-६६- १७- १३२- इटभट्टी, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील श्रीमती आशा सिंग यांना पर्यायी निवासस्थान देण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. भूमिशाखेने उपलब्ध नकाशानुसार इटभट्टी येथील आय.डी. क्र.१७० एकच झोपडे अस्तित्वात होते व ते निष्कासित करण्यात आले. निष्कासनाच्या वेळेस आय.डी.क्र.१७०-अे हे झोपडे अस्तित्वात नव्हते. त्यामुळे आय.डी.क्र.१७०-अे च्या पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे उपजिल्हाधिकारी यांनी अहवालात नमूद केले आहे. निष्कासित केलेल्या आय.डी.क्र.१७० च्या बदल्यात अर्जदारास ओशिवरा येथे इमारत क्र.डी.आर.४ पर्यायी सदनिका क्र.७०३ वितरित केली आहे. अपिलकाराने सादर केलेले माहे जानेवारी, १९९० चे वीज बिल हे खोली क्र.१६, स्वतंत्रता चाळ क्र. .पीएक्स-६६-१७- १३२ चे असून ते श्रीमती आशा सिंग यांचे नावे आहे. त्याचा मीटर क्र.एलएफआय-११५५७९० असा आहे. पुरावा म्हणून सादर केलेले वीज बिल सदर क्रमांकाचे आहे. यावरुन सादर केलेले वीज बिल आय.डी. क्र.१७० अे चे नसून ते आय.डी.क्र.१७० चे असल्याचे स्पष्ट होते. त्यामध्ये अपिलकारासह श्रीमती आशा सिंग रहात होत्या. यावरुन असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी पुरविलेली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६४२/०२**

**श्री. प्रमोद लक्ष्मण कदम,**
**१६/डी-३, वर्सोवा अंधेरी,**
**श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**एस.व्ही.पी.नगर, म्हाडा,**
**अंधेरी (प.),मुंबई-४०० ०५३.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सो. प्रशासक,**
**वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**एस.व्ही.पी.नगर, म्हाडा,**
**अंधेरी (प.),मुंबई-४०० ०५३.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रमोद लक्ष्मण कदम, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सो. प्रशासक, वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, एस. व्ही. पी. नगर, म्हाडा, अंधेरी (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२५.४.२००८ रोजी अर्ज करुन, वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, एस. व्ही. पी. नगर, म्हाडा, अंधेरी (प.), मुंबई या संस्थेबाबत एकूण ८ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१३.५.२००८ च्या पत्राने माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन जन माहिती अधिका-यांनी योग्य व अचूक माहिती अपिलकारास दहा दिवसात दयावी असे दि.११.८.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी बरीचशी चुकीची माहिती दिली असल्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती

आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सो. प्रशासकख वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, एस. व्ही. पी. नगर, म्हाडा, अंधेरी (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, एस. व्ही. पी. नगर, म्हाडा, अंधेरी (प.), मुंबई या संस्थेबाबत एकुण ८ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती चुकीची, दिशाभूल करणारी असल्याचा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन दयावीत. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्रांचे निरीक्षण करावे. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी मागणीनुसार उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६४३/०२**

**श्री. सूरज भगवान पवार,**
**अ ३/४, शाहू नगर, जास्मीन मील रोड,**
**माहीम, (पूर्व.),मुंबई-४०० ०१७. ------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. ------उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. सूरज भगवान पवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२०.५.२००८ रोजी अर्ज करुन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, पै.६१६, सहकारी एस.आर.ए. क्र.११११३ गृहनिर्माण सहकारी संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२१.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, पै.६१६, सहकारी एस.आर.ए. क्र.११११३ गृहनिर्माण सहकारी संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराचा दि.२०.५.२००८ चा माहितीच्या अधिकारातील अर्ज व दि.२१.६.२००८ च्या अपील अर्जास अनुसरुन अपिलकारास दुरध्वनीद्वारे प्रत्यक्ष कार्यालयात बोलाविण्यात आले होते. अपिलकारास डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची फाईल / पेपर्स प्रत्यक्ष दाखविण्यात आले. त्या नंतर आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास पुरविण्यात आल्या असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी पुरविली असल्याचे दिसून येते. सबब, या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६४४/०२**

**श्रीमती शीला किशोर आंब्रे,**
**३, जावळे भटवाडी, गोखले रोड,**
**दादर, (प.),मुंबई-४०० ०२८.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर, (प.),मुंबई-४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(शहर),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर, (प.),मुंबई-४०० ०२८.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती शीला किशोर आंब्रे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर (प.), मुंबई, यांच्याकडे दि.१६.४.२००८ रोजी अर्ज करुन, प्लॉट नं.५७०, टीपीएस-४, माहीम येथील प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२६.६.२००८ च्या पत्राने अपिलकारास असे कळविले की, बांधकामाच्या आराखडयाची प्रत सचिव, पुनर्वसन प्राधिकरणाशी संबंधित असल्याने अपिलकाराचा अर्ज सदर प्राधिकरणाकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. परिशिष्ट-२ च्या प्रतीकरिता कार्यालयात रु.२५/-इतके शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.०२.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास श्रीमती लक्ष्मीबाई पोशेट्टी उलेगा यांचेबाबत आवश्यक ती माहिती पुरवावी असे नमूद करुन दि.८.७.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास श्रीमती लक्ष्मीबाई पोशेट्टी उलेगा यांचेबाबतचे संबंधित कागदपत्र कार्यालयात उपलब्ध नसल्याने मागितलेली माहिती देता येणार नाही

असे दि.१९.७.२००८ च्या पत्राने कळविले. माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, प्लॉट नं.५७०, टीपीएस-४, माहीम येथील प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी संबंधित कागदपत्र उपलबध होत नसल्याबाबत जाणिवपूर्वक निर्णय घेऊन हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास कळवावे.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६४७/०२**

**श्री. ऑलवीन दास,**
**बि.नं.२ अे, फ्लॅट नं.४१०,**
**वृंदावन को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्रतिक्षा नगर, सायन कोळीवाडा,**
**सायन, (पूर्व.),मुंबई-४०० ०२२.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सह मुख्य अधिकारी, टीसी (आरआर),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप मुख्य अधिकारी, टीसी (आरआर),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व),मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. ऑलवीन दास, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी टीसी (आरआर), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२८.५.२००८ रोजी अर्ज करुन, प्रतिक्षानगर, सायन, मुंबई येथे नव्याने बांधकाम केलेल्या सात मजली इमारतीमध्ये शिफ्ट केलेल्या भाडेकरुची यादी व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे संकलन करण्याचे काम चालू असून, प्राप्त होताच अपिलकारास देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.०२.७.२००८ च्या पत्राने कळविले. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन

अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी टीसी (आरआर), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, प्रतिक्षानगर, सायन, मुंबई येथे नव्याने बांधकाम केलेल्या सात मजली इमारतीमध्ये शिफ्ट केलेल्या भाडेकरुची यादी व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने दि.०२.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधिम राहिल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५९५/०२**

**श्री. बी. मोसेस,**
**डी-४०१, अंधेरी मनिष गार्डन को.ऑप.हौ.सो.लि,**
**२-३-४, जे.पी.रोड, मनिष नगर,**
**प्रतिक्षा नगर, सायन कोळीवाडा,**
**सायन, (पूर्व.),मुंबई-४०० ०२२.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सह मुख्य अधिकारी, टीसी (आरआर),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप मुख्य अधिकारी, टीसी (आरआर),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व),मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. बी.मोसेस, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी टीसी (आरआर), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१८.६.२००८ रोजी अर्ज करुन, अंधेरी मनिष गृहनिर्माण संस्था मर्या. २-३-४ मनिष नगर, ले.पी.रोड, अंधेरी (प.) येथील कारभाराबाबत महाराष्ट्र सहकार अधिनियम, १९६० मधील कलम ८३ (१( अनुसार केलेल्या कार्यवाहीसंबंधीयस कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकाराच्या वतीने त्यांचे वकील हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराच्या वकीलाचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच,अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी टीसी (आरआर), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अंधेरी मनिष गृहनिर्माण संस्था मर्या. २-३-४ मनिष नगर, ले.पी.रोड, अंधेरी (प.) येथील कारभाराबाबत महाराष्ट्र सहकार अधिनियम, १९६० मधील कलम ८३ (१( अनुसार केलेल्या कार्यवाहीसंबंधीयस कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१०४३/०२**

**श्री. इम्रान युनुस आझमी,**
**आजमा हाऊस, ४४/३/८५,**
**फुर्कानिया चौक, कमला रामन नगर,**
**गोवंडी, मुंबई-४०० ०४३.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व),मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. इम्रान युनुस आझमी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२१.९.२००७ रोजी अर्ज करुन, मानखुर्द मुंबई येथील संक्रमण शिबिराच्या इमारत क्र.१, श्री साई विद्यालय व इमारत क्र.४ मोहिते पाटील विद्यालय, तसेच धारावी येथे राजे शिवाजी विद्यालय व श्री. मनोहर जोशी विद्यालय यांना शाळा व महाविद्यालय चालविण्यास जागा दिल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२०.१०.२००७ च्या पत्राने विहित कालावधीत माहिती दिली. आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या अपिलकारने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते. सदर प्रकरणी अपिलकाराने थेट राज्स माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मानखुर्द मुंबई येथील संक्रमण शिबिराच्या इमारत क्र.१, श्री साई विद्यालय व इमारत क्र.४ मोहिते पाटील विद्यालय, तसेच धारावी येथे राजे शिवाजी विद्यालय व श्री. मनोहर जोशी विद्यालय यांना शाळा व महाविद्यालय चालविण्यास जागा दिल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. संक्रमण शिबिरातील गाळे हे मुख्यत्वे करुन मुंबई बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या व उपकर प्राप्त इमारतीतील रहिवासी/ भाडेकरु यांची पर्यायी सोय म्हणून बांधण्यात आलेल्या असून प्रथम प्राधान्याने त्यांना वितरित करण्यात यावेत असे महामंडळाचे धोरण आहे. मानखुर्द येथील मोहिते पाटील विद्यालय या संस्थेस मंडळाच्या दि.७.१२.२००१ च्या ठराव क्र.७३ मधील आयत्या वेळेच्या प्रस्तावामधील बाब क्र.७२ (५३३) अनुसार ठरल्याप्रमाणे सदरचे गाळे तात्पुरत्या स्वरुपात व मंडळाच्या अटी शर्तीपमाणे वितरित करण्यात आले आहेत. धारावी येथील राजे शिवाजी विद्यालय व सर मनोहर जोशी विद्यालय यांनासुध्दा धारावी संक्रमण शिबिरातील गाळे हे प्राधिकरणाच्या ठराव क्र.१४१/१४ अनुसार मंडळाच्या अटी/ शर्तीच्या अधीन राहून वितरित करण्यात आले आहेत. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे शैक्षणिक संस्थेचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर मागणी केलेल्या संक्रमण शिबिरातील गाळे उपलब्ध असल्यास गरज पाहून सन २००३ पूर्वी गाळे भाडे तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात देण्याची पध्दत होती. असे उप मुख्य अधिकारी तथा जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले आहे. मंडळाने खोटे, बनावट, निराधार व गोधळात टाकणारे उत्तर दिलेले आहे. गाळयाचे आकडे अनेक प्रकारे खोटे आकडे टाकून वेगवेगळया पध्दतीने दिलेले आहेत. असा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास सबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीनुसार आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४८८/०२**

**श्री. राकेश चंद्रकांत मोरे,**
**डी.डी.ठाकूर वाडी (स्वरुपानंद ट्रान्झिट कॅम्प),**
**एस.के.बोले शेड, आगर बझार,**
**दादर (प.), मुंबई-४०० ०२८.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे, (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे, (पूर्व),मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. राकेश चंद्रकांत मोरे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, स्वरुपानंद एस,आर,ए,गृहनिर्माण संस्था मर्या. बाबत मा. उपमुख्यमंत्री महोदयाकडे दि.२.१.२००६ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, स्वरुपानंद एस,आर,ए,गृहनिर्माण संस्था मर्या. बाबत मा. उपमुख्यमंत्री महोदयाकडे दि.२.१.२००६ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराच्या अर्जाची छानननी केली असता असे दिसून येते की, स्वरुपांनद सहकारी गृहनिर्माण संस्था, अंतिम भूखंड क्र.८८३, एस.के.बोले रोड,दादर (प.) मुंबई या संस्थेच्या दि.२५.५.२००६ च्या सुनावणीच्या प्रती कार्यालयात उपलब्ध होत नसल्याने मागणी केलेली माहिती पुरविणे अशक्य आहे असे शासकीय माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.१.२००८ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की,अपिलकाराने मागणी केलेल्या नस्तीचा जाणिवपूर्वक शोध घेऊन अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. नस्तीचा जाणिवपूर्वक शोध घेऊनही नस्ती आढळून आली नाही तर याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तसे अपिलकारास १५ दिवसांचे आत कळवावे.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५९३/०२**

**श्री. वसंत बा. मोरे,**
**२, पॅरामाऊंट अपार्टमेंट, टिळक रोड,**
**सांताक्रूझ (प.), मुंबई-४०० ०५४.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त महाव्यवस्थापक,**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,**
**वाहतूक मुख्य कार्यालय, प्रशासनिक कार्यालय भवन,**
**दुसरा मजला, वडाळा बस आगार,**
**टिळक मार्ग, वडाळा, मुंबई-४०० ०३१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य वाहतूक व्यवस्थापक,**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,**
**वाहतूक मुख्य कार्यालय, प्रशासनिक कार्यालय भवन,**
**दुसरा मजला, वडाळा बस आगार,**
**टिळक मार्ग, वडाळा, मुंबई-४०० ०३१.** **------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. वसंत बा. मोरे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य वाहतूक व्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, वाहतूक मुख्य कार्यालय, वडाळा बस आगार, वडाळा, मुंबई, यांच्याकडे दि.०९.७.२००७ रोजी अर्ज करुन, सार्वजनिक हितासाठी अत्यावश्यक असलेला बस थांबा हलविण्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहितीपोटी रु.४९/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे दि.२.८.२००७ च्या पत्राने कळविले. जन माहिती अधिका-याने दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०५.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. एस.व्ही.रोड, सांताक्रूझ (प.) मुंबई या रस्त्यावरील उत्तरवाहिनीवरील बस मार्ग क्र.२३१ व २५५ चा सांताक्रूझ रेल्वे स्थानक थांबा हलविण्याबाबतच्या पत्राची प्रत अपिलकारास देण्यात आली.

तसेच अपील अर्जातील इतर मुद्दयासंदर्भात माहिती देण्यात आली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य वाहतूक व्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, वाहतूक मुख्य कार्यालय, वडाळा बस आगार, वडाळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सार्वजनिक हितासाठी अत्यावश्यक असलेला बस थांबा हलविण्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जामध्ये अपिलकाराने कोणत्याही प्रकारची कागदपत्रे मागितली नव्हती. शासकीय यंत्रणा, उदा.मुंबई पोलीस, वाहतूक पोलीस, निमशासकीय यंत्रणा, उदा.महानगरपालिका, एमएमआरडीए या प्राधिकरणाची कामे मुंबई शहरात सुरु आहेत. सदर कामे सुरु असताना एखादा बस थांबा/आश्रय स्थान सुलभ वाहतुकीच्यादृष्टीने अडचणीचे/अडथळयाचे असेल तर मुंबई पोलीस/ वाहतूक पोलीस, महानगरपालिका व उपक्रम यांच्या समन्वयाने बस थांबा स्थलांतरित करणे क्रमप्राप्त ठरते. सदर प्रकरणी बस थांबा हा प्रभारी पोलीस निरीक्षक वांद्रे वाहतूक विभागाच्या पत्राच्या अनुषंगाने तसेच उपक्रमाच्या स्थलांतर समितीच्या शिफारशीनंतर व महाव्यवस्थापकाच्या मान्यतेने बस थांबा स्थलांतरित केला आहे असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास पुरविली असल्याचे दिसून येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५९४/०२**

**श्री. विवेक निवृत्ती शिलवंत,**
**१७१/ ५६५४, कन्नमवार नगर-२,**
**विक्रोळी (पूर्व), मुंबई-४०० ०८३.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परि-२,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,**
**सर जे.जे.मार्ग, नागपाडा,मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,**
**सर जे.जे.मार्ग, नागपाडा,मुंबई-४०० ००८..** **------उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. विवेक निवृत्ती शिलवंत, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय, सर जे.जे.मार्ग, नागपाडा, मुंबई, यांच्याकडे दि.१८.३.२००८ रोजी अर्ज करुन, सेवा अभिलेखाच्या (सर्व्हिस बुक) सत्य प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०३.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१२.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास देय असलेली माहिती पूर्व प्रादेशिक विभागाकडून अपिलकाराचे सेवापुस्तक तात्काळ प्राप्त करुन सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे दि.१४.६.२००८ रोजी आदेश पारित केले. पोलीस शिपाई क्र.२४३७०/शिलवंत यांचे मूळ सेवापुस्तक अभिलेखावर उपलब्ध नसल्याने त्यांचे दुय्यम सेवा पुस्तक तयार करण्याची कार्यवाही चालू करण्यात आली आहे. शिलवंत यांच्याकडे उपलब्ध असलेला सर्व सेवाभिलेख घेऊन कार्यालयात तात्काळ उपस्थित राहण्याची समज देण्यात आली. यामुळे व्यथित होऊन

अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय, सर जे.जे.मार्ग, नागपाडा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सेवा अभिलेखाच्या (सर्व्हिस बुक) सत्य प्रतीची मागणी केली होती. मूळ सेवापुस्तक अभिलेखावर उपलब्ध नसल्याने अपिलकाराचे दुय्यम सेवापुस्तक तयार करण्याची कार्यवाही चालू असल्याचे लेखी अहवाल सादर करुन जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६४९/०२**

**श्री. आर. पी. यजुर्वेदी,**
**३०२/अे, नव आसावरी को.ऑन.हौ.सो.लि.**
**१८२, जे.बी.नगर,अंधेरी (प.), मुंबई-४०० ०५९.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, रस्ते,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आर.पी.यजुर्वेदी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.०७.४.२००८ रोजी अर्ज करुन, पश्चिम उपनगर सहार रोड, ए.के.रोड आणि साकीविहार, पवई रोड येथे एमएमआरडीने टीटीएमएल व इतर दुरध्वनी सेवा देणा-या संस्थांना रस्ता खोदण्यास परवानगी दिली आहे काय, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.६.२००८, २१.७.२००८ आणि ०४.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, पश्चिम उपनगर सहार रोड, ए.के.रोड आणि साकीविहार, पवई रोड येथे एमएमआरडीने टीटीएमएल व इतर दुरध्वनी सेवा देणा-या संस्थांना रस्ता खोदण्यास परवानगी दिली आहे काय, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६५०/०२**

**श्री. आर.पी.यजुर्वेदी (राव),**
**३०२/अे, नव आसावरी को.ऑन.हौ.सो.लि.**
**१८२, जे.बी.नगर,अंधेरी (प.), मुंबई-४०० ०५९.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,(पोल-७)**
**गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.** **------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. आर.पी.यजुर्वेदी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.२२.२.२००८ रोजी अर्ज करुन, पोलीस बलातील अधिकारी/ कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तिंसाठी आरोग्य योजना राबविण्याबाबत मा. उपमुख्य मंत्री आणि मा.गृह मंत्री यांना लिहिलेल्या पत्रावरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा गृह विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, पोलीस बलातील अधिकारी/ कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तिंसाठी आरोग्य योजना राबविण्याबाबत मा. उपमुख्य मंत्री आणि मा.गृह मंत्री यांना लिहिलेल्या पत्रावरील

कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. पोलीस बलातील अधिकारी/ कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांच्यासाठी महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यास दि.२८.७.२००६ च्या शा.नि. अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने घोषित केलेल्या एकूण ३२ आजारांवर शासन मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयामध्ये पोलीस अधिकारी/ कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना विनामूल्य औषधोपचार देण्यात येतात. पोलीस बलातील विहित शारिरीक क्षमता धारक पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी प्रोत्साहन भत्ता राबविण्याबाबत दि.६.११.२००६ च्या शा.नि.अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार पात्र पोलीस/कर्मचारी यांना रु.२५०/-प्रतिमाह मासिक प्रोत्साहन भत्ता वेतनासोबत देण्यात येतो. असे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सदर माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत दिली नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६५१/०२**

**श्री. महेंद्र जनार्दन चव्हाण,**
**८५/२, चाळके चाळ, ताडवाडी स्वदेशी मिल,**
**सायन, चुनाभट्टी, मुंबई-४०० ०२२.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**बेस्ट उपक्रम, बेस्ट भवन,**
**बेस्ट मार्ग, पो.बॉ.नं.१९२, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बेस्ट उपक्रम, बेस्ट भवन,**
**बेस्ट मार्ग, पो.बॉ.नं.१९२, मुंबई-४०० ००१.** **------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. महेंद्र जनार्दन चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बेस्ट उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन सेवेबाबतचे कार्य आणि कर्तव्ये, एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, कार्यपध्दतीचा अवलंब न करता भरलेली पदे, वर्गवारीनुसार पदसंख्या इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती www.bestundertaking.com. या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत आली आहे. अर्जातील इतर माहिती बेस्ट उपक्रमाशी संबंधित नसल्याने उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.९.६.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.१४.७.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा गृह विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन सेवेबाबतचे कार्य आणि कर्तव्ये, एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, कार्यपध्दतीचा अवलंब न करता भरलेली पदे, वर्गवारीनुसार पदसंख्या इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. उक्त अधिनियमातील कलम-४ नुसार बेस्ट उपक्रमासंबंधीची माहिती बेस्ट उपक्रमाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली असल्याचे व माहितीच्या अधिकारातील अर्जातील उर्वरित माहिती बेस्ट उपक्रमाशी संबंधित नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.०९.६.२००८ च्या पत्राने कळविले. केंद्रिय माहितीचा अघिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (दोन) अनुसार माहितीच्या अर्जातील काही भाग अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असेल त्या प्राधिकरणाकडे अपिलकाराच्या अर्जाची प्रत ५ दिवसाचे आत पाठवून अपिलकारास विहित कालावधीत माहिती देण्याबाबत कळविण्याची जबाबदारी जन माहिती अधिका-याची आहे. सदर प्रकरणी कार्यवाही जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत केलेली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराच्या अर्जाची प्रत हे आदेश प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांचे आत संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाठवून अपिलकारास माहिती देण्याबाबत कळवावे.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६५२/०२**

**श्री. मनोज काशिनाथ सितापुरे,**
**२, सुभाषनगर को.ऑप.हौ.सो.**
**सुभाषनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. मनोज काशिनाथ सितापुरे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२१.२.२००८ रोजी अर्ज करुन, सुभाषनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील सहाय्यक मार्गावरील बांधण्यात आलेल्या बालवाडी/ व्यायाम शाळेबाबत अनुषंगिक २१ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीसाठी अपिलकार हजर नव्हते. अपिलकाराने मागणी केलेली माहिती १५ वर्षापूर्वीची असल्याने सदर माहितीचा अभिलेखात शोध घेण्यात येत आहे. अभिलेखातून माहिती उपलब्ध होताच तात्काळ अपिलकारा माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी प्रथम सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले.अपिलकाराने मागणी केलेली माहिती अभिलेखाचा शोध घेऊन लवकरात लवकर विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना दि.०९.५.२००८ रोजी आदेश दिले.. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि.१५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सुभाषनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील सहाय्यक मार्गावरील बांधण्यात आलेल्या बालवाडी/ व्यायाम शाळेबाबत अनुषंगिक २१ मुद्दयांवर माहिती मागितली होती. बालवाडी/ व्यायामशाळा कोणाच्या विकास निधीतून बांधण्यात आली आहे, एकूण क्षेत्रफळ किती आहे, मंजूर नकाशाची प्रत द्यावी, बांधकामासाठी किती खर्च आला इ.अनुषंगिक माहिती उपलब्ध करुन देण्याची अपिलकाराची विनंती आहे. अभिलेखाचा शोध घेऊन विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले आहेत. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६५३/०२**

**श्री. प्रवीणकुमार बी. पटेल,**
**१७, विजय भारत को.ऑप.हौ.सो.लि.**
**४ था मजला, सहयोग नगर, चार बंगला,**
**अंधेरी (प.), मुंबई-४०० ०५३.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था (३), म्हाडा बिल्डिंग,तळमजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था (३), म्हाडा बिल्डिंग,तळमजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रवीणकुमार बी.पटेल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था (३), म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.०६.५.२००८ रोजी अर्ज करुन, विजय भारत सहकारी गृहनिर्माण संस्थेतील स्थलांतरित आणि अमागास वर्गातील व्यक्तिच्या सभासदत्वासाठी संचालक, समाजकल्याण, पुणे यांची मान्यता नसताना संस्थेच्या निवडणूकीस कशाच्या आधारे पात्र उमेदवार ठरविण्यात आले इ. बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती यापूर्वीच दि.०६.५.२००८ रोजीच्या माहितीच्या अधिकारा अंतर्गत केलेल्या अर्जास अनुसरुन कार्यालयाने दि.२९.५.२००८ च्या पत्राने दिली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२०.६.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था (३), म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, विजय भारत सहकारी गृहनिर्माण संस्थेतील स्थलांतरित आणि अमागास वर्गातील व्यक्तिच्या सभासदत्वासाठी संचालक, समाजकल्याण, पुणे यांची मान्यता नसताना संस्थेच्या निवडणूकीस कशाच्या आधारे पात्र उमेदवार ठरविण्यात आले इ. बाबत ाुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपिलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.९.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६६४/०२**

**श्री. कुलकर्णी विवेक गजानन,**
**२४६/१९, मंगेश सदन, एल.जे.रोड,**
**शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सिनिअर डेप्यु. सी.एम.ओ.**
**बी.ई.एस.टी. मेडीकल विभाग,**
**ट्रान्सपोर्ट हाऊस, एस.बी.एस.रोड,**
**कुलाबा, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सिनिअर डेप्यु. सी.एम.ओ.**
**बी.ई.एस.टी. मेडीकल विभाग,**
**ट्रान्सपोर्ट हाऊस, एस.बी.एस.रोड,**
**कुलाबा, मुंबई-४०० ००१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. कुलकर्णी विवेक गजानन, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सिनिअर डेप्यु.सी.एम.ओ. बी.ई.एस.टी.मेडीकल विभाग, ट्रान्सपोर्ट हाऊस, कुलाबा, मुंबई, यांच्याकडे दि.२३.४.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.व्ही.जे.परेरा, ए.टी.सी.कुलाबा यांचे वैद्यकीय उपचारासंबंधीच्या कार्डाची छायाप्रतीची व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम ८ (१) (जे) अनुसार जन माहिती अधिका-यांनी नाकारली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन अपिलकाराचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले असल्याचे दि.२३.६.२००८ च्या पत्राने अपिलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सिनिअर डेप्यु.सी.एम.ओ. बी.ई.एस.टी.मेडीकल विभाग, ट्रान्सपोर्ट हाऊस, कुलाबा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.व्ही.जे.परेरा, ए.टी.सी.कुलाबा यांचे वैद्यकीय उपचारासंबंधीच्या कार्डाची छायाप्रतीची व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली आहे अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीने कोणतेही जनहित साध्य होणार नाही असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.२३.६.२००८ च्या पत्राने कळविले आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६६५/०२**

**श्रीमती मारिया अे.कोएलो व ब्लँडीना एम.कोएलो,**
**फ्लॅट नं.३०१/अे, श्री साई श्रध्दा,**
**प्लॉट ५३४/बी, भवानी शंकर रोड,**
**दादर (प.), मुंबई-४०० ०२८.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था (जी/एन वॉर्ड),**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था (जी/एन वॉर्ड),**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई-४०० ००१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती मारिया ए.कोएलो आणि ब्लँडिना एम.कोएलो, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था (जी/एन वॉर्ड), मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.२२.२.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.साई श्रध्दा सहकारी गृहनिर्माण संस्था, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई या संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या गैरकारभाराबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२९.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२७.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती संस्थेच्या स्तरावर उपलब्ध आहे. जन माहिती अधिका-यांनी त्यांच्या स्तरावर असलेली माहिती अपिलकारास द्यावी. तसेच संस्था स्तरावर असलेली माहिती अपिलकारास प्राप्त करुन देण्यासाठी संस्थेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ (१) खाली आदेश देवून माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलकारास द्यावी असे दि.१०.६.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित

केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था (जी/एन वॉर्ड), मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.साई श्रध्दा सहकारी गृहनिर्माण संस्था, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई या संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या गैरकारभाराबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकारास संस्थेच्या जमा/ खर्चाची माहिती दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. संस्था स्तरावरील माहिती अपिलकारास प्राप्त झाली नाही. सदर माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ (१) अन्वये संस्थेविरुध्द कारवाई करुन माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलकारास देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांचे दि.१०.६.२००८ चे आदेश आहेत. अद्याप अपिलकारास माहिती पुरविण्यात आलेली नाही असे अपिलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६६८/०२**

**श्री. अनंत गोपाळ मणचेकर,**
**जरिवाला समूह, इ.क्र.२/५०९,**
**सिंधुसागर, डॉ. डी.बी.मार्ग,**
**लॅमिंग्टन रोड, मुंबई- ४०० ००८.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप निबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. अनंत गोपाळ मणचेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी अर्ज करुन, दि.१५.१२.१९९७ अन्वये दिलेल्या नोटीसीची प्रत, वसुली दाखला इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराच्या अर्जात मागितलेल्या माहितीसंबंधी स्वयं:स्पष्ट खुलासा होत नाही. कार्यालयाने वसुली दाखला दि.३१.१.१९९८ रोजी अदा केल्याचे दिसून येते. यापुढे कोणती कारवाई करण्यात आली ही बाब सिंधुसागर या गृहनिर्माण संस्थेच्या दफ्तरी असल्याने संस्थेला तसे पत्राने कळवून अपिलकारास माहिती देण्याबाबत सूचना देण्यात आल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१९.३.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२१.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१५.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडेच उपलब्ध असल्यामुळे अपिलात तथ्य आढळत नाही. असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२०.५.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे

व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.१५.१२.१९९७ अन्वये दिलेल्या नोटीसीची प्रत, वसुली दाखला इ.अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करुन कलम १०१ अन्वये दिलेल्या निकालाची प्रत मिळण्याची विनंती केली होती. परंतु सदर अर्जासोबत वसुली दाखल्याची प्रत जोडली होती. जन माहिती अधिका-यांनी त्यांना याबाबत स्पष्टीकरण विचारले होते. परंतु अपिलकाराने त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत कोणतेही स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांचेसमोर सादर केले नाही. त्यामुळे जन माहिती अधिका-यांना अपिलकाराच्या अर्जावर नेमका निर्णय घेण्याबाबत संदिग्धता निर्माण झाली. असे जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडून कोणती पूर्वसूचना न देता कार्यालयीन आदेश न देता वसुली दाखला प्राप्त झाला. वसुली दाखल्याने नोंदणीकृत संस्थेने थकबाकी (मेंटनन्स) देखभाल निधी वसूल केल्याबाबत सविस्तर माहितीचा तपशील देण्याचा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६६९/०२**

**श्री. नरेश चंदू कोटियनकर,**
**सी-२, दासवानी को.ऑप.हौ.सो.लि.,**
**सेंट लुईस कॉन्व्हेंट स्कूलच्या समोर,**
**चार बंगला, अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५३.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३),**
**पश्चिम उपनगरे, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप निबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग,**
**पश्चिम उपनगरे, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. नरेश चंदू कोटियनकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. ०५.५.२००८ रोजी अर्ज करुन, दासवानी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या सदस्यांनी बंदपत्र केली नाहीत याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील तसेच प्रश्नावली व तक्रार स्वरुपातील असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले आहे. जन माहिती अधिका-याने दिलेले उत्तर योग्य असल्याचे नमूद करुन दि.२४.७.२००८ रोजी आदेश पारित

करुन अपील फेटाळण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, के/ पश्चिम विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दासवानी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या सदस्यांनी बंदपत्र केली नाहीत याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. दासवानी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या चार सभासदांनी संस्थेच्या सचिवांनी केलेल्या अनियमिततेबाबत जन माहिती अधिका-याकडे सादर केलेल्या निवेदनाबाबत अद्याप कारवाई झाली नसल्याचा मदुदा अपिलकाराने द्वितीय अपिलात उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, दासवानी गृहनिर्माण संस्थेच्या सचिवांनी केलेल्या अनियमिततेबाबत अपिलकार व इतर तीन सभासदांनी सादर केलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६७१/०२**

**श्री.शशिकांत केशव जोशी,**
**अ-७, वर्षा ऑलिव्ह, श्रध्दानंद रोड,**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई- ४०० ०५७.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३),**
**पश्चिम उपनगरे, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप निबंधक, सहकारी संस्था, के/पूर्व विभाग,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. शशिकांत केशव जोशी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.१८.१.२००८ रोजी अर्ज करुन, वर्षा ऑलिव्ह को.ऑप.हौ.सोसायटीच्या बायलॉजची तसेच बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.२.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२९.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपील अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील जोडपत्र -ब, नियम-५ (१) प्रमाणे सादर केलेले नाही. तसेच आवश्यक कोर्ट फी मुद्रांक रु.२०/- लावण्यात आलेले नाही. यामुळे अपील नाकारण्यात आले. जोडपत्र -ब, नियम-५ प्रमाणे कार्यालयात अपील सादर करावे असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.७.३.२००८ च्या पत्राने

अपिलकारास कळविले. त्यानंतर अपिलकाराने विहित नमुन्यात दि.२७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वर्षा ऑलिव्ह को.ऑप.हौ.सोसायटीच्या बायलॉजची तसेच बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मागितली होती. व्यवस्थापक समितीच्या मानद सचिवांनी संस्थेच्या ठरावाच्या नकला सभासदाला दिल्या नाहीत. संस्थेमध्ये काय चालले आहे व ठरावाप्रमाणे काम होते की नाही, हे समजण्यास मार्ग नाही. कायद्याच्या नकला दिल्या नाहीत. असा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था स्तरावर असल्याने कार्यालयात माहिती उपलब्ध नाही. अपिलकाराने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन द्यावी असे जन माहिती अधिका-यांनी वर्षा ऑलिव्ह को.ऑप. सोसायटीच्या सचिवांना दि.१३.६.२००८ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलकाराने संस्थेच्या कायद्याची प्रत तसेच बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मागितली आहे. सदर माहिती संस्था स्तरावरील आहे. अपिलकाराने मागणी केलेली माहिती अपिलकारास उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी संस्थेच्या सचिवांना कळविले आहे. तरीही संस्थेने अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मागणी केलेली माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची अपिलकारास उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय

अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६७२/०२**

**श्री. रणजितकुमार रॉय,**
**भाटीया निवास, १ ला मजला, ब्लॉक नं.१७/१८,**
**३६३, जे.एस.एस.रोड,**
**ठाकूरद्वार, मुंबई- ४०० ००२.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, इमारत प्रस्ताव**
**ई विभाग, १० एस.के.हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, इमारत प्रस्ताव**
**ई विभाग, १० एस.के.हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.** **------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रणजित कुमार रॉय, यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपील महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ मधील नियम ५(२) अनुसार जोडपत्र "क" मध्ये केलेले नाही. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, इमारत प्रस्ताव, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.०३.४.२००८ रोजी अर्ज करुन, मंजूर आराखडयाची प्रत, मंजूर आय.ओ.डी. आणि सी.सी. व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीची नस्ती जाणिवपूर्वक शोध घेऊनही सापडत नाही. त्यामुळे अपिलकारास माहिती देता येत नाही. नस्ती सापडल्यानंतर तात्काळ अपिलकारास विहित शुल्क आकारुन माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२९.४.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने पुन्हा दि.२१.५.२००८ रोजी जोडपत्र-अ मध्ये रु.२०/- चे कोर्ट फी स्टँप लावून जन माहिती अधिका-याकडे पुन्हा अर्ज केला. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्ती शोध घेऊनही सापडत नसल्याने नस्ती सापडल्यानंतर माहिती देण्यात येईल असे पुन्हा दि.१६.६.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपील जोडपत्र-क मध्ये केलेले नाही. जोडपत्र-अ मध्ये दि.२२.७.२००८ रोजी अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, इमारत प्रस्ताव, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मंजूर आराखडयाची प्रत, मंजूर आय.ओ.डी. आणि सी.सी. व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अपील दाखल करण्याची अपिलकारास उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करावे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६७३/०२**

**श्री. सुदत्त रा. जाधव,**
**७/११२, तिरुपती को.ऑप.हौ.सो.मर्या.**
**डी.एन.नगर, विभाग क्र.१, जे.पी.रोड,**
**अपना बाजार समोर,**
**अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५३.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुदत्त ना. जाधव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२२.८.२००७ रोजी अर्ज करुन, समितीचा पुनर्बांधणी विकासाचा कारभार कायदा, नियम आणि विनियमरित्या कार्यरत नाही, बैठकीचे इतिवृत्त, बैठकीस उपस्थित सभासदांचे नोंदणी प्रत इ.पाच मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३१.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२१.१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली. वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, समितीचा पुनर्बांधणी विकासाचा कारभार कायदा, नियम आणि विनियमरित्या कार्यरत नाही, बैठकीचे इतिवृत्त, बैठकीस उपस्थित सभासदांचे नोंदणी प्रत इ.पाच मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अपील दाखल करण्याची अपिलकारास उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपील अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६८१/०२**

**श्रीमती स्मृती प्रभाकर लोके,**
**१०/१०४१, इंद्रप्रस्थ को.ऑप.हौ.सो.मर्या.**
**म्हाडा वनराई कॉलनी,**
**पश्चिम द्रूतगती महामार्ग,**
**गोरेगांव (पूर्व) मुंबई- ४०० ०६५.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप प्रमुख अभियंता, इमारत प्रस्ताव,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर.के.पाटकर मार्ग,**
**भाभा हॉस्पिटलजवळ, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता,इमारत व कारखाने, ,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई.** **------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती स्मृती प्रभाकर लोके, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत व कारखाने, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ पूर्व विभाग, अंधेरी (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.३०.११.२००७ रोजी अर्ज करुन,आदर्श इंडस्ट्रीयल को.ऑ. सो. लि. आदर्श नगर, अंधेरी, चकाला रोड, अंधेरी या संस्थेच्या बांधकामाची मंजूर केलेल्या नकाशाची प्रत व इतर सर्व दस्तऐवजाच्या प्रतीची मागणी केली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता (इमारती प्रस्ताव) यांचेशी संबंधित असल्याचे अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२८.१.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२७.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता (इमारती प्रस्ताव), पश्चिम उपनगरे यांच्याशी संबंधित असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. परंतु अपिलकाराचा अर्ज कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविलेला नाही. त्यामुळे अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. अपिलकाराने आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग, अंधेरी (पूर्व) यांचेशी संपर्क साधवा. जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता,

इमारती प्रस्ताव, एच व के/पूर्व विभाग यांचेकडे नव्याने अर्ज सादर करावा असे नमूद करुन अपिलकाराचे अपील निकाली काढण्यात येत असल्याबाबत अपिलकारास उप मुख्य अभियंता, इमारती प्रस्ताव यांनी दि.१९.६.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत व कारखाने, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ पूर्व विभाग, अंधेरी (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन,आदर्श इंडस्ट्रीयल को.ऑ. सो. लि. आदर्श नगर, अंधेरी, चकाला रोड, अंधेरी या संस्थेच्या बांधकामाची मंजूर केलेल्या नकाशाची प्रत व इतर सर्व दस्तऐवजाच्या प्रतीची मागणी केली होती. उक्त अधिनियमातील कलम-६ (दोन) अनुसार माहितीच्या अधिकारातील अर्जान्वये मागितलेली माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असेल तर अपिलकाराचा अर्ज संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाच दिवसाच्या आत हस्तांतरित करुन अपिलकारास आवश्यक ती माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित सार्वजनिक प्राधिकरणास कळविण्याची जन माहिती अधिका-यांची जबाबदारी आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-याने अपिलकाराचा अर्ज संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे विहित कालावधीत हस्तांतरित केला नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांचे आत अपिलकाराचा अर्ज संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करुन अपिलकारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळवावे. तसेच सदर बाब अपिलकारास अवगत करावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६८३/०२**

**श्री. अब्दुल गफूर हुणशाळ,**
**हॉटेल प्रेसिडेन्ट, महाराष्ट्र नगर,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एस.आर.ए.),**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एस.आर.ए.),**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.अब्दुल गफूर हुणशाळ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि२४.३.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/आंबेडकर नगर येथील एसआरए अंतर्गत चालू असलेल्या पुनर्वसनाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/आंबेडकर नगर येथील एसआरए अंतर्गत चालू असलेल्या पुनर्वसनाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६८४/०२**

**श्री. महावीर प्रसाद सैनी,**
**हॉटेल प्रेसिडेन्ट, महाराष्ट्र नगर,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एस.आर.ए.),**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एस.आर.ए.),**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.महावीर प्रसाद सैनी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१४.१.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/आंबेडकर नगर सिटीएस-६२९ येथील प्रस्तावित योजनेत सहभाग घेतलेल्या पाच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट-२ बाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधीचे उत्तर तयार आहे. सदर उत्तर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी कक्षातून कामाच्या दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेत घेऊन जावे असे दि.२२.१.२००८ च्या पत्राने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/आंबेडकर नगर सिटीएस-६२९ येथील प्रस्तावित योजनेत सहभाग घेतलेल्या पाच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट-२ बाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६८५/०२**

**श्री. विकास गोविंद भोसले,**
**१/२७, राधाकृष्ण निवास,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,**
**अग्निशमन केंद्राशेजारी,**
**दादर (पूर्व) मुंबई- ४०० ०१४. ------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी मंडई, २ रा मजला,**
**फलटण रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विभाग अधिकारी (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी मंडई, २ रा मजला,**
**फलटण रोड, मुंबई- ४०० ००१. ------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विकास गोविंद भोसले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा विभाग अधिकारी (मालमत्ता), बृहन्मुंबई महानगरपालिका, छत्रपती शिवाजी मंडई, फलटण रोड, मुंबई, यांच्याकडे दि.१५.३.२००८ रोजी अर्ज करुन, नायगांव विभागातील सिटी सर्वे क्र.४, हिस्सा क्र.१/४ मधील महापालिकेच्या मालकीचा भूभाग कशाकरिता आरक्षित होता इ.एकूण नऊ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.०९.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, नायगांव विभागातील सिटी सर्वे क्र.४, हिस्सा क्र.१/४ मधील महापालिकेच्या मालकीचा भूभाग कशाकरिता आरक्षित होता इ.एकूण नऊ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६७९/०२**

**श्री. कुणाल संगोई,**
**१५०, जुहू गल्ली, फारुकिया मस्जीद जवळ,**
**अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५८.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग,**
**मिठानगर, गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग,**
**मिठानगर, गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.** **------उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. कुणाल संगोई यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.१०.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारती व कारखाने, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग, गोरेगांव, मुंबई, यांच्याकडे दि.२२.४.२००८ रोजी अर्ज करुन, ऑरबिट इंडस्ट्रीयल इस्टेट, चिंचोली बंदर रोड, मालाड (प.), मुंबई बाबत अनुषंगिक आठ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

ऑरबिट इंडस्ट्रीयल इस्टेटचे अनधिकृत बांधकाम दि.१७.११.२००७ रोजी पाडून टाकण्यात आल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२९.४.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२१.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.०९.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सहाय्यक अभियंता, इमारती प्रस्ताव, पी/दक्षिण विभाग यांचेकडून दि.०९.७.२००८ रोजी उत्तर प्राप्त झाले आहे. पत्राची प्रत अपिलकारास द्यावी असे नमूद करुन दि.१५.७.२००८ रोजी आदेश पारित केले. माहिती मिळाली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारती व कारखाने, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग, गोरेगांव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, ऑरबिट इंडस्ट्रीयल इस्टेट, चिंचोली बंदर रोड, मालाड (प.), मुंबई बाबत अनुषंगिक आठ मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६८०/०२**

**श्री. संजय गोविंद धुवाळी,**
**४/३०५, रचना नवि चिखलवाडी,**
**एन. बी. मार्ग, ग्रँटरोड (प.) मुंबई- ४०० ००७.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**संचालक पणन/ मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. संजय गोविंद धुवाळी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.३०.११.२००७ रोजी अर्ज करुन, कोड क्र.१८३, अर्ज क्र.२३३६४, सायन प्रतिक्षानगर येथील गाळयाबाबत अनुषंगिक तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०४.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, कोड क्र.१८३, अर्ज क्र.२३३६४, सायन प्रतिक्षानगर येथील गाळयाबाबत अनुषंगिक तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती. शारदा मोतीलाल भस्मे यांनी दि.२८.४.२००४ पासून केलेल्या अर्जाच्या प्रती व त्यास दिलेल्या उत्तराच्या प्रती, अनामत भरलेली रक्कम रु.१०,०००/-, परतावा केलेल्सर रकमेची धनादेशासहित माहिती, सदरचा गाळा रद्द करुन कोणाला व कशा प्रकारे देण्यात आलेला आहे याबाबत माहिती मागितली होती. श्रीमती शारदा मोतीलाल भस्मे यांनी संकेत क्र.१८३, प्रतिक्षानगर सायन येथील सदनिकेसाठी अर्ज केला होता. त्यांनी दि.२.४.२००५ च्या पत्रान्वये स्वतःहून योजनेतून माघार घेतली. त्यामुळे अर्जदाराने भरणा केलेल्या अनामत रकमेतून प्रशासकीय खर्चापोटी रु.५००/-मंडळाने समपहरण करुन उर्वरित रु.९५००/-रकमेचा परतावा श्रीमती भस्मे यांनी स्वतः घेतलेला आहे असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रतिपादन केले. सदरचा गाळा रद्द करुन कोणाला व कशा पध्दतीने देण्यात आला, श्रीमती भस्मे यांनी केलेल्या अर्जाच्या प्रती व त्यास दिलेल्या उत्तराच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६८६/०२**

**श्रीमती कॅरोल टी. मोरेस,**
**१०६, मार्वे रोड, ऑरलेम,**
**मालाड (प.) मुंबई- ४०० ०६४.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.) मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (बि.आणि का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.) मुंबई- ४०० ०६४.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती कॅरोल टी. मोरेस, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (बि.आणि का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग, मामलेतदारवाडी, मालाड, मुंबई, यांच्याकडे दि.३१.१०.२००७ रोजी अर्ज करुन, दि.०३.२.२००६ रोजी मनपा अधिनियमातील कलम ३५१ अनुसार देण्यात आलेल्या नोटीसीबाबतची करणे व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२३.११.२००७ च्या पत्राने कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.०४.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलकारास पुरविण्यात यावी असे नमूद करुन दि.०९.६.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (बि.आणि का.),बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग, मामलेतदारवाडी, मालाड,मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.०३.२.२००६ रोजी मनपा अधिनियमातील कलम ३५१ अनुसार देण्यात आलेल्या नोटीसीबाबतची करणे व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. सन १९७५ पूर्वी केलेल्या बांधकामास मनपा अधिनियम कलम, ३५१ अन्वये अपिलकारास नोटीस देण्यात आली होती. याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर माहिती कार्यालयातील उपलब्ध कागदपत्रावरुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना दि.०९.६.२००८ रोजी आदेश दिले होते. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६८७/०२**

**श्री. अरुण गणपत भोवर,**
**ए/६०३, साई आशिष जनकल्याण बँक शेजारी,**
**विक्रोळी स्टेशन रोड,**
**विक्रोळी (पूर्व) मुंबई- ४०० ०८३.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.अरुण गणपत भोवर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१०.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१९.४.२००८ रोजी अर्ज करुन, अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था, कन्नमवार नगर, इमारत क्र.१६७, विक्रोळी या संस्थेवर प्रशासकाची नेमणूक करण्याबाबत व इतरअनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराच्या तक्रार अर्जास अनुसरुन कार्यालयाने संस्थेला कलम ८९ (अे) अन्वये तपासणी आदेश निर्गमित करण्यात आले. संस्थेने दफ्तर उपलब करुन न दिल्याने कार्यालयाकडून स्मरणपत्र पाठविण्यात आले. त्यानुसार सहकारी कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येत असल्याचे दि.१४.५.२००८ च्या पत्राने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२३.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित

होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था, कन्नमवार नगर, इमारत क्र.१६७, विक्रोळी या संस्थेवर प्रशासकाची नेमणूक करण्याबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिका-या कडे अपील दाखल करण्याची अपिलकारास उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी अपिलकाराने ०३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१६८८/०२**

**श्री. मुळे अनिल आदिनाथ,**
**द्वारा- डॉ. सरदार खान यांचे घर,**
**समर्थनगर, उस्मानाबाद-४१३ ५०१.** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,**
**क्रिडा युवक सेवा क्रिडा संकुल,**
**लातूर विभाग, जि.लातूर.**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी,**
**तुळजाभवानी जिल्हा स्टेडियमजवळ,**
**कार्यालय, उस्मानाबाद.** **------उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री.मुळे अनिल आदिनाथ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी, तुळजाभवानी जिल्हा स्टेडियमजवळ, उस्मानाबाद, यांच्याकडे दि.११.५.२००७ रोजी अर्ज करुन,तुळजाभवानी जिल्हा स्टेडियममधील कामाचा तपशील मिळण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जिल्हा क्रिडा अधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.०७.८.२००७ च्या पत्रासोबत दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१५.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा

जिल्हा क्रिडा अधिकारी, तुळजाभवानी जिल्हा स्टेडियमजवळ, उस्मानाबाद, यांच्याकडे अर्ज करुन, तुळजाभवानी जिल्हा स्टेडियममधील कामाचा तपशील मिळण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांनी अपिलकाराने अर्ज करण्यापूर्वी आवश्यक ती माहिती उपसंचालक कार्यालय, लातूर यांच्याकडे सादर केली आहे. अपिलकारास आवश्यक असलेली माहिती विनाशुल्क पुरविण्यात येईल असे दि.१६.१.२००९ रोजी लेखी अहवाल सादर करुन जन माहिती आयोगास कळविले आहे. परंतु अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१७७४/०२**

**श्री. वामन कविस्कर,**
**२३७/२३९, बाळ दंडवते स्मृती,**
**ना.म.जोशी मार्ग, मुंबई- ४०० ०१३** **------अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**प्रमुख अग्निशमन अधिकारी,**
**मुंबई अग्निशमन दल,**
**१०, शेख हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रमुख अग्निशमन अधिकारी,**
**मुंबई अग्निशमन दल,**
**१०, शेख हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८.** **------उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. वामन कविस्कर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि. २६.२.२००८ रोजी अर्ज करुन, कार्यशाळेत पदोन्नतीची पध्दत सेवाज्येष्ठतेनुसार आहे का, असल्यास श्री.जाधव, प्र.अ.मोची यांना पदोन्नतीमधून का डावलण्यात आले इ.अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२१.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि. २६.२.२००८ रोजी अर्ज करुन, कार्यशाळेत पदोन्नतीची पध्दत सेवाज्येष्ठतेनुसार आहे का, असल्यास श्री.जाधव, प्र.अ.मोची यांना पदोन्नतीमधून का डावलण्यात आले इ.अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/०१/२००९.**